THE BOOK WAS
DRENCHED

TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192378
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M84/M63S. Accession No. 1906.

Author भाकोरे, गोविंद बळवंत.

Title शालिवाहन शक/सि.१९३५-५०. /933

This book should be returned on or before the date last marked below.

श्री

'गृहिणी गृहमुच्यते'

गृहिणीभूषणपुस्तकमाला

पुष्प २ रें

# शालिनीचीं निवडक पत्रें

खंड दुसरा.

संपादक व प्रकाशक

गोविंद बळवंत माकोडे

ग्वाल्हेर.

१९३३

किंमत एक रुपया. टपाल खर्च शिवाय.

धाऊक ग्राहकांस भरपूर कमीशन.

प्रकाशक
गोविंद बळवंत माकोडे,
ग्वाल्हेर.

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक
आलीजाह दरबार प्रेस,
ग्वाल्हेर.

# दुसऱ्या खंडाची प्रस्तावना.

गृहिणीभूषणपुस्तकमालेंतील पहिलें पुष्प म्हणून **शालिनीचीं निवडक पत्रें**, खंड पहिला, हें पुस्तक गतवर्षी प्रकाशित केलें. त्या मालेंतील दुसरें पुष्प म्हणून त्या पत्रांचा दुसरा हप्ता, **खंड दुसरा** आतां हा वाचकांच्या हातीं प्रेमपुरःसर देण्यांत येत आहे.

पहिल्या खंडाची पहिली आवृत्ति एका महिन्याच्या आंतच संपली. त्यामुळें पुष्कळ लोकांची मागणी पुरवितां आली नाहीं. त्याच वेळीं या खंडाची दुसरी आवृत्ति व पुढील पत्रांचा दुसरा हप्ता त्वरित प्रसिद्ध करण्याविषयीं अनेकांचा आग्रह पडला. पण निरनिराळया कारणांस्तव आजवर तो योग आला नाहीं, याबद्दल आम्हांला अत्यंत वाईट वाटतें.

नवीन वाचकांस उपलब्ध सर्व पत्रें एकत्र वाचावयास मिळावीं म्हणून या दुसऱ्या खंडांत पहिल्या खंडांतील सर्व पत्रें समाविष्ट केलीं आहेत. तीं आरंभीं घातलीं आहेत.

ग्वाल्हेर,
ताः २० नोव्हेंबर १९३३.

गोविंद बळवंत माकोडे.

॥ श्री ॥

# प्रस्तावना

खरें पाहिलें असतां खाजगी व्यक्तींच्या पत्रांत विशेष ते काय असा-वयाचें? आणि वर वर पाहिलें असतां पुढील पत्रांत तसें कांहीं विशेष आहे, असेंही पण वाटणार नाहीं. पण आपल्या आनंदाला जितके अधिक वांटेकरी मिळतील, तितका तो वाढतो असा सार्वत्रिक अनु-भव आहे. या नियमाला प्रस्तुत लेखकही अपवाद नाहीं. पत्रलेखिकेचें प्रस्तुत लेखकाशीं सहोदरत्वाचें नातें असल्यामुळें स्वाभाविकपणेंच त्याला पत्रलेखिकेच्या अनेक पत्रांचा आजवर लाभ होत आलेला आहे. आणि तीं पत्रें जरीं अशींच आमच्या सांसारिक व इतर सुखदुःखावि-षयींचीं आणि त्या त्या वेळच्या बऱ्यावाईट भावनोद्रेकाविषयींचीं असलीं, तरी या बाबी वगळूनहीं त्या पत्रांपासून प्रस्तुत लेखकाला तीं वाचतांना दर वेळेस अनिर्वचनीय अशा आनंदाचा लाभ झाला आहे. अगदीं तिऱ्हाइत, अनोळखी, अशा माणसाचीं म्हणून जर हीं पत्रें प्रस्तुत लेखकाच्या वाचण्यांत आलीं असती, तर जो आनंद झाला असता, किंवा अन्य तऱ्हेनें सांगावयाचें झाल्यास नाटकांतील पात्रांच्या हर्षविषादादि मनोविकाराशीं तद्रूप होत असतांना त्या पात्रांच्या

अभिनयचातुर्यामुळें आपल्या मनाला जो एक विलक्षण आनंद होतो, त्याच आनंदाचे वाटेकरी व्हावे म्हणून हीं पत्रें वाचकांच्या हातीं देण्यांत येत आहेत. जिव्हाळ्याच्या नात्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आपलेपणाच्या भावनेनें प्रस्तुत लेखकाची दृष्टि अंध होणें स्वाभाविक आहे. व हीच गोष्ट इतर संबंधीयांचीही. पण व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें पहातां सर्वच वाचकांस तसा अनुभव येईल असें नाहीं. फावल्या वेळांत जर कोणी हीं पत्रें हातीं घेतलीं तर, त्यांची थोडी बहुत तरी करमणूक होईल, एवढीच उम्मेद आहे. इतक्यावरही जर कोणाची या बाबतींत निराशा झाली तर त्यानें थोर मनानें क्षमा करावी अशी नम्र विनंति आहे.

संपादक म्हणून एकाच व्यक्तीचें नांव पुढें करण्यांत आलें असलें, तरी वास्तविक प्रकार तसा नाहीं. कोणतें पत्र प्रसिद्ध करावयाचे, कोणतें नाहीं, याची शहानिशा सर्वांनीं मिळून केलेली आहे. व या सर्वांच्या उत्तेजनानें व सहकार्यानेच हीं पत्रें प्रकाशित करण्यांत येत आहेत, ही गोष्ट, न सांगतांही सहज समजण्यारखी आहे.

आतां सांगण्यासारखी महत्त्वाची अशी आणखी एकच गोष्ट राहिली. पत्रलेखिकेचा स्वभाव तिच्या नांवाप्रमाणेंच अत्यंत संकोची—लाजाळू असल्यामुळें या कामीं तिची मुळींच संमति मिळणार नाहीं, किंबहुना तिच्याकडून पदोपदीं अडथळाच येण्याचा संभव—नव्हे—खात्रीच असल्यामुळें या प्रसिद्धीकरणाच्या कटाची तिला अद्याप वार्ता देखील

नाहीं; आणि शेवटपर्यंत ती लागूही द्यावयाची नाहीं, असा संकल्प असल्यामुळें वाचकांनींही या बाबतींत शक्य ती बुद्धिपुरःसर खबरदारी घ्यावी, अशी त्यांस अत्यंत नम्रपणाची विनंति आहे. नाहीं तर पत्रलेखिकेच्या कोपाचें मोठेंच अरिष्ट प्रस्तूत लेखकावर ओढवून आण-ल्याचें पातक त्यांच्या माथीं बसेल. एकाच संपादकाचें नांव पुढें करण्यांत इतर संपादकांकडून हें जें औदार्य दाखविण्यांत आलें तें कां, याची आतां अधिक फोड करून सांगण्याची गरज नाहीं. याशिवाय दुसरें भय असें आहे कीं, या कटाची वार्ता पत्रलेखिकेस लागल्यास तिचें पुढचें पत्रलेखन अजीबाद बंदच पडावयाचें. आणि त्या पत्रांचा चाहता वाचकवर्ग–निदानपक्षीं या पत्रांचा संपादकवर्ग तरी–पत्रलेखि-केच्या पुढील पत्रास निष्कारण मुकावयाचा.

संपादक

# रसिकवरांचे अभिप्राय.

**कविश्रेष्ठ श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे. :—**

शालिनीचीं पत्रें...बरीचशीं...आहेत.......त्यांतील कांहीं मी वाचलीं आहेत. तीं क्रमशः प्रसिद्ध करण्याचा रा. गोविंद बळवंत माकोडे यांचा हेतु आहे. उच्च कुळांतील सुशील स्त्रियेचें अंतरंग...प्रकट करण्याचा...यांचा उद्देश आहे. पाश्चात्य शिक्षण मिळाल्यानंतरही प्राच्य संस्कृतीचा अव्हेर न करितां पाश्चात्यांचे चांगले गुण घेऊन आमच्या स्त्रियांना कसें जीवन व्यतीत करतां येईल आणि पूर्वपरंपरागत सुसंस्कार कसे कायम ठेवितां येतील.......या दिशेनें केलेला हा प्रयत्न स्तुत्य आहे. भाषा गोड...आहे.

**प्रो. बाळकृष्ण रामचंद्र बोकील, एम्. ए.:—**

शालिनीचीं पत्रें माझ्या वाचण्यांत अनेक आलीं. त्यांत जुन्या नव्या संस्कारांनीं मंडित असलेल्या कुलीन स्त्रीच्या हृदयाचें सुंदर प्रतिबिंब आपणांस पहावयास सांपडतें. पत्रांची भाषा गोड, घरगुती आणि चटकदार आहे. हीं पत्रें खंडशः प्रसिद्ध करण्याचा रा. गोविंद बळवंत माकोडे यांचा उपक्रम प्रशंसेस व उत्तेजनास पात्र आहे. हीं पत्रें प्रत्येक कुटुंबानें संग्रह करण्यास योग्य आहेत.

**प्रो. विश्वनाथ शास्त्री द्रवीड, एम्. ए.:—**

शालिनीचीं पुष्कळशीं पत्रें माझ्या वाचण्यांत आलेलीं आहेत. जुन्या नव्या आचारविचारांचें मधुर मिश्रण जिच्यांत झालें आहे अशा एका शीलसंपन्न, सुसंस्कृत व प्रेमळ कुलवधूचें अंतःकरण प्रत्येक पत्रांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें. आईबापांनीं आपल्या सुनालेकींस, पतींनीं आपल्या प्रिय पत्नींस, आणि भावांनीं आपल्या प्रेमळ बहिणींस, देणगी म्हणून देण्यास हीं पत्रें अगदीं योग्य आहेत. सर्वांस सोईचें पडावें म्हणून अल्पमोली खंडांत हीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा रा. गोविंद बळवंत माकोडे यांचा हा उपक्रम स्तुतीस व उत्तेजनास पात्र आहे.

# संपादकीय निवेदन.

शालिनीची शक्य तेवढी पत्रें गोळा करण्याचें काम अद्यापिही चालूच आहे.

सध्यां उपलब्ध असलेल्या पत्रांतील निवडकच पत्रें प्रसिद्ध करण्याचें ठरविण्यात आलें आहे.

या निवडक पत्रांचीही संख्या बरीच असल्यानें ती खंडशःच प्रसिद्ध करण्यांत येतील.

पत्रांतील उल्लेखिलेल्या विद्यमान व्यक्तींचीं मूळचीं नांवें सर्वच बदलून टाकून त्याऐवजीं निव्वळ काल्पनिक नांवें घालण्यात आलीं आहे.

पत्र कोणाला लिहिलें आहे याचा बोध पत्रावरून सहज होत असल्यामुळें पत्राला मथळा देण्याची आवश्यकता वाटली नहीं.

पत्राच्या आरंभीचे व अखेरचे मायने गाळण्यांत आलेले आहेत.

पत्रें शक्य तोंवर कालानुक्रमानें दिलीं आहेत. पण हा निर्बंध कसोशीनें पाळण्यांत आलेला नाहीं. ह्मणून पत्रांच्या मिति (तारखा) दिल्या नाहींत.

त्याचप्रमाणें ज्या ठिकाणाहून पत्रें लिहिलीं गेलीं त्या स्थळांच्या उल्लेखाचें तादृश महत्व नसल्यामुळें त्यांचे निर्देशही गाळले आहेत.

पत्रांतील मजकूर स्पष्ट करण्यासाठीं अवश्य तेथें टीपा दिल्या आहेत. या टीपांची सर्व जबाबदारी केवळ संपादकावर आहे. पण सर्वच ठिकाणीं असें स्पष्टीकरण करणें शक्य झालें नाही. कारण स्पष्टीकरणासाठीं अवश्य ती माहिती पत्रलेखिकेवांचून इतरत्र मिळणें अशक्य होतें.

॥ श्री ॥

' गृहिणी गृहमुच्यते '

# शालिनीचीं निवडक पत्रें.

१

वन्सं, काय लिहूं तेंच मेलं समजत नाहीं. नाहीं म्हटलं तर इकडून असा आग्रह चालला आहे की कांहीं पुसूं नये. कांहीं ना कांहीं लिहिण्याविषयीं रोजचं मागें दुमणं असतं. तशांत काल तुमचं पत्र आल्यापासून तर माझी सारखी पाठ पुरवली आहे. सुचत नाहीं म्हणून म्हटलं तर ' तुझ्या जें यावेळी मनांत असेल तेंच लिही. कांहीं लोकांना नाहीं ना लिहायचं ? अन् नावं ठेवलीं, ठेवतील; त्यांत एवढं भिण्यासारखं तें काय आहे; असं जें एक त्यावर पुराण सुरू होतं तें तर विचारूंच नये. शेवटीं बसलेंच मी एकदांची हें पत्र लिहायला. एक घटका झाली; पण अजून हें संपत नाहीं. एक, दोन, तीन कागद झाले. न आतां हा चवथा आहे. तेव्हां आतां कुठें हें थोडं वळणावर आलं आहे. बोटं देखील अगदीं तुटायला आलीं. मनांत असं कांहीं वाटतय् या वेळेस की सांगायची सोय नाहीं. पण कसं करायचं ? जवळ असायचं म्हणून हें सगळं निमुटपणें सहन करावं लागत आहे. बरं, हें चांगलं पहाणं होत असून मनांतल्या मनांत

हंसायच चालळं आहे. पण कांहीं सांगायच मात्र नाही. आपण कांहीं विचारलं तर उलट आणखी चेष्टा करायची, कीं, दुसरं मनुष्य खिशाण होऊन पुन्हां त्याला विचारायला धीरच होऊं नये तुम्हीच सांगा, वन्स, इतका का माणसाचा अंत पहावा ?

खरंच गडे, तारावहिनींच्या इंदूचं नुकतंच बारसं झालं, ती हकीकत बरी होती लिहायला, पण इतका वेळ ध्यानांतच आली नाहीं. आता झोंपेसाठीं डोळे अगदीं चुरुचुरु लागले आहेत. तेव्हां ती पुढच्या खेपेसच लिहीन. आणखी ही संधिही बरी आहे. वाचतां वाचतां अनायासें डोळा लागला आहे. तर, हें पत्र आतां असंच घडी करून पाकिटांत घालून बंद करून टेवतें, म्हणजे झालं.

२

नको गडे, मला असं कांहीं करायला सांगू नये. मला भारी ही वाटते. इकडे तेवढं वाटतं, न् आम्हाला नाहीं वाटत, असं कांहीं नाहीं. पण, मला कीं नाहीं तें नाहींच साधत. पुष्कळ आपलं मनांत येत, पण, बाई, धीरच होत नाहीं. अशी एकादी संधि फुकट गेली, कीं मागून किती किती वाईट वाटतं. गेल्या खेपेस इथें असायचं तेव्हां, अमळ एवढं चुकलं तर वन्संनी न् मोठ्या बाईंनीं दोन दिवस मला अगदीं सळो का पळो करून सोडलं. त्यावेळीं जें काय मला खिशाण्यासारखं झालं तें कांहीं पुसूंच नये. तेव्हांपासून कानाला अगदीं खडा लावला, कीं इथें असल्यावर दिवसां तिकडे अगदीं

फिरकायचं देखील नाहीं म्हणून. आहे ना आठवण त्याची? मला अजून असंच वाटतं की कीं, इकडचंचि त्या दोघींनां कांहीं तरी फूस असावी. न् तशीच आजही ती नसेल अशी तरी खात्री कुणी द्यायची? तें कांहीहीं असलं तरी मला सांगायचं म्हणून एवढंच कीं, लिहून धाडलेल्या गोष्टींपैकीं माझ्या हातून किती पार पडतील तें कांहीं मला सांगतां येत नाहीं. आपल्याकडून होईल तितकं मी करतेंच आहे. पण एखादी गोष्ट न झाली म्हणून रागवायचं मात्र नाहीं. इकडचं आपलं ठीक आहे. पण आम्हां सासुरवासिनींना चहूंकडून पहावं लागतं. आणि मी म्हणतें, एक सासुरवास नसला म्हणून घरांतल्या वडील मंडळींची मर्यादा नको का पाळायला? अलिकडच्या काळाकडे पाहून असल्या गोष्टींत त्यांच्याकडून जें दुर्लक्ष्य होतं, त्यांत त्यांचं शहाणपण दिसून येत असलं, तरी, इकडनं नेहमीं जें म्हणायचं असतं की होतां होईल तोंवर त्यांचं मन न मोडतां आपणच आपल्या मनाला अंमळ आळा घालणं, हें तरी आपलं कर्तव्य नाहीं कां? मग हाच न्याय याही बाबतींत लावला तर काय हरकत आहे? कदाचित् माझी परीक्षा पहाण्यासाठीच असं लिहून धाडलं नसेल कशावरून?

रुमालाचीं मला पुरती आठवण आहे हो. त्याच्याविषयीं असं प्रत्येक पत्रांतून लिहायला नको कांहीं. सांगितलेली वेल आणि राघू न् मैना अशी दोन्ही चित्रं काढून पुरतीं झाली. आतां नांवच तेवढं राहीलं आहे. मी इतकी जपत होतें तरी, कसं कोण जाणे, वन्सच्या दृष्टीस तो रुमाल पडलाच शेवटीं. आणि मग काय? त्या दिवशीं

सगळया जणींनी माझी अगदी पुरेवाट करून सोडली. आपल्याही रुमालावर, नाहींतर शालूवर, त्या सांगतील तशी चित्रं काढून देण्याचं माझ्याकडून जेव्हां कबूल करून घेतलं, तेव्हां त्यांनी माझा पिच्छा सोडला.

मी अगोदरच सांगितलं, इकडची जी आवड तीच माझी आवड. मग पुन्हा कशाला मला विचारायचं तें? कीं असं विचारण्या-विचारण्यांत लावणींवर टाकायचा तर बेत नाहींना इकडचा? शालू मला जरी नेसायचा असला, तरी ज्यांच्यासाठीं तो नेसायचा, त्यांच्या डोळयांत जर तो न भरला, तर तो काय कामाचा? बायकांचा सारा साज आपल्या पुरुषांच्याच प्रसन्नतेसाठीं असतो हो. आणि असाच तो असावा म्हणून इकडूनचं ना मागें विरूताईची समजूत घालण्यांत आली?

३

माझ्या पत्राकडे, माई, तुझे सारखे डोळे लागून राहिले असतील. मी रोज विचार करतें, आज लिहीन म्हणून; पण कामामुळें फावेल तर ना? त्यांत मालू न् भालू जिवाला अगदीं जख पडूं देत नाहींत. आतांच मालूला खालीं निजवून वर ही पत्रं लिहायला बसलें. आतां कांहीं झालें तरी हें पत्र पुरं केल्यावांचून मी कांहीं इथून हलायची नाहीं.

माई, आज तूं इतके दिवस सारखी म्हणते आहेस. पण आतां मात्र तुझ्या मनासारखं लवकरच घडून येणारसं दिसतं. या खेपेला

बरकि तुझी इच्छा पूर्ण होण्याचं खात्रीचं लक्षण दिसतं आहे. येत्या सुटींत तुमच्या तिकडेच प्रवासाला निघायचं ठरलं आहे. तेव्हां वाटेंत दोन दिवस तुझ्या घरीच मुकाम करायचा मंडळींचा बेत झाला आहे. आणि मग तुला बरोबर घेऊन तसंच पुढें निघायचं. तुझ्या तिकडे लवकरच याविषयीं पत्र घालायचं होईल. तरी पण मी आपली तुला अगोदर कळवून ठेवतें. एक तर अनायासेंच जर त्याच भागाला जायचं आहे, तर तुला बरोबर न्यायचं, असं मी आपल्या मनाशी ठरवूनच ठेवलं होतं. आणि आमचा प्रवासाचा बेत नक्की झाला तेव्हां मीं ही गोष्ट काढतांक्षणींच सर्वांची संमति एकदम पडली. दुसरं असं कीं दोन दिवसांच्या राहण्यानं तुझं कसलं समाधान व्हायला! हें मला ठाऊक, आणि अधिक राहाण्याची तर सवड नाहीं. म्हणून ही तोड काढली. अशानं आतां दोन्हीं गोष्टी एकदम साधतील.

या आमच्या प्रवासाच बेत कसा ठरला, त्याची हकीकत थोडी गमतीची आहे म्हणून सांगतें. परवां काय झालं—झाले चार पांच दिवस—एक गोंधळी आला. वेडं वाकडं, एकादं गाणं म्हणून हा आपलं डोंक उठवणार असं पाहून मोठया भाऊजींनीं तशीच भिक्षा घालून त्यांला वाटेला लावायला सांगितलं. पण त्याला तो आपला अपमानच झालासा वाटला न् भाऊजींना तो म्हणाला, "भाऊसाहेब, तशीं भिक्षा मी नाहीं घेणार. हवं तर भिक्षा देखील घालूं नका. पण माझ्या म्हाताऱ्याची आठवण म्हणून माझं एक गाणं तरी आपण

एकाच मग मला कांहीं नको." असं म्हणून त्यानं डफावर थाप मारून एक पोवाडा म्हणायला सुरुवातच केली. आणि चमत्कार असा कीं, बघतां बघतां त्यानं असा कांहीं रंग बांधला कीं आमच्या घरचीच काय, पण शेजारपाजारची कुणी पंचवीस तीस मंडळी तिथे जमा झाली. आणि त्या सगळ्यांना त्यानं आपलं गाणं संपे-पर्यंत, एकाद्याला मारून टाकावं, तसं, अगदीं स्वस्थ बसवलं. झाल्या गेल्या गोष्टींचाच पोवाडा तो. पण, तुला खोटं वाटेल, माई, त्यानं त्यांतल्या प्रत्येक माणसाला, जसं कांहीं चालतं बोलतं आणूनच आमच्यासमोर उभं केलं अगोदरच ज्याच्या त्याच्या मागें आपापल्या कामाची घाई. त्यात असा उशीर झालेला. म्हणून त्या वेळेस कुणी कांहीं विशेष बोललं नाहीं, पण संध्याकाळीं जेव्हां पंक्तीच्या वेळेस सारी मंडळी जमली, तेव्हां सहजच या गोष्टीची चर्चा निघाली. आणि होतां होतां इथपर्यंत मजल आली कीं, असे मिळतील तितके पोवाडे, बायकांची गाणीं वगैरे हीं तर शोध कर करून जमवायचींच; पण पहिले महाराष्ट्रांतले न् मग हिंदुस्थानांतले मुख्य मुख्य किल्ले तरी पहावयाचेच. आणि तेही पुन्हां असे कीं प्रत्येक किल्ल्याची बखरींतून, जुन्या कागदपत्रांतून, इतिहासांतून वगैरे, मिळेल तिकडून चांगली माहिती मिळवायची आणि मग तो किल्ला पहायला निघायचं, आणि आपल्या माहितीशी तिथली मग एकेक गोष्ट पडताळून पहायची. आमच्या सदुभाऊजींना या गोष्टींचा भारी नाद आहे. म्हणून त्यांनींच ही सगळीं माहिती गोळा करण्याचं

काम आपल्या अंगावर घेतलं आहे. आणि केव्हांपासून सकाळ संध्या-काळ जेवायच्या वेळेस रोज याच गोष्टींची चर्चा चालू असेत. पण याचा परिणाम काय झाला तो पाहिलास का ? आमची ही एवढीशी चिमुकली मनी, पण ती सुद्धां ऐकून ऐकून इतिहासाच्या गप्पा मारूं लागली आहे. मग तिच्यापेक्षां मोठ्या मुलांची काय स्थिति असेल याची तूंच कल्पना कर.

भाऊजींनी त्या गोंधळ्याची त्याच्या मनासारखीच बोळवण केली. आणि त्याचा न् त्याच्या अशा प्रकारच्या आणखीही स्नेह्या सोबत्यांची नांवगांवं लिहून घेऊन त्यांना बरोबर घेऊन त्याला पुन्हां यायला सांगितलं आहे.

४

ही आपली ज्याची त्याची आवड आहे, चंपूताई. हिच्याबद्दल कुणी कुणाला नांवं ठेवूं नये. पण मला जर विचारशील, तर, मला कीं नाहीं सगळ्या महिन्यांत चैत्राचाच महिना अधिक आवडतो. खरंच सांगू का तुला, मला तर असं देखील वाटतं कीं, हा आपला कधीं संपूंच नये. कुणी काय वाटेल तें म्हणो, पण बाई, याच्या इतकी गोडी आणि मौज मला दुसऱ्या कोणत्याच महिन्यांत वाटत नाहीं. आणि चंपूताई, तूंच आपलं मन नीट पारखून पहा, अन् मग मला खरं खरं सांग, कीं तुला माझ्याच सारखं नाहीं का वाटत तें ? पण चोरूं नकोस गडे. दिवाळी म्हण, संक्रांत म्हण, हे आपले इतर सण,

दोन दोन दिवसांचे, चार चार दिवसांचे कुणीकडे येतात नि कुणीकडे जातात कळत देखील नाहींत. पण या चैत्राच्या महिन्याचं सगळंच आपलं निराळं. ती गौरीची झगझगीत आरास, ते बिलोरी आरसे, ते तऱ्हेतऱ्हेचे पडदे, त्या झालरी, ते हिरवे गार कोवळ्या झुडपांचे कुंडे, डोळ्यांचे पारणें फेडणाऱ्या त्या तसबीरा, मनाला थक्क करून सोडणारे ते नाना प्रकारचे खेळ, तोंडाला पाणी सोडणारे ते लाडू, त्या करंज्या, ते अनारसे, त्या फेण्या, अशी एक का दोन किती तरी पक्वान्नं; आणखी तीं फळं; या शिवाय आपल्या सुवसांना सारं दालन दरवळून सोडणारं तें अत्तरदान, तें गुलाबदान, तें केशरी चंदन, ते कुरमुरे, बत्तासे, त्या काकडीच्या फोडी, त्या खरबुजांच्या फोडीं, तीं विड्याची पानं अशा एक का दोन, हजार गोष्टी आपल्या डोळ्यापुढें थैमान घालतात, आणि मनाला मोहून टाकतात. इतकं कशाला, असंच कां ह्मणूं नये कीं, ही गौरीची आरास म्हणजे प्रत्येक घरच्या चालत्या बोलत्या गौरीनं आपल्या हातानं आपल्याच अंतरंगाची, बहिरंगाची, सजवून ठेवलेलीच आरास होय, गौरीचं आपलं निमित्तं तेवढं; पण खरं म्हटलं तर, प्रत्येक जणीच आपापल्या परीनं आपापल्या संसाराच्या सुखाच्या स्वप्नाचं तें चित्रचं असतं, हें चित्र आपल्या अगदीं मनासारखं, हुबेहूब वठावं म्हणून जिची तिची पराकाष्ठा चाललेली असते. नाहीं का चंपूताई ! आणि त्यांत हळदीकुंकवाला येणाऱ्या त्या लहान थोर बायकांचा शृंगार ह्मणजे आपला, अनुकूल असेल तसं, बिंदी, बिजवरा, कंबरपटयासहित ते दागिने, त्या एके-

कीच्या चंद्रकळा, नाहीं तर रंगारंगाचे शालू, पाहिले ह्मणजे साऱ्या पृथ्वींतला आनंद त्या ठिकाणीं एकवटलेला दिसतो. पण, चंपूताई, हें सारं जरी खरं असलं, तरी या सगळ्या गोष्टी जिच्यापुढे फिक्या पडतील, अशी एक गोष्ट—सांग बरं तूंच कोणती ती ? पण, नको गडे, मलाच सांगूं दे तीं. वर सांगितल्या या साऱ्या गोष्टी इतर सणांत कांहीं कमी, कांहीं जास्ती आपल्या वाट्याला येतातच येतात. पण ही एक मात्र चैत्राच्या महिन्यांतच तेवढी आपल्या वाटयाला येते. हळदीकुंकू घेतल्यावर निरोपाच्या वेळीं नांव घेतांना गोड लाजेनं, फितुरी आतुरतेनं आणि निर्मळ अहमहमिकेनं एकेकीची जी मुरकुंडी वळते, त्या गोडीची इतरांना काय किंमत ? तू अशी मन मोकळं करून मला आपल्या साऱ्या गोष्टी सांगतेस, आणि एवढया प्रेमानं माझ्याही विचारतेस, ह्मणून तुलाच तेवढं खरं खरं सांगतें कीं, मागून गांठ पडल्यावर मला जेव्हां याची सगळी हकीकत विचारायची होते, तेव्हां मीही आपली सगळ्यांच्या सगळ्या गोष्टी आठवतील तितक्या साऱ्याच्या साऱ्या सांगून टाकते, पण तेवढयावर समाधान न होतां माझी स्वतःचीच कथा सांगण्याचा जेव्हां मला आग्रह होतो, तेव्हां, कां, कोण जाणे, अष्टौप्रहर ओठावर नाचणाऱ्या या गोष्टनीच माझ्याहीपेक्षां अधिक लाज वाटून त्या कुणीकडे जाऊन दडतात नकळे. मग त्या लाडक्या आग्रहाकडून गोड धमकीचा, चंचल रुसव्याचा, नाटकी अबोल्याचा लडिवाळ शिक्षेचा, पिंगा घालवून आपली हौस फेडून घेण्यासाटीं त्यांचा हा लपंडाव चाललेला असतो कीं काय कुणी सांगावं ? आणि असा हा

खेळ सारखा महिनाभर तरी निदान चालतच असतो. मला तर बाई नेहमी असंच वाटत असतं कीं, ब्रह्मदेवानं बाकीचे सारे महिने चैत्राचेच कां नाहीं केले? एकूण ब्रह्मदेवाच्या हातूनही चुका होतातच म्हणावयाच्या!

५

खरंच वहिनी, तू म्हणतेस तेच खरं. साऱ्या जगाचाच आधार जर प्रेम आहे, तर आपलाही तें कां असू नये? आईबाप, बहिणभाऊ मायलेकी, नवराबायको अशीं जीं आपल्याला जगांत जोडपीं दिसतात, ती तरी या निव्वळ प्रेमामुळेचना? एरवीं कोण कुणाच? देवानं हें सगळं जग प्रेमसूत्रानं कसं अगदीं जखडून टाकलं आहे. आपण, निरनिराळीं फुलं गोळा करून, त्यांचे गेंद गुंफून ते गेंद एक ठिकाणीं दोऱ्यांत ओंवून हार नाहीं का करीत? तसंच; हें जग अगदीं तसंच आहे; म्हणजे हारासारखंच आहे; या जगांतले निरनिराळे देश, हे त्या हारातले गेंद, त्या देशातलीं निरनिराळीं कुटुंबं हीं त्या गेंदातलीं फुलं, आणि कुटुंबांतलीं निरनिराळीं माणसं, त्या फुलांतल्या पाकळ्या; आणखी, शुद्ध, सात्विक, प्रेम हें त्या सगळ्यांना एके ठिकाणी ओंवणारं सूत्र.

खरं प्रेम म्हणजे एक आईचं, किंवा अगदी कह्यानपणीं मुलाचं. रागाच्या भरांत एकाद वेळ दोन रपाटेही जरी आईनं आपल्या सोनुल्याच्या पाठीवर ओढले तरी थोड्या वेळानं लागलीच ती त्याला पोटाशीं धरल्यावाचून राहणार नाहीं. तसंच, अनेक

वेळां जरी आई बोलली, रागावली, तरी, कोणी कांहीं बोलकं किंवा गोंजारलं, कुठें कांहीं चमत्कार पाहिला किंवा भय वाटलं, तर तें आपलं गाऱ्हाणं, आपलं सौख्य, आपला आनंद किंवा आपली भीति पहिल्या प्रथम आपल्या आईलाच सांगेल. आणि तिनं एकदां प्रेमानं मुका घेऊन त्याच्या मानासारखे दोन शब्द उच्चारले कीं त्याच्या धन्यतेला पारावार राहत नाहीं. हें प्रेम नेहमीं उपजतच असतं. वहिनी, जिव्हाळ्यावांचून कां हें असलं प्रेम किंवा हें असलं वात्सल्य उत्पन्न होत असेल ? सहवासाला, प्रियवस्तूच्या सुखासाठीं तिळतिळ तुटणाऱ्या जिवाची जोड मिळाल्यावांचून का हा असला जिव्हाळा उत्पन्न होत असेल ?

दुसरंही एक प्रेम असतं; त्याचा पहिल्यापहिल्यानं आपलंच हित पाहायचं, असा उद्देश असतो. तरी, एकमेकांना बरं वाटण्यासारखं एकमेकांच वर्तन होत असलं म्हणजे त्यांचं प्रेम हळूहळू वाढत जातं. तें इतकं की पुढें ते परस्परांच्या सुखासाठीं झटण्यांत स्वत.:- काही विसतात. त्यांच्या चित्तवृत्ति एकमेकांकडे इतक्या ओढल्या जातात कीं दुसऱ्याचं सुख तेंच आपलं सुख, दुसऱ्याचं दुःख तेंच आपलं दुःख असं दोघांनाही होतं; आणि तेही क्रमाक्रमानं, अगदीं न कळत. असं प्रेम म्हणजे एक काय तें खऱ्या मित्राचं.

आतां पतिपत्नीमधलंही प्रेम अशाच प्रकारचं असतं. पण यांत व त्यांत अमळ फरक आहे. मित्र प्रेमाची उत्पत्ती अगोदर स्व-

हितांत होऊन मग मनाशी मन मिळतां मिळतां त्यांतलं तें स्वहित आपोआप नाहिसं होतं. म्हणजे, पहिल्यानं दोघांत भेद असतो; ते पुढे सहवासानं न् सद्वर्तनानं अगदीं नाहींसा होतो. हें होण्यासाठीं अगोदर परस्परांच्या शुद्धअंतःकराणाची एकमेकाला पूर्ण खात्री पटावी लागते. ती पटल्याखेरीज त्यांची चित्तवृत्ति इतकी एक बनत नाहीं. परंतु पतिपत्नींच्या परस्परावरील प्रेमाला आरंभच मुळीं विश्वासांत, ममतेंत, एकमय चितवृत्तींत, इतकंच नाहीं, तर जीवांच्या एकतानतेंतच होतो. लग्नाची रेशमी गांठ एकदां घातली गेली कीं पतिपत्नि म्हणजे दोन निरनिराळ्या व्यक्ति, असा भेदच त्यांच्यांत राहत नाहीं. शरीर भिन्न असलं तरी स्वतःइतकंच ते दुसऱ्याला मानतात. लग्नाच्या गांठीनं पतिपत्नि इतके आवळले जातात की त्या दोघांची मिळून एकच व्यक्ति बनते, आणि मग दोघांच मिळून एकच चरित्र होतं. स्त्रीपुरुषांतल्या नैसर्गिक भिन्नतेमुळेंच पतिपत्नीच्या या एकजीवित्वाची एवढी थोरवी वाटते. ज्याला कधीं पाहिलं नाहीं, ज्याचे आचार, विचार व मन यांची स्वप्नांतही ओळख नाहीं, अशा अगदीं नवख्या मनुष्याच्या ठिकाणीं आपल्या पवित्र प्रेमाचा प्रवाह मोकळा करून त्याला सर्वस्वी आपलं करून टाकणं, यापेक्षां अधिक उदात्त काय बरं असेल ? सुखाची सावली असो किंवा दुःखाचा वणवा असो, नेहमीं पतीच्या हातांत हात घालून मोठ्या आनंदानं सर्व गोष्टींत त्याची विभागी होणाऱ्या आपल्या या आर्यस्त्रीच्या तोडीची स्त्री जगांत दुसरीकडे कुठे आढळेल ?

ही झाली खऱ्या प्रेमाचीं उदाहरणं. याशिवाय आणखीही एक प्रेम असतं. प्रेम कसलं, प्रेमाचा भासच तो. व्यवहारांत त्याला लोभ किंवा घरोपा म्हणतात. संपत्तीचा ओलावा असेल त्याच जागीं या प्रेमाला अंकुर फुटतात. जसजसा तो ओलावा अधिक असेल तसतशी यालाही हिरवीगार, मोहक अशी पालवी फुटते. अकिंचनतेचं ऊन याला अगदीं सहन होत नाहीं. त्याचीं एक दोन किरणं पडतात न् पडतात तोंच याची टवटवी नाहींशी होते, पानं जळून गळून पडतात, आणि बींही लवकरच अंतर्धान पावतं. या प्रेमाचा इकडे भारी तिटकारा आहे. तशांत आलेकडे अशाच कांहीं गोष्टी घडून आल्या-मुळें त्यांत आणखी भर पडली आहे.

परवां प्रेमावरच आमचं बराच वेळ बोलणं चाललं होतं. त्यांतल आठवलं तसं लिहिलं आहे. पुष्कळशा गोष्टी राहून गेल्या असतील; आणि कांहीं इकडच्या तिकडेही झाल्या असतील. होवोत बाई.

६

दिनूची मूंज. खरंच बाई कार्याचं काम म्हणजे असंच असायचं. सारा भार काय तो एकटया कर्त्या पुरुषावर. दहा घरचीं दहा माणसं यायचीं, इतक्यांची मर्जी संभाळायची, त्यांचा बेत ठेवायचा, त्यांच्याकडून कामं करून घ्यायची, हें लहानसहान किंवा सोपं का आहे ? त्यांना जर

बोलवायचं तर नको का त्यांचा संतोष राखायला ? रीतीप्रमाणें सगळ्यांचं सगळं झालं पाहिजे न् आपलं कामही उरकलं पाहिजे. कार्याच्या कामाला दहा जणांचे दहा हात लागल्याखेरीज एकट्याच्यानं कसं व्हायचं तें ? म्हणून सगळ्यांची गरज लागते. आणि आपल्या गरजेसाठीं ज्यांना बोलवायचं, त्यांच्या मनाप्रमाणें थोडं फार नको का मग घ्यायला ? त्यांत थोडा पदराला खार लागला, म्हणून मागें पुढें पाहून कसं चालेल ? माई, तूंच सांग बरं, अशी मंडळी वरचेवर का जमतात. कधीं काळींच असे प्रसंग यायचे. त्यांत तीं आपल्यासाठीं म्हणून सगळ्या अडचणी बाजूला सारून येतात न् चार जणांत कार्याला शोभा आणतात, मग आपलींच सगळी सोय पाहून कसं चालायचं ? अगत्यानं आपण ज्यांना बोलावतों, आणि जे आपल्यासाठीं म्हणून प्रेमानं येतात, त्यांच्याशीं अगदींच सडेतोडीनं कसं वागता येते ? आणि करणींत जर अगत्य नाहीं, तर नुसत्या वाणींतल्या अगत्याला करायचं तरी काय ? तिकडे मी अगोदरच सांगून ठेवलं होतं, आपल्याच्यानं ज्यांची व्यवस्था राहील, तेवढींच माणसं बोलवायची. उगीच सगळ्यांना गोळा करून जनांत आपलं हंसं व्हायला नको. आता हें खरं कीं, सगळंच गोत आपलं, तिथे टाकायचं कुणाला न् बोलवायचं कुणाला ? शिवाय अशाच प्रसंगांनीं सगळ्यांच्या गाठी पडतात, लोभ वाढतो, हेंही पण माझ्या लक्षांत नाहीं, असं नाहीं. पण बाई, आपल्याला अनुकूल असेल तेवढंच करावं. पण जें काय करायचं तें मात्र नीट नेटकं, जिथल्या तिथे,

झालेलं चांगलं. उगीच आपला पसारा वाढवून गोंधळ घालायचा, त्यांत काय अर्थ ? घरांतल्या किरकोळ गोष्टी साठीं स्वारीनं भरपूर रकम माझ्या हातावर टाकून "यांत तुला काय वाटेल तें कर, म्हणून सांगितलं आणि बाकीच्या गोष्टी स्वतःकडे घेतल्या. मग मी तरी कशाला कमी करूं ? पाहिलंचं कार्य—मी म्हणते, नसलं पहिलंवाहिलं कार्य म्हणून काय झालं ? अनुकूळ असल्यावर आपल्या नात्यागोत्याच्या मंडळींना असल्या प्रसंगीं नाहीं बोलवायचं, तर मग केव्हां बोलवायचं ? एरवीं का कुणी कुणाच्या घरीं जातं ? म्हटलं, सवड आहे नाहीं नाहीं. तर, दोन दिवसांची हौसच मात्र व्हायची. म्हणून, स्वारीला, जशी सवड असेल तसंच आपलं कार्य व्यवस्थेनें उरकून घ्यावं, आवरणार नाहीं असा पसारा घालूं नये, असं सांगितलं. स्वारीनंही असंच अगोदर आपल्या मनाशीं ठरवून ठेवलं होतं. त्याप्रमाणें कार्यासाठीं म्हणून स्वारीनं निराळे रुपये काढून ठेवले. आणि त्याशिवाय, किरकोळ घरांतल्या गोष्टींसाठीं वर सांगितल्याप्रमाणें भरपूर पैसे माझ्या हवालीं केले. आणि गरज लागली तर आणखीही देण्याविषयीं सांगितलं. येतील तितक्या मंडळींची चहापाण्याची, फराळाअराळाची, मानापानाची नीट व्यवस्था ठेवायची, कुणाला दुखवायचं म्हणून नाहीं, असं मला आणखी तिनतिनदा बजावलं आहे. मग कुणाकुणाला बोलवायचं म्हणून जेव्हां मला विचारायचं झालं, तेव्हां मीही म्हटलं, बोलवायचं सगळ्यांना म्हणून. सगळे सगळे तरी असे कोण आहेत ? दोघी वन्स न त्यांच्या घरचीं मंडळी हीं आलीच पाहिजेत. आतेसासुबाई,

मामेसासुबाई, यांच्या घरांतलं कोणतंही मनुष्य टाकतां येत नाहींच. बरं, तीघीही बाईच्या माहेरच्या मंडळींना वगळणं कसं चांगलं दिसतं? त्यांनीं तरी कोणत्या निमित्तानं आपल्या घरीं यायचं? सोमपूर चंद्रपूरच्याच चार घरांना मग कसं सोडतां येईल? खरं म्हटलं तर त्यांना दोहींकडचं भाडं सुद्धा दिलं पाहिजे. पण सध्या येण्यापुरते सगळ्यांना पैसे पाठविले आहेत. जायचंही बहुत करून भाडं द्यायचं ठरवलं आहे. असं बाई मी सरसकट सगळ्यांना रीतीची मूळ चिठ्ठी न् अगत्याचं एकेक पत्र घालायच म्हटलं आहे. तितक्यांना पत्रं न् चिठ्या जातील; न् सगळी मंडळी येतील अशी मला खात्री आहे. कारण इकडून सगळ्याशीं आपलं गोड असायचं; कोणाशीं कांहीं रुसवा नाहीं कीं फुगवा नाहीं. एकंदर दीडशे, अधिकच पाहुणे मंडळी जमतील. याशिवाय गांव परगांवचीं मित्र मंडळी न् ओळखदेखी त्या निराळ्याच. आठ पंधरा दिवस घर कसं गजबजलेलं दिसेल! आमचं घरंही अगदीं मोठं, मोकळं आहे. कांहीं अडचण पडायची नाहीं, किती ही मंडळी आली तरी. पण एवढ्या मंडळींत, माई, तुझं जर येणं होतं, तर किती चांगलं झालं असतं? शिवाय माझ्या शिरावरचं अर्धे अधिक काम कमी झालं असतं. बाळंतीण झाल्यामुळें यायला व्हायचं नाहीं म्हणून जेव्हां तुझं पत्र आलं, तेव्हां स्वारीची सुद्धा किती निराशा झाली! तुझ्या करितां तीथ वाढवावी म्हणून मी म्हणण्याच्या अगोदरच स्वारीनं खटपट केली होती. पण हीच तीथ शेवटची निघाल्यामुळें सगळ्यांचा अगदीं निरुपाय झाला. नाहीं

तरी यावेळीं तुझी घाईच झाली. गेल्या खेपला नव्हते का तुझे दहा महिने पुरते झाले ? प्रभाच्या वेळेसही असेच तूं बरोबर साडेदहा महिने घेतलेस. या खेपेला तर नववाच महिना तूं जेमतेम पुरता केलास. मला जर असं ठाऊक असतं तर, आतां, मधें तूं जेव्हां येऊन गेलीस, तेव्हांच मी तुला ठेवून घेतली असती. हेंच, तूं एक पंधरा दिवस अगोदर किंवा पंधरा दिवस मागून झाली असतीस तरी किती सोय झाली असती ! असो, योगायोग नसला म्हणजे कांहींना कांहीं निमित्त घडतंच आपलं. एवढं जवळ कीं, असं मनुष्य सकाळीं जातं, न् घटका दोन घटकेंत आपलं काम उरकून संध्याकाळाला आपल्या ठिकाणीं माघारं येतं. पण कांहीं उपयोग नाहीं. बरं, पण, नाहीं तुझं येणं होत, तर राहूल. असं तरी निदान कर कीं, वेळांत वेळ काढून मी तुला पत्रानं रोजची हकीकत कळवीत जाईन. तिच्यांत तुला कांहीं अधिक उणं वाटलं तर ताबडतोब कळवीत तरी जा. अनायासें सोय आहे इतकी, म्हणून म्हणतें. माझा जीव सदा धांदलींत असणार. तेव्हां एकाद्या गोष्टींत सहज आपली चूक व्हायची. न् मग थोडक्या करतां एकाद्याचा शब्द यायचा. आहेत म्हणा तशा उमावन्स, रमावन्स; उघडं नाहीं पडूंद्यायच्या तसं कांहीं. पण उमावन्सचा स्वभाव पडला थोडा भोळाभाबडा त्यांच्या लक्षांत सगळ्या गोष्टी येतीलच असं नाहीं. आणि रमावन्स चाणाक्ष खऱ्या. पण जरा बेफिकीर आहेत. तेव्हां त्या लहानसहान गोष्टींत कळून सवरून सुद्धा मन घालतीलच, असं नाहीं. आलंच मनांत तर मग गोष्ट निराळी.

म्हणून म्हणते कीं, एवढं तरी तूं कर. एकदा हे चार दिवस पार पडले कीं, माझा अर्धा जीव निसूर होईल.

७

आतां कायते वीस दिवस राहिले. या रविवारपासून पाहुणे मंडळी यायला लागतील. आजच्या बरोबर पांचवे दिवशीं मामंजी, सासुबाई, दोघी वन्स, (त्या सध्या माहेरींच आहेत) न् आतेसासुबाई इतकी मंडळी येणार. राहिलेली त्यानंतर एकदोन दिवसांनीं सवडी सवडीनं येणार आहेत. त्यांच्यासाठीं समोरला गच्चीवरला बंगला न् त्यालाच लागलेल्या दोन तीन खोल्या झाडवून, सारवून, अगदीं साफसुफ करून ठेवल्या आहेत. आतां ते केव्हांही येवोत. जवळच गच्चीच्या पलिकडे स्वारींचा दिवाणखाना आहे. अशानं आतां स्वारीला घरांत लागलं सवरलेलं पाह्यलाही होईल. न् तिकडे सगळ्या मंडळीकडे लक्ष द्यायलाही होईल भाऊजींपैकीं एक जण जरी इथे असते तरी तीकड पुष्कळच काम वाचलं असतं. पण मोठ्या भाऊजींना लवकर रजा मिळेना. आणि धाकट्यांची परीक्षा निघाली. परवांच त्यांची परीक्षा संपते आहे. ती संपली कीं, ते परभारेंच मुंबईहून इकडे येणार आहेत. कांहीं मित्र मंडळीही त्यांच्या बरोबर येणार आहेत. म्हणून त्यांना एकादा दिवस कदाचित उशीरही लागेल.

तरी सोमवारी संध्याकाळपर्यंत ते खास येतील. त्यांना न् त्यांच्या मित्र मंडळींना वरचा बंगला ठेवला आहे. त्यांत नवीन घेतलेल्या खुर्च्या, मेजं, वगैरे सामान आयतंच आपलं ठेवलेलं आहे. राहिलेल्या मंडळींची व्यवस्था जुना बंगला न् परसावरची माडी यांत केली आहे. खालचं सगळ घर पंक्तिबैठकीसाठी केलं आहे. पुढल्या चौकांतल्या बाहेरल्या दालनात मंडळींची न् आंतल्या दालनांत बायकांची बैठक राहील. तुला ठाऊकच आहे, हीं दोनीही दालनं बाहेरच्या बाहेर असून बायकापुरुषासाठीं दरवाजेही निरनिराळे आहेत. मधल्या घरांत सकाळचा चहा न् फराळ आणि परसांत मोठास्वयपाक. स्वयंपाकाच्या जागेजवळच पण थोडा अडोसा ठेवून भितीच्या बाजूला अंगणांतच कूड घालून कोठार ठेवलं आहे. अंगण बरंच मोंठ असल्यानं कुडाची कांहींच अडचण वाटत नाहीं. उन्हा-साठीं चांगले उंच खांब ठोकून मजबूत तट्टा घातला आहे. तट्टा मुद्दाम भितीच्या बराच वर घेतला असून भितिच्या बाहेर हात दीड हात अधिकच ठेवला आहे. त्यालाच जोडून खांबावर आधार देऊन निमुळता असा आणखी आडवा तट्टा दिला आहे. त्यामुळें उनाड कढल पडून न् वारंही चांगलं खेळून उन्हाची एक तिरीपही आंत येत नाहीं.

हीं अशी व्यवस्था मी मुद्दामच केली. स्वारीला दिखील माझं म्हणणं पटलं. मामंजीसासुबाइकडे जो भाग आहे तो दोन्ही तिन्ही खोल्या, दालन वगैरे मिळून एकच आहे. वन्स, आतेसासुबाई वगैरे मंडळी हीं त्यांचीच आहे. तेव्हां सगळेजण आपसांत आपली

सगळी सोयी लावून घेतील. मीच एकेकाची निरनिराळी सोय लावूं लागलें, तर, इतकी जागा कुठून आणायची आणि सगळ्यांची सारखी सोय तरी कशी लागायची ? मग कुणी म्हणेल, आम्हाला एकीकडचीच खोली दिली, कुणी म्हणेल आम्हाला मोरीच नाहीं, असं आपलं कुणी कांहीं कुणी कांहीं कुरकुरत राहणार. चार दिवस मंडळी राहयची तर ती गुण्यागोविंदानं राहिलेली बरी. आपल्या दिराला कसा बंगला दिला, नणदेला कशी गच्चीजवळ जागा दिली, अशीं उणीपाणी बोलणीं नको कुणाची ऐकायला. पुन्हां प्रत्येकाच्या बरोबर ज्याचीं त्याचीं मुलंलेकरं आहेतच. तेव्हां त्यांत कुणी रडेल, कुणी ओरडेल, कुणी कुणाची खोडी करील, कुणी कुणाला मारील असे अनेक प्रकार चालायचे. हें असं एकाचं दुसऱ्याला कसं खपायचं ? ज्यांचे ते एक असले म्हणजे त्या सर्व गोष्टी आपल्या आपण मुकाट्यानं सहन करतात. पण तेंच दुसऱ्याचं असलं म्हणजे खाराखूरी सुरू होते. आतां, हे सगळे एकच आहेत, तेव्हां कुणी कुठे बसायचं, निजायचं, पोरांना कुठे खेळवायचं, आपआपल्या चीजवस्ता कुठे ठेवायच्या, कशा संभाळायच्या हें आपआपसांत ठरवून घेतील. हो, नाहींतर मग कसं करायचं, माई ? तूंच सांग. ऐन वेळीं आल्यागेल्यासाठी भरपूर जागा ठेवुन सगळ्यांना पुरून उरेल एवढी जागा मी प्रत्येकाला दिली आहे. चांगलं ऐस पैस वावरतां येईल. पण अमक्यानं इथे बसावं, तिथं निजावं, हे मी कुठे आपल्या अंगावर घेऊं ? असं केलं तर, दहा वाडे सुद्धां पुरणार नाहींत. आणि एकेकाची रुसणीफुगणीच

निस्तरता निस्तरता दिवस थोडा व्हायचा.

हें झालं इकडच्या मंडळींच. आतां माहेरच्यांचं सांगते. दादाचं नुकतंच पत्र आलं, सगळया मंडळींना मी लवकरच घेऊन येतों म्हणून. मला काळजीच होती, त्याला रजा मिळते न मिळते अशी. पण झाली ती दूर एकदाची. दादाबरोबरच आई, वहिनी, भाऊ, रंगू न् चिमी इतकी मंडळी येणार आहेत. त्यांच्यासाठीं वरल्या आमच्या देवघराजवळचं दालन न् खोली मोकळी करुन ठेवली आहेत. आपली फार एकीकडेही नाहीं. किंवा कुणाच्या मधेही नाहीं. फक्त बाबासाठीं मात्र विनूची खोली रिकामी केली आहे. तेवढी ती त्यांना पुरे होईल. नाहीं तर कसं करायचं मग ? सासरच्या मंडळींना टाकून माहेरच्या माणसांची सोय कशी पाहतां येते ? घरचीच मंडळी आहेत, तेव्हां त्यांचं आपलं कसंही असलं तरी चालेल. पण तिकडची मंडळी पट्कन् आपलं उणंच काढायची ? माझं आपलं एक असो. कुणी कांहीं मला बोललं, तर मी तें सहन करुन घेईन. पण एवढंस जर का कुठे चुकलं तर तिकडे अगदीं च्याव च्याव करुन घेतात. अगोदरच कमी का आहे ? थट्टेतंच का होईना, माझ्यादेखत बाईलबुद्धि तर म्हणतात. आणखी आतां काय राह्यलं आहे. कांहींच नसताना इतकं आहे, तेंव पुरे आहे. तरी बरं; तुला नाहीं का ठाऊक ? मागें एकदां मुंबईहून स्वतः हौशीनं साठ रुपयाला एक कंपाची जोडी आणली होती. त्यापैकीं एक मी रोज दिवाणखान्यांत लावीत असे. त्यावेळीं धाकटे भाऊजी इथेच होते. त्यांचं वय काय, नी शक्ति काय, तुला ठाऊकच आहे. धोंडीबा रोजच्याप्रमाणें बाजारांत गेला

होता. म्हणून त्यांनीं स्वतःच तो लॅंप कांहीं कामासाठीं सहज उचलला. तो त्यांच्या हातांतून निसटून खाली पडला न् फुटला. तें त्यांनीं आंत येऊन मला सांगितलं. घरांत कुणीच नव्हतं. मग मीच मुकाट्यानं कांचेचे तुकडे वेचून बाहेर एकीकडे फेकले. आणि तेलानं चादर सत्रंजी भरली होती ती बदलून नवी घातली. " हपीसांतून घरीं यायचं झालं म्हणजे असाच एक दुसरा लॅंप आहे, तो लावून देईन बरं वाचायला रात्रीं, " असं मी भाऊजींना सांगितलं. पुढे वेळ झाली तसे ते रोजच्याप्रमाणें बाहेर फिरायला गेले. इकडे मीही आपली म्हाळसाकाकू स्वतः आल्या होत्या म्हणून त्यांच्याकडे हळदीकुंकवाला गेले. पाव घटका सुद्धां मला लागली नसेल. पण दैवाची करणी अशी कीं, रोज आठ वाजतां फिरून हिरून घरीं यायचं, तें त्याचदिवशीं स्वारी मधेंच घरीं आली. आणि पोशाख बदलून पुन्हा बाहेर गेली. पण तेवढ्या अवकाशात दिवाणखान्यांचं बदललेलं स्वरूप पाहून स्वारीनं त्याची चौकशी केली. तेव्हां यमूनं " काकांनीं लॅंप फोडला, तेल सांडलं, " वगैरे हकीगत सर्व तिकडच्या कानावर घातली. मीं घरीं आल्यावर मला हें सांगायचं की नाहीं तिनं ? पण ती तें विसरली. बरं, मी तिला विचारावं, तर, मला तरी काय ठाऊक ! तिन्हींसांजा झाल्या तेव्हां मी आपला दिवाणखान्यांत लालटेन लावून ठेवला. कारण जोडीचा लॅंप ताळ्यांत होता. न् किल्ली जवळ होती. पण ही गोष्ट तिकडच्या लक्षांत राहिली नाहीं. मग रात्री जेव्हां घरीं यायचं झालं, तेव्हां दिवाणखान्यांत पाऊल ठेवतांच कंदीलाकडे पाहून

" आज लंप कां नाहीं " म्हणून सहज कपडे काढतां काढतां विचारलं. तेव्हां, " आज लंप फुटला; दुसरा लावायचा, पण किल्ली स्वतःजवळ; आणतेंच मी लावून आतां." असं मी म्हटलं मात्र, तों मुद्रा अमळ पालटली, न् म्हणायचं, " चिंतूच्या हातून लंप फुटला म्हणून वारंवार नको कांहीं मला सांगायला " तिकडचे हे शब्द ऐकले न् मी आपले चुप बसले. मी कांहीं स्वारीला तशा बुद्धीनं थोडीच सांगायला गेले ? पण माझ्याकडे वाक याचचा तो आलाच अखेरीस. हें कुणाला ठाऊक नाहीं, असं नाहीं. आणि असं असून सुद्धां मला सगळ्यांचीं हीं अशी बोलणीं. म्हणून मी आपल्याकडून होईल तितकं जपूनच वागते.

८

आतां मला किती हलकं जातं आहे ? हंगाम केला त्याचवेळीं डाळीतांदुळासुद्धां धान्यधुन्य आणि मीठ, मिरच्या, मोहऱ्या, हिंग, मसाल्यासुद्धां किरकोळ सामान भरपूर भरून ठेवलं होतं. जसंजसं सामान येत गेलं, तसतसं मी शेजाऱ्यापाऱ्यांपैकीं एकेकीला, दोघी-दोघींना, असं जरूरीप्रमाणें हाताखालीं घेऊन, निसून, कांडून, कुटून, निवडून, पाखडून आजपर्यंत सवडीसवडीनं सगळं साहित्य तयार करून ठेवलं. आटा, पिठी, बेसन, रवा, मैदा, तांदळाचं पीठ,

मुगाचं पीठ, सत्तू, पोहे, भाजणीचं पीठ वगैरे, हेंही अळिकडे करून ठेवलं. बिचाऱ्या सगळ्याजणी कशा धडाताव देऊन झटतात. जें जें सांगावं, तें तें अगदीं काटाकाळजीनं करून पुन्हां दुसऱ्या कामाला मोकळ्याच्या मोकळ्याच. मलाच बाई, आतां यांना काम तरी काय द्यावं, म्हणून पंचाईत पडे. अशा रीतीनं जर त्या आपल्यासाठीं एवढा जीव लावून झटतात, तर मग, आपल्याला नको का त्यांचं कांहीं स्मरायला ? आपल्याकडून जास्त काय व्हायचं आहे ? म्हणून मी आपली त्यांना निमित्तानिमित्तानं कधीं जेवायला सांगून, कधीं नवीन कांहीं झालं तर त्यांच्या घरी पोंचवून, कधीं त्यांच्या मुलाबाळांना खाऊ वगैरे देऊन, असं आपले दर वेळेस कधीं कांहीं, कधीं कांहीं, करून त्यांना लावून ठेवते. उसनपासनं जर कुणीं मागायला आलं, तर, जशी वस्तू असेल त्या मानानं पण थोडी अधिकच घालतें. आणखी, आमच्या इथे असल्या गोष्टींत बरीच सवड असते. कारण, दिलं, दिलं; न दिलं, न दिलं; कमी वगैरे जेवढं आपलं परत, येईल तेवढंच; असं सदा चालतं. असं असून ही इकडचा बाई भारी धाक वाटतो, कुणी मागायला आलं न् घरांत असून न दिलं म्हणजे, नेहमीं आपलं म्हणायचं असतं कीं, एवढया तेवढ्या गोष्टींत अशी बारीकी कशाला हवीं ? तिकडचं मन जर इतकं मोठं आहे, मग मी तरी कशाला बाई आड येऊ ? अशानं थोडी झीज लागते खरी; पण एवढं होतं कीं, आपल्या गरजेला कुणी अडून पहात नाहीं. हेंच पहाना ? माझ्या एकटीच्यानं झालं असतं का हें एवढं

सारं ! यावर कुणी असंही म्हणतील, की, पैसे असल्यावर काय नाहीं होत ? पण, त्याचा ही मला चांगला अनुभव आहे. मोलाचीं कामं का अशीं नीटनेटकीं होत असतात ? आपल्याला वाटतं आपलं तसं. पण यान्या चौपट पैशापरी पैसा लागतो, न काम धड मनासारखं होत नाहीं तें वेगळंच. म्हणून म्हणतें कीं, दिसण्यांत जरी ही झीज दिसत असली, तरी ती दुपटीतिपटीनं अशा रीतींनं भरून येते. पुन्हां हें आहे ना आणखीं, कीं चार जणांत भूषण ही दिसतं आपलं. या किरकोळ गोष्टींनाच मी बाई फार जपतें. एक तर, लहानपणापासून आईचंन् बाबांचं वळणंच आपलं तसं. दुसरं हें कीं, वेळ पाहून आतां तस वागावंही लागतं. आणखीं, लपवून काय ठेवायचं यांत, तिकडेही हें असं फार आवडतं. म्हणूनच तुला हें इतकं दिसतय्; नाहीं तर, कितीही स्वभाव हा असला माझा, तरी इतक्या प्रमाणांत तुला ह्या गोष्टी खचीत दिसल्या नसत्या.

हें झालं साहित्याचं; बारीक सामानापैकीं खोबरं, खारका, केशर, बदाम, सुपारी-साधी, वासाची किसमिस, वेलदोडे, जायपत्री, वगैरे जें राहिलं तेंही आणवून घेतलं. झाले बरेच दिवस. आणि लागलीच दुसऱ्या दिवशी निरोप धाडून गावांतल्या गावांत तारावहिनींना कार्य होई पर्यंत राहण्यासाठी बोलावून घेतलं. गेले होते एकदा मी स्वत: त्यांच्याकडे आणि निरोप पाठवीन म्हणून म्हटलं होतं त्यांना. तुला ठाऊकच आहे या बारीक कामांत त्या किती चतुर आहेत तें. त्या आल्या तशा त्यांनीं भराभर मुगातांदुळाचे लाडू, बेसनाचे लाडू, बदामाच्या वड्या,

मसाल्याचा उत्तम चिवडा, एवढं सारं चार दिवसांत आटपून शेवाया, फेण्या, गवले न् सरतेशेवटीं करंज्या, अनारसे इतकं सारं एक आठ दहा दिवसांत करून पुन्हां आपल्या मोकळ्या, बरं, एवढ्या गुणाच्या, पण अभिमान आहे का कांहीं अंगीं ? नाहींतर एकादं मनुष्य अर्ध्या हळकुंडांतच पिवळं व्हायचं. कधीं सांड कीं, लवंड, कीं नासधुस, कांहीं नाहीं. त्यांचं सगळं काम कसं अगदीं मुकाटयानं चालतं; जशा कांहीं घरांत आहेत कीं नाहींत. एकदां सगळं साहित्य मिळालं कीं, त्यांना मग कुणाची गरज लागत नाहीं. बरं, एकाद्याला सांगायचं, शिकवायचं झालं, तरी कसं अगदीं गोड बोलून तिन तिनदां गळीं उतरून देतील. चुकलं तर व्यवस्थेनं संभाळून घेतील. एकाद्याला नाहीं आलं तर नाक नाहीं मुरडायच्या कधीं. या त्यांच्या स्वभावामुळें शिकणारं मनुष्यही आपल्याकडून होईल तितक्या जपून हौशीनं न उमेदीनं काम करतं. चुकल्या मुकल्याची त्याला कधीं धास्ती वाटत नाहीं. अगोदर त्यांचं सांगणच मुळीं असं असतं कीं तें चट्कन मनांत भरतं. म्हणून नवशिक्याकडून सुद्धां चूक अशी सहसा होत नाहीं. असं एकादं माणूस बहुधा मोठं बढाईखोर असतं. एवढंस कुठं येत असलं कीं, त्याला स्वर्ग जसा दीड बोट उरतो. पण तारा वहिनींच्या बोलण्याचालण्यांत कधीं म्हणून स्वतःचा उच्चार व्हायचा नाहीं. उलट, कुणी जर त्यांच्यासमोर त्यांच्याविषयीं कांहीं स्तुतिपर बोललं, तर ऐकलं न ऐकलंसं करून खुबीनं त्या दुसरीच गोष्ट काढतात. पण त्यावर कधीं फुशारकीनं किंवा संकोच्यानं हो किंवा ना

त्या कांहीं करायच्या नाहींत. खरंच गडे, अशा माणसाच्या हाताखालीं शिकायला सापडलेंक पाहुन शिकणाराला सुद्धा स्वत:बद्दल विश्वास न् अभिमान वाटून मूठभर मास चढत असेल. नाहीं तर दुसऱ्याच्या हाताखाली काम करतांना, कुरकुर करणारं मनुष्य यांच्याकडे आलं कीं, असं पाहतां पाहतां शिकून सवरून तयार होऊन दुसऱ्याला शिकवायला लागतं. मग त्याची कधी कुरकुर कीं चिडचिड कांहीं नसते. शिकलं, तर आपल्याला कांहीं येईल असा जर शिकणाराला हुरुप न वाटला तर तें शिकवणारं तरी काय कामाचं ? असो.

राहयलं होतं एक कापडचोपड. पण हें काम सगळी मंडळी इथे आल्याशिवाय होण्यासारखं नव्हतं. पण तेंही आतां आटोपलंच. सासुबाईंचं लुगडं सगळ्यांत भारी आहे. त्यांच्यापेक्षां थोडं मी पण भारीपैकींच सारखीं सारखीं दोघी जाऊबाई, वन्स, आतेसासुबाई, मावससासुबाई आणि या दोघींच्या फार दिवसांनीं आलेल्या दोन लेकी, अशीं इतकीं लुगडीं ज्याच्या त्याच्या पसंतीनं घेतलीं आहेत लुगड्याबरोबरच एकेक पैठणीचा खण, तोही ज्याच्या त्याच्या पसंतीनंच घेतला. आतां राहिली इकडची मंडळी; म्हणजे आई, वहिनी, तूं, वेणू, किशी. शिवाय दोघी जाऊबाईंच्या माहेरचीं मंडळी. यांच्यासाठीं मध्यम लुगडीं आणि एकेक जरीचा भारी खणं ठेवला आहे. माझ्या मनांतून तुला न् वहिनीला सासुबाईसारखं एकेक भारी लुगडं घेऊन द्यायचं आहे. पण तें या वेळीं कसं देतां येतं ? हो दोन्ही मी जवळ घेऊन

ठेवलीं आहेत. म्हटलं या वेळेस जें होइल तें होईल. पुढें कांहीं व्हायचं नाहीं. म्हणून मुद्दामच मी तुम्हा दोघींची लुगडीं अशीं मध्यम, आणखी शिवाय इतरांच्याहून थोडी कमीच, अशीं ठेवलीं आहेत. याचं ज्याला त्याला आश्चर्य न् समाधान वाटतय्. आईचं लुगडं तेवढं इतरांच्या इतकंच भारी आहे. पाहिले म्हणजे बाई मनांतल्या मनांत हसूं येतं कीं, हीं लुगडीं घेतल्यापासून, आजपर्यंत मी सारखी लक्ष लावून पहाते आहे, मला किंवा तिकडे, यत्किंचितसुद्धां त्रास किंवा दगदग पडूं न देण्याविषयीं सारखे सगळेजण आपआपल्यापरी नुसता तोंडातून शब्द निघायचीच वाट पहात असतात. तुझ्या लक्षांत आलंच असेल, ही मंडळी कोण कोण तीं ! इतरांचं काय, त्यांच्या हक्काचचं आहे सगळं. तेव्हां त्यांचं कसंही असलं तरी सारखंच. या वेळीं मात्र महालक्ष्मीच्या खेळाचा चमत्कार मला पहिल्यानंच पहायला सांपडला. असो. याशिवाय अक्षतीवर जे खण येतील त्यांच्या बदल्यासाठीं ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणें अजमास करून चाळीस खण भारी आणि शंभर खण मध्यम घेतले आहेत. आणखी इतकेच किरकोळ खण घेऊन ठेवले आहेत. हें झालं कार्यासाठीं. याच्याखेरीज कांहीं लुगडीं, कांहीं खण तऱ्हेतऱ्हेचे, चांगले न् स्वस्त दिसले म्हणून घेऊन ठेवले आहेत. एकंदरींत कपड्यापायीं खर्च बराच झाला खरा, पण आतां कुणाचा रुसवा म्हणून राहिला नाहीं. इतकंच नाहीं, तर, आनंदाच्या भरांत कुणी कुणी आपले राखी दिवाळींचे हक्क, ज्यांना ते नाहींत त्यांनी आपल्या इतर अशाच प्रकारच्या बाबींमिळकती न म्हणतां, न सांगतां

सोडून दिलेलीं आहेत. वेळ आली म्हणजे या मंडळीला आपल्या म्हणण्याची कितपत आठवण राहील याची शंका कशाला हवी! पण मी एक आपली गंमत म्हणून सांगितली.

तुला खोटं वाटेल, माई, या कापडाच्या बाबतींत माझा जीव फारच धाकधुक करीत होता. स्वारीनं एक सर्वांना मोकळीक दिली, तरी तिचा कितपत उपयोग करायचा, याचा का कुणी विचार करणार आहे! शिवाय शहाजोग कूळ असल्यामुळें कापडवालाही निरोप पोचतां बरोबर आपल्याजवळ होतं नव्हतं तेवढं सगळं उंची कापड घेऊन जसा काहीं प्रदर्शनालाच निघाला. मला हें कळतांबरोबर मी विठूला सांगितलं, त्याला वरल्या बंगल्यांत बसवून ठेव न् मला मला खालीं येऊन हळूच कळीव म्हणून. हें असलं कापड सगळ्यांच्या समोर ठेवलं असतं तर एकेकीनं निवडानिवडीच्या फारशा भानगडींत न पडतां एकेका नगाकडे सहज आपलं बोट दाखवलं असतं. मग त्या वेळी कुणाला नाहीला म्हणता येतं. पण मी अशी वेळच येऊं दिली नाहीं. कापडवाला येण्याच्या पूर्वीच मी बंगल्यांत जाऊन बसले. म्हटलं, विठूला साधतं न् नसाधतं. मग तो आला न् त्यानं आपलं एकेक एकेक काढून सगळं दुकान मांडून ठेवलं. मी अमळ भांबावलेच यांतलं काय घ्याव न् काय नाही म्हणून. उगीच आपलं वेड्यासारखं त्यांनीं आणलं म्हणून आपल्याला का घेता येतं वाटेल तें! बरं, त्यानीं एवढं आणलं

आपणच तें नाहीं म्हटलं, तर तेंहीं बरं दिसत नाहीं आपल्या नाव कोणाकोणाला. म्हणून मी अगोदर त्याच्याकडून किंमती विचारून घेऊन सारख्या किंमतीचे नग काढून ठेवले. आणि सर्वांत भारा पैकीं सासुबाईचं, वहिनींचं न् तुझं अशीं तीन लुगडीं पसंत करून एकीकडे काढून ठेवलीं. आणि बाकीची त्याला गोळा करायला सांगितलीं. मग त्याच्या खालोखालच्या नगांतून फक्त एकच लुगडं सहज आपलं कुठे बाहेर जायला यायला घेतलं. आणि बाकीचं परत केले. मग राहिलेल्यामध्ये झेपतील अशा किंमतीची, एकेकाच्या नावानं तऱ्हेतऱ्हेची हें न पसंत पडलं तर तें म्हणून चार चार लुगडी ठेवून घेतलीं. असंच खणाचं केलं आणि मग दुसरे दिवशीं त्याला यायला सांगून त्याच्यासमोर एकेकीला आपलं लुगडं खण वगैरे निवडून घ्यायला सांगितलं. मी ठरवून ठेवल्याप्रमाणेंच बहुतेकींची निवड पडली. यांत कांहीं मोठंस नवल नाहीं. कारण स्वभावावरून कुणाला काय आवडेल तें आपलं सहज सांगतां येतं. असो अशानं झालं काय कीं, सगळ्यांचं मन राहिलं; आमच्यावर अजमासाबाहेर फारसा भार पडला नाहीं न् कापडवाल्याचाही हिरमोड झाला नाहीं. आणखी कुणाचा बोल न राहून स्वारीची मात्र टेक राहिली. नाहींतर मग, तूच विचार कर, माई, मागाहून त्रास कुणाला झाला असता ? आमचा आम्हालाच ना ? म्हणून मला असं करावं लागलं.

९

वहिनींचा तुझा अवोला ! दादा, वारे वा ! भारीच आहेस तूं ! परवा भिऊताईंची माझी राममंदिरांत सहज आरती गांठ पडली, तेव्हां तिनं मला जें सांगितलं तें ऐकून मी अगदीं चकितच झालें. मला खरं सुद्धां वाटेना तिचं. तरीच म्हटलं, वहिनीचं इतक्या दिवसांत पत्र कां नाहीं तें ! तिला बिचारीला दोहींकडून सासुरवास ! नाहीं तर, वहिनी कांहीं कधीं राहायची नाहीं पत्र धाडल्या वाचून. इकडचं पान तिकडे झालं कीं, ती मला लगेच कळवायची. पण इथें तिचा निरुपायच झाल्यावर तिला तरी कसं म्हणायचं ? आतां पडला लख्ख उजेड तुझ्या परवाच्या पत्रांतल्या होमरूलचा. मला आपलं वाटलं, असेल झालं यांचं हें इंडियन होमरूल. मला काय ठाऊक हें ?

म्हणून त्यावेळीं माझ्या इतके लक्षांत आलं नाहीं कीं, असं काय यांचं यांच हें पत्र ! आतां तूंच काढलंस म्हणून म्हणतें, कीं, दिव्याखालींच अंधार असतो. अगोदर आपल्या पायाखालीं काय जळतय् तें पहाव, न् मग दुसऱ्याची चौकशी करायला निघाव. कुणाचा म्हणजे कैवार घेऊन मी बोलतें, असं नाहीं. एका हातानंच टाळी वाजत नाहीं हें मलाही कळतं. पण, कांहीं झालं तरी, ज्यानीं त्यानीं आपापल्यापरी रीत ही पाळलीच पाहिजे. मीच तुला विचारते, तुमचा तरी असतो का बोलाचा बोल ? तुमच्या या होमरूलचंच उदाहरण कां

होईना. आजपर्यंत याच्याविषयीं तुमची काय स्थिति होती ? त्यांतल्या एकेका गोष्टीचा वर्तमानपत्रांतून, सभांतून, व्याख्यानांतून, असा कांहीं बोभाटा करायचा कीं, ती जर आजच न झाली, तर, जसं कांहीं उद्यां आकाशच कोसळणार आहे. हत्यारांचा कायदा म्हणूं नका सिव्हिल सर्व्हिस परीक्षा म्हणूं नका, कलेक्टर, कमिशनर, गव्हर्नर अशा मोठमोठ्या कामाच्या जागा म्हणूं नका, असा एकेक विषय निघाला कीं, अशी कांहीं हूल उडवायची कीं, जणु काय दुसरी तोडच नाहीं. पण तेच तुम्हीं, हीं सर्व ज्याच्यांत येतात, तें होमरूल मात्र एकदम मागायला वचकत होता.

एरवीं अमेरिकन वॉर ऑफ इंडिपेन्डन्सच्या चित्रांत तल्लीन असतांना नो टॅक्सेशन विदाउट रिप्रेझेंटेशनचं, अठराव्या शतकांतल्या फ्रान्सांतल्या गोरगरीबांचे हृदयभेदक विलाप कानात घुमत असतांना रिपब्लिकन फॉर्म ऑफ गव्हर्नमेंटचं, मिलच्या वाक्सरितेंत पोहत असतांना गुड गव्हर्नमेंट कॅनॉट बी ए सबस्टिट्यूट ऑफ सेल्फ गव्हर्नमेंटच; अशा जगमान्य तत्वांवर एकेका स्वारचिं जे आवेशान प्रतिपादन चालत असे, ते पाहून, जणूं काय, कुणी आपल्या वक्तृत्वानं डिमॉस्थिनीजला लाजिवतो आहे, तर कुणी आपल्या मुत्सद्देगिरीन पिटला पदच्युत करतो आहे, तर कुणी आपल्या कनवाळुपणानं बर्कला हिणावतो आहे, तर कुणी आपल्या सायन्स ऑफ पालिटिक्सनं मिलला दिपवीत आहे, असंच एकाद्याला वाटायचं. असा कांहीं चमत्कार होता ! आणि अजून तरी काय ? एक धिटाई अंगी आली असली म्हणून काय झालं ? खरी करामात

तर पुढेंच आहे. नाहीं तर ("हर हर महादेव" असा शब्द ऐकला पुरे कीं एकाद्यां महाराष्ट्रांत हां हां म्हणतां एक लाख घोडा जमा होई; तेंच आतां कोनाकोपऱ्यांतूनही स्वराज्य दुमदुमत असतांना सबंध हिंदुस्थानांत मिळून इंग्लंडकडून आपले नैसर्गिक हक्क मिळविण्यासाठी, नाहीं हजार पांचशे, तरी निदान शेपन्नासही लोकांची मारामार पडावी ना ? असं पाहिले म्हणजे निराशेनं मन व्याकुळ होत न् बूचकळ्यांत पडत) तू काहीही म्हणमला तर आताशा असं वाटायला लागलं आहे कि तुम्ही फुकी फुशारकी तेवढी मारावी. अन आपलीच पाठ थोपटून घेण्यासाठीं सोंगाची बतावणी बरीक करावी. तुम्हीं तुमचं वैभव विसरला स्वाभिमान विसरला, इतकंच काय पण स्वतःला सुद्धा विसरला, असं जर कुणी म्हटलं, तरीही चालण्यासारखं आहे. पण तें कसंही असलं तरी हें होमरूल मात्र वाटत तितकं सहज नाहीं. इंडियन होमरूल हे आज नाहीं उद्यां, परवां, पांच वर्षांनी, दहा वर्षांनी, केव्हां तरी मिळायचं हें आहेच. पण हे आमचं होमरूल जर का एकदां गेलं तर हिंदुत्वाचं सर्वस्वच गेलं म्हणून म्हणावं लागेल. तें कांहीं मग पुन्हां मिळायची आशा नाहीं. मला म्हणजे आमच्या बायकांच्या जातीचा फार अभिमान वाटतो न् म्हणून मी हे बोलते असं नाहीं. तूंच पहा ना. तिकडनं मागें एकदां म्हटल्याप्रमाणें दारिद्र्याच्या, " वेदना नाहींशा करणारं, संपत्तीची सुबत्ता देणारं, आपलं वैभव वाढविणारं, थोडक्यांत म्हणायच म्हणजे आपल्या बुद्धीचं विलासांगण, आपल्या निरनिराळ्या गुणांच क्रीडोद्यान, आपल्या ऐश्वर्याचं लीलासरोवर, आपल्या सामर्थ्याचं प्रतापरंगण, असं जें आपलं

स्वराज्य, '' जे तुमचं इन्डियन होमरूल, तें मिळविण्यासाठी हा इतका जोम, हा इतका उत्साह कुठून आला ? हे आमच आम्हीच का सांगायला हव ? दिवसभराच्या दगदगींनं बाहेरून थकून भागून आल्यावर पाण्याच्या एका घोटानं किंवां चहाच्या एका कपानं दहा पांच मिनिटांत जी नवी हुशारी, नवी टवटवी तुमच्यामधें येते, ती केवळ पाण्याच्या किंवां चहाच्या गुणामुळेंच खास नव्हे. एरवीं, चहाकाफीच्या दुकाना थोड्या थोडक्या का आहेत ?

मला नवल वाटतं तें हेंच कीं कांहीं फार दिवसांची गोष्ट नाहीं. चारच महिने झाले असतील कीं होतील. हो, गेल्या माघांतच; गेल्या माघांतच तर मी तिथे होते. वडिलांची प्रकृति आजारी झाल्यामुळें कांहीं दिवसासाठी सहज आपकं बोलावलं होतं म्हणून आठ दिवसच कायते वहिनी माहेरी गेली होती. तें सुद्धां, मी जेव्हां इतकं म्हटलं तेव्हां तिला जायला मिळालं. नाहींतर, अगोदर ती सरळपणानं विचारायला आली तेव्हां, गोड गोड बोलून तूं सत्रा बाहाणे दाखविलेस. मला कसं कळावं हें तुमचं आपलं ? त्या दिवशीं तिचा चेहरा एकाएकी खिन्न झालेला पाहिला, कशांतच तिला गोड लागेनासं दिसलं, म्हटलं असं झालं तरी काय एकदम इच तोंड उतरायला. मला आपलं राहावेच ना म्हणून मी तिला खोदखोदून विचारूं लागले. तेव्हां तिनं एकदाची सारी हकीगत सांगितली. एवढं वडिलांनी बोलावलं; कधीं बोलावीत नाहींत ते. तशांत आजारी न् धाडायची नाहीं म्हणजे ? त्यांनाही पण ठाऊक तुझा स्वभाव. सकुताईनाच लिहिलं होतं यायला

त्यांनीं अगोदर. पण, एक तर त्या पडल्या कांब; शिवाय पाहुणे वगैरे आल्यामुळें त्यांच्या घरीं करण्यासवरण्याचा अडचण. असा त्यांचा निरुपाय झाला. आणि हें सगळं त्यांनीं आपल्या पत्रांत स्पष्ट लिहिलेलं होतं म्हणून मला तुझ्या जवळ एवढी रदबदली करावी लागली. त्या वेळेस दोन दिवस वहिनी नव्हती तर तुला काय कमी झालं होतं ? उलट चिऊताई, रंगूनाना कांहीं कामानिमित्तानं तिथे आले होते. रंगूनाना किती गमती ! त्यांच्या एकेका शब्दावर हंसून हंसून एकाद्याला पुरे वाट झाली नाहीं असं कधी व्हायचच नाहीं. चिऊताई तरी करण्यांस-वरण्यांत किती चतुर ! त्यांनीं तुझ्याकरिता मुद्दाम रोज कांहीं ना कांहीं नवीन नवीन करावं पण तुझा चेहरा आपला, पहावा तेव्हां खिन्न तो खिन्नच. क्लबातली मंडळी सुद्धा चारदां तुझ्याकडे येऊन गेली. मग मोठ्या सायासानं स्वारी एक दिवस मॅच होती म्हणून गेली. सगळे जण म्हणतात, अखेरीस गेम झाला म्हणून काय झालं ? तुझा खेळ तर नेहमीं सारखा नाहींना झाला ? विरुद्ध टीमच्या कॅप्टनला दिखील आश्चर्य वाटलं. आणि या मंडळींची आरंभापासूनच निराशा झाली. डिफिट येतो कीं काय याचाच सगळ्यांना धाक वाटत होता. असं कांहीं झालं होतं तुला त्या वेळेस. तुझ्या अशा एकूणएक गोष्टी माझ्या ध्यानांत आहेत.

मग, एकाएकी असं कां व्हावं कांहीं बाई लक्षांत येत नाहीं. पण मला हें सगळं बनावटच दिसतं. माझ्या चांगलं लक्षांत आहे, चिऊताई मला ही हकीगत सांगत

तिची वडील बहिण माझ्याकडे पाहुन अगदी चपापली, तें माझ्या चांगलं लक्षात आहे. याशिवाय मला हे कोड उलगडेना म्हणून मी तिकडेही जाऊन विचारल. पण तिकडनं दिखील उडवाउडवीच करायची झाली. मला पक्कं वाटतं तुमचा सागळ्यांचा यांत काहीं तरी डाव दिसतो. पण मी अशी थोडीच हार जाणार आहे ? काय असेल तें कळेलच म्हणा आपोआप. पण तोंवर ही बाई हुरहुर कशी पाठ सोडणार !

---

१०

कां, मागें नव्हतं का मी म्हटलं, कीं, एकादी चांगलीशी मुलगी आली कीं सदुभाऊजींच लग्न लगेच उरकून घ्यावं म्हणून. आणि त्यावेळीं दोन मुली ज्या सांगून आल्या होत्या त्या तर अशाच होत्या कीं, सदुभाऊजींना त्या सगळ्यापरीनं शोभल्या असत्या. पण त्यावेळीं मला मोठ्या ह्यानं सांगायच झालं "एव्हांच काय घाई आहे ? ज्याचं त्यालाच जर नको आहे, तर, आपण कशाला उगीच आग्रह करावा, न् चालत्या गाड्याला खीळ घालावी. अगोदरच त्याची निराशा झाली आहे पदक मिळालं नाहीं म्हणून. यंदाच, त्याचा सगळा वचपा काढायची त्याला मोठी उमेद आहे. चिन्हय् पण तशीच दिसतात " वगैरे वगैरे एक व्याख्यानच झालं होतं माझ्या एका

शद्वावर. अंमळ उशीरा कां होईना, माझचं अखेरीस खरं झालं. डौल मिरवायची गोष्ट नाहीं. पण पुरुषांचं मन बायकांनींच ओळखावं आणि तशी मला खात्री होती म्हणूनच मी स्वारीजवळ गोष्ट काढली होती. इतके दिवस नव्हतं कांहीं म्हटलं तें. कारणच नव्हतं तर म्हणायचं कसं ? पण त्या सुमारास सदुभाऊजींचीं जीं जीं पत्रं आलीं तीं तीं पूर्वीच्याहून कांहीं निराळींच होतीं. आतां हें खरं कीं, कोणत्या एका पत्रांत म्हणजे याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष उल्लेख किंवा तसं कांहीं होतं असं नाहीं मी म्हणत. पण तीं कांहीं पहिल्यासारखीं साधीं, सरळ अशीं अगदीं नव्हतीं. मी एकेक पत्र आवरून ठेवलय् मुद्दाम. आलीच वेळ कीं, देईन भाऊजींना ओळख. एव्हांच काय करायचं त्याचं नांव काढून ? तेव्हां पासून मीही त्यांना तशींच उत्तरं लिहीत असते. माझ्या सगळं लक्षांत आलं, त्यांनीं मलाच तसं कां लिहावं तें ? जवळ, मामंजींना किंवा सासुबाईंना या विषयीं उघड किंवा आडून ही बोलतांच येत नाहीं. उमावन्सजवळ अशा गोष्टी बोलण्याची सोय नाहीं. कारण त्यांच्या लक्षांत एवढं बारीक कुठलं यायला ? उलट, आणखी, करायला जायच एक आणि व्हायचं भलतंच. चिमावन्सना सुचवावं, तर त्याही इथे नाहींत. माझ्याप्रमाणें पत्रोपत्रीं कांहीं कळावं, तर, सर्व ठिकाणीं थोडीच तें सोयीचं असतं ?

असा निरुपायच झाला ही गोष्ट निराळी. खरं म्हटलं तर भाऊजींनी ही गोष्ट केव्हांच काढायला हवी. पण त्यांना ठाऊक, कीं, माझ्याजवळ नुसतं नांव काढायचाच उशीर, कीं मी त्यांची खिल्ली

करकरून पुरेवाट केल्याशिवाय राहायची नाहीं. म्हणून स्वारी अशी आडून आडून पहाते आहे प्रयत्न करून. पण इतक्या सहज थोडीच मी माझा ठाव लागूं द्यायला बसले आहे? इकडे जरी मी इतकी वरचेवर निकड कावीत होते, तरी तिकडे त्यांना आपल्या प्रयत्नाबद्दल काय वाटत असेल हें त्यांचं त्यांना कीं एक मलाच ठाऊक. पण असं ताणून तरी किती धरायचं? म्हणून मी अलिकडे त्यांना थोडी आशा लागेल असंच, पण, त्यांच्यासारखंच आडून आडून लिहीत असते. म्हणजे वेळ आली कीं, सुटून पुन्हां त्यांना आपली खिजवायला तयार.

पण मी म्हणते, इकडे हा विचार असा एकदम कसा सुचला? कुणी त्यांच्या मित्रमंडळींनी सुचवलं, कीं, चिमावन्संनी लिहिलं, कीं, मामंजीचा आग्रह पडला, किंवा आणखी कांहीं झालं? मला नाहीं वाटत यापैकीं एक तरी कारण असेल म्हणून. पण कांहीं असलं तरी सध्यां जी मुलगी आली आहे तिच्याविषयीं माझं मन अंमळं कचरतंच. अगोदर आजकालचे दिवस निराळे. तशांत सदुभाऊजींचं काम म्हणजे चांगलाच विचार करायला हवा. त्यांत त्यांचं ही पण अगदीं मोकळेपणानं मन पाहिलं पाहिजे. मावशीबाईची लेक रूपाची खरी; नाक, डोळे, रूप, रंग वगैरे सगळं कांहीं जसं असायला पाहिजे तसं आहे अगदीं. घरांतहीं स्वयंपाक, धुणं, पाणी, दळण, कांडण, निसण या कामालाही चांगली आहे. वयालाही कांहीं कमी नाहीं; चांगलं पंधरावं सरून या चैत्रांत तिला सोळावं लागेल; निरोगी आहे; टापटीपीची आहे; हौशी आहे; जुन्या वळणाला जशी असायला

पाहिजे तशी आहे ती अगदीं. स्वभावानं फार गोड आहे. पण मला नाहीं वाटत एवढंच पाहून चाललसं आपल्याला. कारण, भाऊजी कुठे ? नि ती कुठे एक ट फ करतां येणं किंवा पांच चार इंग्रजी पुस्तकं वाचतां येणं यांत काहीं फारस अंतर आहे असं नाहीं. अशी मुलगी तितकंच किंवा वर्षादोनवर्षांनीं अधिक शिकलेल्या एकाद्या मुलाला चालेल; शोभेल म्हटलं तरी हरकत नाहीं. कारण नवराबायको म्हटलें कीं बरोबरीचं नातं आलंच. पण तें मानलेलं किंवा उसनं नाहीं कामाच. जिथें खरोखरीच्या वस्तूंशींच काम तिथें तिच्या नुसत्या कल्पनेवर कसं भागणार ? बाहेरच्या अंगाचं फार तर एक वेळ चालेल. म्हणजे एकादी जर गरीब असली, कीं, जिला ल्यायला, नेसायला चांगलंस नाहीं, घालायला दागदागिने नाहींत, मागें पुढें दासदासी नाहींत, अशीला उंची उंची वस्त्रांनीं, सोन्यामोत्याच्या दागदागिन्यांनीं श्रीमंतीचं पुरतं सोंग आणतां येईल. यांच काय, वाटलं तेव्हां घालतां येतात, वाटलं तेव्हां काढतां येतात; न् तेवढ्यापुरतं तें शोभेलही. पण अंगचेच जे उपजत गुण असावे लागतात, किंवा बदलतीळ तसतशा रीतीप्रमाणें जे मिळवावे लागतात त्यांच्या विषयीं असं कां करतां येतं ? सध्याचा काळ तर असा कीं, म्हणतात ना, घरांत मिया न् बीबी. असल्या स्थितींत, घरातलं कामकाज आटपून रिकामा वेळ सांपडला, तर, चार शेजारणी पाजारणी जमवून इकडच्या तिकडच्या पंचाइती करण्यावांचून कसा घालवावा, यांचं, पहाव तिला मोठं संकट पडलेलं असतं. बरं,

याच्याशिवाय दुसऱ्या कशांत मन लागायचं नाहीं. मग हें कुठलं भाऊजींना खपायला? फिरून असं, कीं, नेहमीं त्यांना एक मनुष्य गोष्टी करायला लागत असंत. जें जें कांहीं वाचलं असेल, पाहिलं असेल, किंवा कल्पनेनं काढलं असेल, त्याच्याविषयीं टीका म्हणूं नका, वादविवाद म्हणूं नका, चर्चा म्हणूं नका, आपलं जें कुणी म्हणून दिवसभरांत भेटेल, त्याच्याशीं सारखी चालायची. मग त्या त्या विषयांत तल्लीन होऊन बोलत असतांना ऐकणाराला आपलं बोलणं समजत नाहीं, असं जर कां त्यांना दिसलं म्हणजे त्यांचा अगदीं विरस होतो. अगोदर अशाशीं ते कधीं बोलायचेच नाहींत. पण, आकाच एकादा असा प्रसंग म्हणजे मग त्यांची मौज पहावी. आतां असंही कित्येक वेळां घडलं आहे कीं, लक्ष नसल्यामुळें समजत नसतांही कुणी कुणी संदिग्ध उत्तरानीं किंवा शब्दांच्या अथवा वादविवादाच्या कोटीनं समजल्याचा आव आणून फक्त तेवढी वेळ मारून नेली आहे. हे म्हणजे भाऊजींच्या लक्षांत येत नाहीं, असं नाहीं. पण तितंक जरी असलं तरी त्यांना पुरे होतं. त्यांचं म्हणणं असं, कीं, बोलायला, अधिक नसलं, तरी निदान सारख्या योग्यतेचं मनुष्य असावं. आपले विचार त्याच्या कसोटीला लावून पहातां येतात. त्याला आपलं बोलणं पटलं म्हणजे आपल्याला उत्तेजन येतं; न पटलं तर आपली चुकी आपल्याला कळते. हें खरं कीं, अशांचंही एकाद वेळेस आपल्या बोलण्याकडे लक्ष नसतं. पण ते तसं न दाखवितां वर सांगितल्यासारखी

वेळ मारून नेतात, यावरून त्यांची योग्यता तर प्रगट होतेच, पण या त्यांच्या करण्याचाही ब-याच वेळा आपल्याला उपयोग होतो. अशा आपल्या सदुभाऊजींना निवळ संसारांतल्या बारीकीनं न् कामच पडल्यास कष्टाळुपणानं दोन पैसेच केवळ वाचविणारी, अशी जन्माची साथीदारीण काय कामाची ? कधीं हास्यविनोद चालला आहे, कधीं एकाद्या नामांकित पुस्तकावर चर्चा चालली आहे, कधीं मित्रमंडळी बरोबर निरनिराळ्या चळवळींचा खल चालला आहे, कधीं सृष्टि सौंदर्याचं कौतुक चाललं आहे, असं कधीं कांहीं, कधीं कांहीं, असा ज्यांचा नित्य काळ जायचा, त्यांना ती कशी शोभणार ? शिवाय, आपल्याला जरी ती एकवेळ पसंत पडली, तरी, त्यांना ती कशी पडणार ? विद्येनं, विचारानं, वागणुकीनं नव-याची बरोबरी न करतां आली, तर, बायको म्हणजे घरांतली कष्टाची कामं करणारी दासीच नाहीं का म्हणायची ? आणि अशीबरोबर संसार तो कसला ? छे: बाई; हें नाहीं येत कांहीं मनाला. खरं म्हटलं तर, आपली बायको—आपली अर्धांगी—आपल्या सारखीच शिकलेली, लिहिण्यापुसण्यांत चतुर असावी, अशी जर आजकालच्या, इंग्रेजी शिकून पदव्यावर पदव्या पटकावणा-या लोकांना हौस वाटत असली तर यांत त्यांच्याकडे काय दोष ? आणि मला वाटतं घरांतल्या मंडळींनीं ही त्यांची ही हौस कांहीं करून पुरवलीच पाहिजे. मागच्या काळाचं ठीक होतं. त्यावेळीं पुरुषांचच शिकणं जिथं उणीपुरी दोन किंवा तीन पुस्तकं, त्या

ठिकाणी बायकांच्या शिकण्याचं काय विचारायचं. साधारण हरिविजय शिवलीलामृत अशासारखी पोथी वाचतां आली कीं, कळस होई. कारण, पुरुषांनाच मुळीं त्या मानानं अधिक तें काय येत होतं ? अशा रीतीनं या गोष्टींत दोघंही सारखींच असल्यामुळें त्यांच्या आवडीनिवडींत, आचाराविचारांत फारसा फरक पडत नसे. आणि असं, असंतोषाला कारणच नसल्यामुळें त्यांचा संसार सुखाचा होई. दुसरं, त्या वेळेस, आताच्यासारखा संसार भानगडीचाही पण नव्हता. तेव्हा संसारापुरते दोन पैसे मिळविण्याखेरीज पुरुषाला व त्यांची घरांत नीट व्यवस्था लावण्याखेरीज बायकोला, दुसरं तिसरं करायच असं काय होतं ? म्हणून, लग्नाच्या वेळीं, मुलीची घरगुती कामापुरतीच जी परीक्षा करीत ती योग्यच होती. आणि मुलाचं सुद्धां तेव्हां गोत्र, प्रवर, संपूर्ण नाव, आणि व्यवहाराच्या दृष्टीनं, सुवाच्य, वळणदार असं मोडी अक्षर, अन् कपेटी लिहिलेल्या एकाद्या मोडी पत्राचं वाचन याच्यापलिकडे काय पहात होते ? बाकी, राहिलेलं कुळ, शील, स्वभाव पहायचा, हें आपलं ठीकच आहे. आजही तें पहावंच लागतं. पण आताचे दिवस पडले निराळे. जसजसा काळ बदलत जाईल तसतसं आपणही पण बदललं पाहिजे, असं नेहमीं म्हणायचं असतं ना ? याचा अर्थ असा नाहीं कीं त्या काळच्या स्त्री पुरुषांच्या अंगीं सुसंस्कृतपणा नव्हता म्हणून किंबहुना मला तर असं वाटतं कीं त्या काळीं पदव्यांच्या मापान मोजलं जाणारं शिक्षण नसलं तरी पण शिकण्यानं येणारा सुसंस्कृत पणा भरपूर होता. किंवा असं म्हणाव हवं

तर की घरांतल्या वडील मंडळींचं वळण, कीर्तनपुराणांचं श्रवण व श्रद्धा यांच्या योगानं त्यांना पढ्यांचं नसलं तरी सुसंस्कृतणाचंच भरपूर शिक्षण मिळतं होत. पढ्यांचं शिक्षण मात्र वाढलं, पण त्याच्या बरोबर श्रद्धा गेली, आणि मन वाहत्या वाऱ्याबरोबर हेलकावे खाऊं लागून मोकाट भटकत सुटलं असो.

यावरून, घरगुती कामाला मी म्हणजे तुच्छ लेखते असं मात्र नाहीं. माझं म्हणणं इतकंच कीं, निवळ तेंच पाहून समाधान मानणं चांगलं नाहीं. त्याबरोबरच शिकणंसवरणंही पण चांगलंच पाहिलं पाहिजे. सदुभाऊजी करितां म्हणून हें इतकं पाहायलाच हवं. त्यांच्यासाठीं मुली पहायच्या त्या कमी शिकलेल्या असल्या, तरी फारच कमी काय कामाच्या ? आणि अशा मुलींची कांहीं आज वाण नाहीं. इथें हें बरीक स्वाराला सुचविल्यावाचून माझ्यानं राहवत नाहीं, कीं, नुसतं शिकणंच हवं तितकं असलं, अन् घरगुती काम, कूळ, स्वभाव यापैकीं एकेकच जरी नसलं, तर तें दिखील आपल्याला अगदीं नको. मनाजोगती मुलगी कुठेच न मिळाली तर ही जी मावशीबाईंची आली आहे, ती हजार हिस्से चालेल. पण भलतीच एकादी वाऱ्याला सुद्धां क्षणभर नको. कारण, अशांचं एक का सोंग असतं ? नटणंमुरडणं, चट्टीपट्टी करणं, नाटकांतल्यासारखं प्रहराप्रहराला पोशाख बदलणं, यांतच त्यांचा सारा दिवस जायचा. तसंच सारख्या सारखा दहाजणी जमून आज काय टीपार्टी झाली, उद्यां काय गार्डनपार्टी झाली, परवां कव

बॅकेट झालं, असं आपलं रोज कांहीं ना कांहीं चालायचं. मनुष्यानं म्हणजे थोडीफार चैन करूं नये, असं नाहीं मी म्हणत. देवानं दिलं तर चांगलं आपलं खावं, प्यावं, ल्यावं, चारजणीं गोळा कराव्या, सगळं कांही करावं पण हें सर्व आपल्या ऐपतीप्रमाणें असलं न् रीतीला सोडून नसलं म्हणजे गोड वाटतं. पण उठतां बसतां यांतच दंग होऊन राहायचं, हें चांगलं का म्हणायच ? पाहिलं म्हणजे नवलं वाटतं कीं, या आजकालच्या शाळेंत जाणाऱ्या पोरी काय, किंवा घरांत बसून कादंबऱ्या न् नाटकं वाचणाऱ्या, वयानं त्यांच्यापेक्ष थोड्या अधिक, वयाच्या अशा बायका काय, दहा वीस इंग्रेजी शब्द कुठं यायला लागले, किंवा वर्तमानपत्री शब्द तोंडीं बसले कीं, त्यांना स्वर्ग जसा वीड बोट उरतो. यांच्या लहरीप्रमाणें यांचे कितीही जरी चाव चालूं दिले, तरी, या म्हणजे कुणाला सुंध पाहतील तर शपथ. वडील म्हणू नका, धाकटं म्हणू नका, ज्याला त्याला आपलं तुच्छ लेखायचं; अन् सदासर्वदा आपल्याच कुऱ्यांत असायचं. इंग्लंडात नाहींत का सफ्रेजेटा, त्यांतल्याच ह्या. कधीं काम पडलं तर चुलीवरचं भांडं सुद्धां खालीं उतरायचं नाहीं. नवऱ्याची गोष्ट सोडली तरी, स्वतःला देखील उपाशीच राहायची पाळी यायची. याला म्हणजे अपवाद नाहींत असं नाहीं माझं म्हणणं. फार कशाला, इंदिराताईंचंच उदाहरण नाहीं कां ? विलासरावांपेक्षां यांच्यांत कोणते गुण कमी आहेत ? पदव्यांच्या ताजव्यांत जरी यांचीं विद्या मोजली गेली नसली, तरी, रावसाहेबासारख्यांच्या तोंडून त्यांची जी प्रशंसा होते, ती पदवीपेक्षां कमी का म्हणता येईल ? शिवाय, अशा ऐश्वर्यांत

कचितच आढळणारे गुण म्हणजे, सज्जनपणा, थोरपणा, यांची त
प्रत्येक जण साक्ष देईल. दुसरं उदाहरण विदुलाताईंच ! त्यांच्या राहाणी-
वरून, त्यांच्या बोलण्यावरून, वाटेल तरी कुणाला, त्यांनी तीन परीक्षा
दिल्या असतील म्हणून ! पोरापासून थोरापर्यंत सगळ्यांत आपल्या सारख्या

खरंच गडे, आपल्याकडचं पूर्वीचं वळण दिवसे दिवस अगदींच नाहींस होत चाललं. त्या वेळची रीतभात सुद्धा अशी असे कीं, संसारा च्या कामांत मनुष्य आपलं आपोआप तयार व्हावं. आपल्या राधा-काकूवरूनच मी म्हणते असं नाहीं. परांड्यांच्या गंगामावशी, शास्त्र्यांच्या मोठ्या काकी, पोपटांच्या वारुमामी, ढोल्यांच्या जानकीअक्का अशा किती तरी दाखवितां येतील. डोळ्यांनीं पाहिलेल्या ह्या; चांगल्या आठ आठ दहा दहा वर्षे होत्या आमच्या देखत. आळींतलं प्रत्येक घर जसं आपलेंच वाटे. अंमळ उशीर झाला तर हेच आपले भाऊजी वारुमामींकडे, नाहींतर मोठ्या काकींकडे खुशाल आपले जेवून येत. रामभाऊ तर अजून सांगतात की, " मी तुमच्या राधकाकूजवळ सकाळचं तोंड धुतलं कीं लाडूचा हट्ट घेऊन बसत असे. अन् त्यांनीं मग मुगातांदळाचं पीठ तुपासाखरेंत कालवून दिलं किंवा गोंदाचा लाडू, नाहीं तर, बदामाची वडी हातावर ठेवली म्हणजे मग आमची स्वारी स्वयंपाक घरांतून हलायची " असो. आतां ते दिवसही गेले आणि तीं माणसंही बहुतेक गेलींच. खरोखर गेल्या पीढपासून घरोघर मोठा उलटापालट झाली आहे.

असो सांगायच म्हणून इतकच कीं, मुलीसाठीं मुलगा किंवा

मुलासाठी मुलगी जेव्हां ही मंडळी पाहतात, तेव्हां कुळ, शील, वय, अंगकाठी, वगैरे अगदीं बारीक सारीक गोष्टीकडे जसं ते इतकं लक्ष पुरवतात, तसंच त्यांनीं मुलामुलींचा स्वभाव आणि शिक्षण हीं एकमेकाला जुळणारी आहेत कीं नाहींत याच्याकडे जर लक्ष दिलं, तर हल्लीसारखं त्यांचं एवढं करणं वाया न जातां, आपल्या सुनालेकींना पुष्कळ सुख लागावं, म्हणून जें त्यांना इतकं वाटत असतं, तें सहज साधेल. नाहींतर, एकदां लग्न लागलं कीं, दोघांचीं तोंडं दोन दिशांला होतात न् बिचाऱ्यांना संसार असार वाटूं लागतो.

११

आतांपर्यंत कसं अगदीं ठीक मनाजोगतं चाललं होतं. मला किती समाधान वाटत होतं! पण आज हें हुंड्याचं खूळ नवीनच उत्पन्न झालं. मामंजीकडून असं कांहीं होईल हें मला पूर्वीच वाटलं होतं. पण त्यांचा या गोष्टीवर इतका आग्रह पडेल, याची मला मुळींच कल्पना नव्हती. पण, आतां त्यांचं काय? कसंही करून त्यांची हळूच, मोठ्या मिनतवारीनं समजूत घालून गोष्ट तडीला लावलीच पाहिजे. नाहीं तर, बाहेर तोंड काढण्याची सोय उरणार नाहीं. पण, अशा गोष्टींत लोकांशीं काय करायचय् म्हणा. आपल्याला जें योग्य दिसतं, त्याचं पापपुण्य आपलं आपल्याला.

वसं म्हटलं तर लोकांच्या दृष्टीनं यांत आपला फायदाच आहे. पण एकदां, वाईट, निंद्य म्हणून जें ठरलं, आणि ज्याच्यामुळं धडधडीत आपल्या डोळ्यादेखत नाहीं नाहीं ते अनर्थ घडतात, तें कळून सवरून कसं करायचं ? पुन्हां, हें नाहीं कां, कीं, दुसऱ्याला करूं नका म्हणून जें मोठ्या कळकळीनं सांगायच, त्यालाच आपण स्वतः मागें पुढें कांहीं पाहायचं नाहीं म्हणजे ! असं करणं गोड तरी कसं वाटेल मनाला ? म्हणून म्हणते कीं युक्तिप्रयुक्तीनं, मध्यस्थी घालून, स्वतः पाया पडून, नाहींतर तितके रुपये, जवळून त्यांच्या हवालीं करण्याचं कबूल करून त्यांना आपलं म्हणणं मागें घ्यायला लावावंच. असं पैशाचं नांव काढलं म्हणजे त्याना अंमळ लागेल न् त्यांचा आग्रह बन्द पडेल. मामंजीसारखें पैशाविषयीं इतकें निर्लोभ मनुष्य, कुठेंही पाहिलें तरी विरळचं. हा जो त्यांचा आग्रह आहे तो पैशासाठीं म्हणून अगदीं नसून केवळ त्यांच्या जुन्या मताप्रमाणें, असं न केलं तर, आपल्या घराण्याचा लौकिक जाईल, म्हणून आहे. म्हणून म्हणतें कीं, ही युक्ति बिनतोड लागू पडेल. आतांपात्रेतों, केलंच असेल बहुधा तसें कांहीं अगोदर. पण, सुचतं तें तें लिहून टाकतें झालं. त्यांचा इकडच्यावर पक्का विश्वास असल्या-मुळें इकडे जें आवडत नाहीं, त्यांत तें आपलं फारसं चालवायचेंच नाहींत. मला खास वाटतं कीं, यांत कुठे तरी, कांहीं तरी चुकलं आहे. एरवीं ते असा आग्रह धरायचेच नाहींत. हें सगळें, काय आहे न् काय नाहीं तें पहाणें होईलच. कांहीं असलं तरीं, तिनतिनदां स्वारीला सांगणं आहे कीं, हरिपतांनीं सुचविलेली तोड कितीही गोड असली तरी, आपल्या

मनांतलं तिनं मुळीचं कांहीं सावत नाहीं. उलट तिच्यामुळें फुकटच्या फाकट नामोष्की मात्र यायची आणखी. असंच जर करायचं, तर, उघागर आपला सौदाच करणं काय वाईट ? छेः बाई, लोकांत असं अगदीं स्पष्ट जाहीर झालं पाहिजे कीं, यांनीं हुडयाचं नांव सुध्दां काढलं नाहीं म्हणून. तरच तें आपल्याला न् लोकांलाही चांगलं होईल. नाहीं तर आजपर्यंतचं आपलं केललं सगळं फुकट जाईल. हरिपंतांच्या म्हणण्याप्रमाणें आपण जर व्याह्यांना रुपये दिले न् त्यांनीं तें मामंजीनां नेऊन दिलें तर त्यांत काय होणार ? असंच जर करायचं, तर आपणच कशाला त्यांना रुपये नेऊन द्यायला हवेत ? तें स्वतःच नाहींत कां खुषीनं द्यायला तयार ? एकुलती एक मुलगी म्हणून हुंडा न् करणी करून देण्याविषयीं त्यांचा अगोदरच आग्रह आहे. एवढं मोठं उत्पन्न, हौशी स्वभाव न् जिवाभावाला एकच पोटचा गोळा; अशा स्थितींत ते काय करायला तयार नाहींत ? आणखी, हें नाहीं का आश्चर्य कीं, एवढं अनुकूल असतांना, आपल्याजवळून रुपये घेऊन ते मामंजीना द्यायला कसे कबूल होतील ? बरं, घटकाभर असंही म्हटलं कीं, व्याह्यांना कांहीच अनुकूळ नाहीं; म्हणून आपण त्यांना रुपये दिले, तरी काय ? स्नेही म्हणून फार तर ही मदत होईल; किंवा तिऱ्हाइत या नात्यानें हे त्यांच्यावर उपकार होतील. म्हणजे मुलीला हुंडा देण्यासाठीं, त्यांनीं दुसऱ्याजवळून जें कर्ज काढायच, किंवा, कर्ज फेडण्याची ऐपत नाहीं, म्हणून, असलाच तर, आपल्या एकाद्या मित्राजवळ पैशासाठी तोंड विचकायचं, अशासारखंच तें होईल. पण, यांत, देणारांनीं हुंडा म्हणून

कांहीं देऊं नये, आणि घेणारांनीं हुंडा म्हणून कांहीं घेऊं नये, असं जें व्हायला पाहिजे तें कुठें होतय् ? आपला संकल्प हुंडा न् घेण्याचा आहे. एकाद्याला तो देण्याची ऐपत नसली, तर, त्याला, त्याकामीं पैसे पूरवून मदत करायचा नाहीं. अशी जर आपण मदत केली, तर मग आपला संकल्प कुठें राहिला ? असं केल्यानं हुंड्याची चाल मोडण्याऐवजीं तिला उलट शिरजोर केल्याच पातक मात्र पदरीं यायचं मदत करायची, ती मनुष्य चांगल्या कामीं करतं. मग आपण हा हुंडा देण्याच्या कामीं मदत केली, तर, हुंडयाचं स्वरूप जें आपल्याला इतकें भयंकर दिसतं, तें सारं खोटच म्हणायच तर ? एरवीं, जाणून बुजून वाईट गोष्टीला कोण मदत करील ?

माझ्याकडे आलेल्या पत्रावर आणखी काय काय गोष्टी झाल्या, तें मला माहीत नाहीं. पण, मला खात्री आहे, असं कांहीं व्हायचं नाहीं म्हणून. तरी मला एक थोडी शंका आहे. रागवायच नाहीं म्हणून अगोदर क्षमा मागून ठेवते. मी काय, मला जसं पत्र आलं त्यावरूनच तर्कानं, अनुमानानं मी लिहिणार. तेव्हां म्हटलं साहाजिकच कमी अधिक लिहिलं जायचं. मला असं दिसतं कीं, इकड अजून या कामांत जसं मन घालावं तसं घातलेलं नाहीं. याचं कारण कदाचित हें असावं; वडिलांच्या स्नेह्यांचा वडलासारखाच मान ठेवायचा, या समजुतीन, ते जर या कामांत पडले आहेत, तर आपण कशाला तिकडे बघायच, असा विचार करून स्वारी आपली स्वस्थ बसली असावी नाहीतर, या साऱ्या सरळ गोष्टी अशा वळणांला लागल्याच नसत्या.

किंवा माझं मन पाहण्यासाठीं म्हणून मला अशा रीतीनं लिहिलं असावं, कांहींही असलं तरी मला या वेळेस, जेवढं कांहीं मनांत आलं आहे तेवढं सगळं लिहून टाकावंस वाटतं.

वरच्या माझ्या लिहिण्यावरून स्वत:ला असं कदाचित वाटेल कीं, लग्नकार्यासाठी म्हणून एकाद्या सत्पात्र मनुष्याला, योग्य ती पैशाच्या रूपानं, मदत अशी करूंच नये. पण माझे म्हणणं तसं नाहीं. हुंडा जर न द्यावा लागला तर ज्याला कोणाच्याही मदतीची जरूर नाहीं अशाला हुंडयासाठीं म्हणून मदत करणं चांगलं नाही. पण मुलीवाले बिचारे परतंत्र असतात. त्यांच्या कितीही मनांत असलं तरी त्याचा काय उपयोग ? अशा वेळीं, मुलाकडच्यांनीं हुंडा घेऊं नये म्हणून काय वाटेल तें करावं. म्हणजे, मुलीच्या बापाला हुंडा लागूं नये आणि त्याचं काम तर व्हावं, अशी आपल्याकडून होईल ती मदत, न मागतांही, करावी. हुंडयाखेरीज दुसऱ्या कशाला, आपल्या शक्तीप्रमाणें पाहिजे तितकी मदत पैशाच्या रूपानहां केली म्हणून काय हरकत आहे ? आपल्या मदतीचा उपयोग हुंडयाकडे होऊं नये यासाठींच आपल्याला जपायचं. मुख्य सांगायचं तें हेंच कीं, हुंडा दिला जाऊं नये किंवा घेतला जाऊं नये. आणि या कामीं इकडे किंवा तिकडे, जाणून बुजून किंवा न कळत, प्रत्यक्ष किंवा आडून कोणत्याच प्रकारची मदत कुणी कुणाला करूं नये.

या हुंड्यापायीं पाहतां पाहतां तीन चार घराणीं रसातळाला गेलीं. आपल्या या अण्णासाहेबांनीं चिमुकरितां किती किती स्थळं

पाहिली. तिचं आपलं कुठेच जुळायचं नाहीं. कुठे गोत्रच असूं नये, कुठे गणच आडवा यावा, कुठे नाडच नडावी, असं जिथें पहावं तिथें आपलं व्हावं. बरं, जुळल्याच कादाचित या गोष्टी तर मंगळच मधें निघावा. असे ते भंडावून गेले याच्यापायीं कीं, कांहीं विचारायची सोय नाहीं. उद्योग सुचूं नये, धंदा सुचूं नये, घर सुचूं नये, कांहीं कांहीं म्हणून सुचूं नये. अशा रितीनं, त्यांनीं सहा सात वर्ष या स्थळासाठीं दोन दोनशें कोसापर्यंत जाऊन येण्यांत घालवलीं. जवळ जवळ लग्नाच्या अर्धा पैसा त्यांनीं असा खर्च केला. तरी तिचं बाशिंगबळ कुठेच फळाला येऊं नये. आलंच एकाद्या ठिकाणीं तर या हुंडयानंच आ पसरावा. अगोदरच स्थळं पाहून पाहून कंटाळून गेल्यामुळें पुढें पुढें गणगोत्राखेरीज इतर पत्रिका पहाण्याच्या ते भरीसच पडत नसत. मुलाचं शिकणं सवरणं, घरची स्थिति, इकडे सुद्धां त्यांचं फारसं लक्ष नसे. मुलीला जेमतेम सुखानं अन्नवस्त्र मिळण्यासारखं घर दिसलं कीं, तेवढयानंच त्यांना इतका कांहीं आनंद होई, की, त्यांत ते झालेले सगळे श्रम विसरून जात न् त्यांना पुन्हा नवी उम्मेद येई. पण, लोभामुळें किंवा परभारे खर्च काढण्याच्या युक्तिमुळें अशाही ठिकाणीं आपल्या आवाक्याबाहेर हुंडयाचा प्रश्न निघाला कीं, त्यांची एकदम कंबर खचे. अशी, कांहीं नाहीं तरी निदान, पांच पंचवीस स्थळं त्यांचीं हातचीं गेलीं. एवढा मोठा गृहस्थ, हुशार, हिंमतीचा, चांगला पैसेवाला, पण अगदीं मेटाकुटीला आला. त्यांची अशी कुठे निराशा झाली कीं, बिचाऱ्यानं त्या पोरीचा न् आपला

संताप करून घ्यावा. वरांत त्याच्या त्याच्यावर कातवाव, चिडाव, अशी कांहीं वेड लागल्याचीच गत करावी. त्यांचा तरी काय उपाय ? पोर अगदीं गळ्याशीं आलेली; चांगलं सोळाव वरीस तिला संपायला आलं होतं. काकू दिखील, त्यांची ही स्थिती पाहून अगदीं गप बसत न् मनांतल्या मनांत झिजत. गावांतल्या बायका आणखी, पोरीविषयीं विचारून विचारून पाठ पुरवीत, म्हणून तिथिपर्वणीला सुद्धा, पुराणाला, देवदर्शनाला किंवा हळदकुंकवालाही घराबाहेर त्या तोंड काढीत नसत. दोन चार वेळां मी माझ्या डोळ्यांनीं पाहिलं आहे, कीं, काकूंना आपण विचारावं एक, न् त्यांचें उत्तर एक. काकुंनीं असं जेवायाला बसावं, पण त्यांच्या हातांतला घास हातांतच राहावा. एकदां तर त्यांनीं कढवून ठेवलेलं तूपच तांदुळ धुवायला घेतलं; अन् हात पोळला तशा मग चपापल्या. आईबापांची अशी स्थिति असल्यावर गंपूच तरी अभ्यासांत कसं मन लागावं ? इंटर झालाच होता; कसा बसा नेट धरून जूनियरचा सिनियर झाला. असंच आणखी एक वर्ष निभलं असतं तर बिचारा बी. ए. तरी झाला असता. पण लग्नाच्या खर्चापायीं बाप अगदीं टेकीस आला. शिवाय अण्णांच्या न् काकूंच्या अशा स्थितिमुळें घराचं इतर अनेक रीतींनंही नुकसान होऊं लागलं. दुसऱ्या कुणाचा पाठिंबा नाहीं. सारा भार काय तो याच्याचवर येऊन पडला. तेव्हां बापड्याला आपले सगळे विचार बाजूला ठेऊन अवेळीं पोटाचा उद्योग पहावा लागला. अगोदरच दिसण्यात सुरेख, तशांत कधीं कान सुद्धां ऊन झाल्याचं ठाऊक नसल्यामुळें शरीरं कसं तांब्याच्या

सुकडयाप्रमाणें ठेवलेलं. पण, घरची काळजी अंगावर पडून चार दिवस दिखील झाले नसतील तोंच अगदीं दुबळा काय झाला, डोळे काय खोल गेले, चेहरा काय काळवंडला, असा, चार महिन्यांत पुरतां तो ओळखू सुद्धां येईनासा झाला. बिचाऱ्याचे सगळे मनोरथ जागच्याजागीं राहिले. नाहीं तर कसा चुणचुणीत न् गमती होता. हें सगळं कशामुळे ? या हुंडयामुळेंच ना ? अशा रीतीनं तें सबंध घरचं घर बसलं. अशी एक, की दोन, कीं तीन, किती तरी उदाहरणं दाखवितां येतील ? दप्तरदारांचं, लिफाफ्यांच, पिनाक्यांचं, हीं आतां आतां पाहिलेली डोळपादेखतचीं उदाहरणं. एकेकाची आठवण झाली कीं, तिऱ्हाइताच्या अंगावर देखील शहारे येतात. ज्या घराण्यांचा दुसऱ्यांनीं हेवा करावा, त्यांचीच या हुंडयामुळें अशी दशा व्हावी ना ? या शिवाय लगीनसराईच्या दिवसांत दुसऱ्यांचे हाल पाहूनच, लेकीचं नांव निघालं कीं, पूर्वजमींचं महान् पातकच डोळ्यापुढें उभं राहतं. पायपिटी पुसूं नका, खुशामत पुसूं नका, मध्यस्थि पुसूं नका, करतां करतां बिचाऱ्या लेकीच्या बापाच्या नाकीं नव येतात. इतक्यानही त्या पापाची फेड पुरती होत नाहीं म्हणून कीं काय, नवऱ्याकडच्या बायकांच्या कुचक्या नासक्या शब्दांनीं, मुलांच्या पोरचेष्टांनीं न मंडळीच्या घालून पाडून बोलण्यानीं त्याचा जो काय पदोपदीं अपमान होतो, त्यानं तर बापडयाला जीव अगदीं नकोसा होऊन जात असेल तें एक असो. पण या हुंडयाचं जों जों बाई मनांत येतं तों तों आपलं मनाला अधिकच दुःख वाटतं.

मला बाई मोठं कोडंच आहे या हुंडयाचं. हा मागतात कशाचा न् देतात कशाचा ? कीं, ज्याला ज्याला म्हणून मुलगा आहे, त्याची, ही आपली जहागीरच ! कीं, मुलगी असणं हा जसा गुन्हाच म्हणून जर हा हुंडा मुलाला मिळत असेल, तर, अशी बळजबरीची देणगी कुठे कांहीं ऐकण्यात नाहीं. कारण देणगी म्हटली कीं, देणाऱ्याच्या खुशीची गोष्ट झाली. तो आपल्या खुशीनं पांच, पांचशे, पांच हजार. काय वाटेल तें देवो. किंवा मुळींच एक पैहि न देवो. बरं, देणगी नसली, न् हक्क म्हणून जर मुलाकडले हा हुंडा मागत असले, तर हा हक्क तरी कुठला ? हे हुंडा मागणारे मुलीवाल्यांचं असं काम तरी काय करतात, त्यांच्या असे कोणते उपयोगी पडलेले असतात, म्हणून त्याच्या फेडीबद्दल त्यांना हा हुंडा मागण्याचा हक्क पोंचतो ? होऊं नये असं कांहीं झालं न् मुलीवर कांही संकट आलं, तर तिला कांहीं त्रास होऊं नये म्हणून मुलीकडले जर ही तरतूद करून ठेवीत असले, तर, ती, अमुकच करा, इतकीच करा, म्हणून, मुलाकडच्यांनीं मुलीवाल्यावर जुलुम करावा, याचा काय अर्थ ? मुलीची माया मुलाच्या बापाला अधिक कीं, मुलीच्या बापाला अधिक ? प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यासाठीं ज्याच्या आतडयाला एवढा पीळ पडतो, कीं, त्यासाठीं पाहिजे ते हाल तो सहन करायला तयार होतो, त्याला, मुलीच्या बापानं, कीं, ज्यानं मुलीला कधीं जन्मांत पाहिलेलं नसतं, त्यानं का शहाणपण शिकवायचं, मुलीचं सुख कशात आहे म्हणून ? दुसरं, हें कसं त्यांच्या लक्षांत येत नाहीं, कीं, मुलीवर जर कधीं कांहीं

प्रसंग आला, तर, तो मुलाकडूनच ना येणार ? मग त्यांनीं तिला संकटांत घालायची, त्यांच्याच स्वाधीन तिची तरतूद करायची, हा न्याय, का व्यवहार, का काय ! हें एक झालं; शिवाय या लोकांचं आणखी हे पाहिलं कीं, यांना काय बाई हसावं, कीं, यांची कीव करावी, कांहीं कळत नाहीं मी म्हणते, संसार करायचा तो मुलीशीं कीं पैशाशीं ! मुलाला जन्मभर पुरणार कोण ! मुलगी कीं पैसा ! मुलाला सुख लागायच, तें मुलीनं कीं पैशानं ! मग, दोन दिवसही न टिकणाऱ्या पैशासाठीं आयुष्यभराच्या सुखावर लाथ मारायची, हा का समंजसपणा कीं दूरदृष्टी ! म्हणायचं तरी काय याला ! म्हणून माझं वारंवार सांगणं आहे कीं, काय वाटेल तें करायच, पण हुंडयाच्या नांवाचा आपल्या घरावर शिंतोडा सुद्धा नको.

१२

केवढा अनर्थ झाला म्हणायचा आतां हा ! दुर्दैवानं गूंगताईचा पुरताच पिच्छा पुरवला आहे जसा. जन्मापासून, हात धरून, म्हणात्रं तसं, तें मागें लागलं आहे. असा जन्म तरी कोणत्या नक्षत्रावर झाला देव जाणे. खरं म्हटलं तर काय कमी आहे ? तळहातावरच्या फोडालासुद्धां इतकं कुणी जपणार नाहीं. आईबापावाचूनचं लेकरूं, म्हणून आतेनं अगदीं जीव का प्राण करावा. स्वतःला पोरबाळ नसल्यामुळें दोघाहीं

नवराबायकोनीं, हातावरल्या हातावर म्हणतात तसं, झेलून संभाळलं. तऱ्हेतऱ्हेचे लाड दिखील इतके पुरवले कीं, पोटच्या पोराचेही पुरवणार नाहींत कुणी तसे. तिच्या तोंडातून निघायचा अवकाश, कीं, म्हाताऱ्यानं लगेच माणसाला धाडून ती वस्तू बाजारांतून आणवावी. वेळेकडे, पैशाकडे, श्रमाकडे, कशाकडे पाहूं नये. कुठें कांहीं चमत्कारिक किंवा नवीनसं दिसलं कीं, न मागतां त्यानीं तें आणून द्यावं. वयाला शोभतील त्याप्रमाणें, कपडे, खेळ, खाण्याचे पदार्थ कांहीं म्हणून शिल्लक ठेवले नाहींत. मेळे, यात्रा, गावच्याच काय, एक दोन दिवसांत जाऊन येण्यासारख्या परगांवच्यासुद्धा, दाखवायला कमी केल्या नाहींत. अमक्या ठिकाणी अमुक आहे, असं नुसतं कानावर येण्याचा उशीर कीं, त्याप्रमाणें व्हायचंच. कसली, कसली म्हणून हौस बाकी ठेवली नाहीं. अमळ आंग ऊन झालं पुरे कीं, दिवसांतून चार चार वेळा वैद्याकडे, डाक्टराकडे, माणसाला पायपिटी करता करता पुरेवाट व्हायची. एवढंस तोंड कुठें उतरलेलं दिसलं कीं, दोघांचा जीव, काय झालं म्हणून, खालवर होऊं लागायचा; नू त्यांना अगदीं सुचेनासं व्हायचं. अशी त्या दोघांची माया! प्रत्यक्ष आईबापांनीं तरी यापेक्षां अधिक तें काय केलं असतं? लग्न होईपर्यंत, पंधरा वर्षे सारखी अशी स्थिति होती.

रंगुताईनं दिखील आपल्या आईबापांचें—जन्म देणारे आईबाप दुसरे असले तरी खरे आईबाप हेंच म्हणायचे आतां—चांगले पांग फेडले जसजसं तिला कळूं लागलं तसतसं ती फार जपून वागे,

अजूनही तिचं तेंच वळण आहे. फारच सालस न् गरीब. जें असेल, मिळेल त्यांत आपली संतुष्ट. मला अमकं हवं, तमकं हवं, कधीं म्हणून निघायचं नाहीं तिच्या तोंडातून. पहाव तेव्हां तिचं मुख प्रसन्नचं दिसायचं न् सदोदित आपली कांहीं ना कांहीं उद्योगांत असायची. कोणतंही काम सांगा तिला, ती तें आपली नीटनेटकं, टापटीपीनं न् मुकाट्यानं करून देईल. कामाचा कंटाळा जसा तिला शिवलाच नाहीं. आत्याबाई अमळ रिकाम्या दिसल्या, किंवा त्यांना करमेनासं झालं कीं, नेहमीं आपल्या इकडल्या तिकडल्या किंवा वाचलेल्या ऐक-लेल्या गोष्टी सांगून तिनं त्यांची करमणूक करावी. सांगतांना कधीं गडबड, कीं घांदल, कीं घोटाळा, तिळमात्र दिसायचा नाहीं. तसंच, कधीं लडाकडा येईल, किंवा अंगाला झोंबेल किंवा गळ्यांत पडेल, तर तें अगदीं नाहीं. हळूच आपली येईल, मुकाट्यानं बसेल, रागरंग पाहील न् तसा आपला आरंभ करील. कधीं कामांत चुकारपणा करायची नाहीं. कांहींच नसलं, तर, आली तशी जाईल, न् दुसरं एकादं काम पाहील. आतोबांनीं म्हणजे, तात्यासाहेबांनीं जरी तिला चहूंकडे न्यावं, घेऊन फिरावं, तरी जशी ती मोठी झाली न् तिला समजू लागलं, तशी ती त्यांच्या समोरसुद्धां कामावाचून जाईनाशी झाली. तात्यासाहेबांनीं या तिच्या गुणाचं ज्याच्या त्याच्या जवळ कौतुक करावं. मुलगा म्हणा, मुलगी म्हणा, हीच त्यांना सगळ्याच्या ठिकाणीं असे. हिला जेव्हां तेरावं उलटून चौदावं लागलं, न् जेव्हां ती अंमळ उंच दिसूं लागली, तेव्हां सगळ्यांनीं त्यांना आग्रह केला, यंदा हिचं

कार्य उरकून घ्या म्हणून. पण खेळपटकीच्या कहराकडे पाहून त्यांचा कांहीं जीव होईना त्या गोष्टीला. नाहीं तें नाहींच ऐकलं त्यांनीं कुणाचं. मग जेव्हां तिला पंधरावं सरायला आलं न् आतां वाट पहायची सोय उरली नाहीं, असं दिसलं, तेव्हां त्यांनीं कोंच वैशाखांत तिला उजवून घेतली. तों पावेतों खुशाल तिला शिकू दिली. शिकण्यानं तिचा फायदाच झाला. पण फायद्यासाठीं म्हणून त्यांनीं तिला शिकवली असं नाहीं. उगीच, शेजाऱ्यापाजाऱ्यांचा आग्रहावरून त्यांनीं हें केलं. तरी तिला शाळेंत घालायला त्यांचा धीर होईना. एक चांगली पोक्त बाई पाहून तिला त्यांनीं दिवसभर शिकवायला ठेवली. नशीबानंच म्हणायच्या, बाईही त्यांना सगळ्या रितीनं चांगल्या मिळाल्या. पैशाकडे न पाहतां त्यांनीं रंगूला निरपेक्ष बुद्धीनं शिकवलं. असं असल्यावर रंगूसारखी मुलगी तयार व्हायला काय कठीण ? तात्या-साहेबांनीं परिक्षेला बसूं दिली नाहीं ही गोष्ट निराळी. पण घरच्या घरीं सहा सात वर्षांत रंगूचं मॅट्रिकपर्यंत शिकणं व्हावं, ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आणि पुढें तर तिचं कल्नाच झालं. मला त्यावेळीं वाटलं होतं, इथेच हें सगळं संपलं म्हणून. पण, तेवढ्यापुरतं तरी, तिचं भाग्य थोर खरं. शोभेल न् तिच्या गुणांचं चीज करील असाच तिला नवरा मिळाला. लग्न झाल्यावरही त्यानं तिला त्याच बाईकडून शिकवून परीक्षेला बसवली. व सुदैवानं ती पासही झाली. पुढे तिनं इंटरचाही अभ्यास चालवला होता. पण, मग गर्भारपण, बाळंतपण मागें लागल्यामुळें तें सर्व तितकंच राहिलं. पहा पण, एकुलता

एक मुलगा, पण तोही कांहीं लाभला नाहीं.

जिव्हाळ्यानं वाढवलेली पोर, एकुलती एक, एवढी गुणाची, मातृहीन, पितृहीन, तिचं कोण करायला न् पहायला, म्हणून तात्यासाहेबांनीं तिचं लग्न किती थाटानं न् हौशीनं केलं. उजवताच पोर संसाराला लागावी, घरचं सगळं सुख तिला मिळावं, म्हणून त्यांनीं लग्न मुद्दाम इतक्या उशीरा केलं. मनासारखा चांगला दोन परीक्षा दिलेला, एम. ए. जांवई मिळाला, त्या आनंदांत त्यांनीं खर्चाकडे लक्षच दिलं नाहीं. श्रीमंतीचा पोशाख, शेला, पागोटं, शालजोडी, पितांबर आंगठी, तांब्यापंचपात्र चांदीचा, बिगवाळी, धोतरजोडा, सलकडं असं जें जें त्यांना सुचलं न् इतरांनीं वेळेवर सुचवलं तें तें करायला त्यांनीं मागें पुढें अगदीं पाहिलं नाहीं. याशिवाय रंगूला दिलं तें निराळंच. एकंदर, कांहीं नाहीं तरी दोन हजारांची करणी केली असेल. हजार रुपये हुंडाच द्यायला तयार झाले होते. पण जांवईबुवांनीं निक्षून सांगितल्यामुळें व्याह्यांचा न् त्यांचा निरूपाय झाला. तेंव्हां तें त्यांनीं अशा रीतीनं दिलं.

अशा स्थितींत आतां त्यांची काय अवस्था झाली असेल? नुसत्या कल्पनेनं काळीज चर होतं. रंगूच्या जिवाचे त्यांनीं नाहीं नाहीं ते सोहाळे पुरवले. तिला यत्किंचित् दुःख किंवा त्रास होऊं नये म्हणून चांगली जाणती झाल्यावर मोठ्या सावधगिरीनं लग्न केलं. त्याचं शेवटी दैवानं त्यांना हें फळ दिलं. लग्नाला अजून पुरतं तिसरं वर्ष देखिल उलटलं नाहीं. ज्या कर्माला ते इतके भीत होते, तेंच

त्यांच्यापुढें आयतं चालत आलं. दुसऱ्यांच्या पोरींच्या फटफटीत कपाळाकडे पाहिलं म्हणजे रंगूविषयीं त्यांचं मन कसं धाकधुक करूं लागावं. त्यांचा चेहरा ताबडतोब फिका पडावा. मग काय, पुढें होणाऱ्या गोष्टीची त्यांचं मन त्यांना अशा रीतिनं साक्षच देत होतं की काय न कळे. आत्याबाई बायको मनुष्य, पण त्यांनीं सुद्धां नावं ठेवावी तात्या साहेबांना, असं पाहिलं म्हणजे, इतका त्यांचा रंगूवर जीव होता. किती कोवळीं पोर! अठराव सरून एकोणिसाव लागेल तिला आतां या जेष्ठांत. चिंतूचा न् तिचा एकाच महिन्यांतला जन्म. तिची आतां काय अवस्था व्हावयाची? सासरीं का तिचा निभाव लागायचा आहे आतां? वडील दीर बाइलबुद्धि न् जाऊ खारेली. रंगूचा नवरा दोहीं-कडून कानकोंडा होई. उगच आपले सासुसासरे होते म्हणून तेवढा दाब तरी होता त्यांच्यावर; न् हाही आपला त्यांच्याकडे पाहून कांहीं झालं तरी तितकं मनावर घेत नसे. ही दोघंही सालस न् सुशीलच खरीं. आईबापासाठीं बिचारे सगळं मुकाट्यानं सहन करून राहिले. बाहेर एवढं सुद्धां दिसूं दिलं नाहीं घरांतलं. तरी त्या दोघांनीं मात्र यांच्या नांवाचा बाहेर गाजावाजा करायला कमी केलं, असं नाहीं. पण यांचीही शहामतच म्हटली पाहिजे. यांनीं त्यांचं वाकडं न घेतां उलट आपली संपादणीच करावी. म्हाताराम्हातारीचं सोनं झालं तरी लोकांत भेदभाव दिसूं नये म्हणून चार सहा महीने दम खाऊन परभारे आपली बदली करून घेऊन वेगळे निघाले. तरी तसं त्यांच्या मनांत येऊं नये म्हणून औपचारिक का होईना, कुशल पत्रव्यवहार,

सुट्टीतून जाणं येणं, मुलांना खेळ खाऊ वगैरे त्यांनीं चालू ठेवलंच होतं. गेल्या दहा बारा महिन्यातच रंगूला जें काय स्वतंत्र सुख मिळालें असेल तेवढंच. त्याच्यापूर्वी लग्न झाल्यापासून चार सहा महिनेच एके ठिकाणी होती सगळी मंडळी. पण तेवढ्यांत एक दिवस तरी सरस्वतीबाईंनीं तिला सुखं पाहिलं असलं तर शपथ. सारा दिवसभर, काय तो रंगूचा खार न् आपला दिमाख चालायचा. तरी हिनं त्यांच्या लेकराबाळांच्या हव्या तशा खस्ता खाल्ल्या. कामकाज किंवा एकाही लेकराची आवर, याची चुकून तरी ओळख असेल बाईला तर शपथ पण रंगूताईनं तिच्या पोरांची किळस का कंटाळा का कांहीं, अगदीं न करतां हिनं त्यांच्या चारी पोरांना कसं नीटनेटकं ठेवलं होतं. त्याचं कधीं तोंडातून अक्षर सुद्धां निघूं नये. त्यावेळीं, उलट, सासुसासरे यांनीं हिचे कुणाजवळ सहज आपले कांहीं गुणं गायले किंवा कुणी हिची एकादी चांगली गोष्ट त्यांना येऊन सांगितली तर तिचा अगदीं तिळपापड होई. न् मग काय विचारायच, दिवसभर घरांत. तिची तणफण चाले. रंगू ज्यावेळेस नवऱ्या बरोबर रंगपूरला गेली, तेव्हां तिच्या दिराला आपल्या बायकोचीं एक एक लक्षणं दिसून आलीं. आणि मग त्याला रगूचे एकेक गुण आठवायला लागले. पण मग काय उपयोग ! आतां जरी तिला रंगूची वारंवार आठवण येते तरीं तिचा मूळचा स्वभाव का जाणार आहे ! नाहीं तर रंगूनं अजून सुद्धां त्यांच्याजवळ राहायला नाहीं म्हटलं नसतं. तिला सरस्वतीबाईचा स्वभाव पुरता पाहित आहे. आणखी, आतां तिला तात्यासाहेब कशी आपल्यापासून दूर ठेवतील रंगूला इकडे आपले

तेव्हां तात्यासाहेब होतेच बरोबर. त्यांचा तेव्हांच आग्रह होता तिला आपल्याबरोबर न्यायची म्हणून. पण तिनंच त्यांची मोठ्या ह्यानी समजूत घातली. वर्षभर तरी असं करतां येत नाहीं. उगाच जनापवाद यायचा म्हणून. तरी आतां, आत्याबाईला ठेवलंच आहे त्यांनीं तिच्याजवळ. त्यांचही म्हणणं होतंच तोंवर मी तिच्याजवळ राहीन म्हणून.

अलिकडे रंगूच्या दिराचं तिच्याकडे फारच लक्ष असत. त्याला आतां मागच्या गोष्टीबद्दल भारीच वाईट वाटत. आत्याबाईजवळ, तात्यासाहेब मधून मधून येतात तेव्हां त्यांच्याजवळ, नेहमीं तिचे गुणानुवाद चाललेले असतात. अमळ समोर दिसली नाहीं कीं विचारपुस होते. तशीच तिच्या जेवणाखाणाची, दुखल्याखुपल्याची काळजीपूर्वक चौकशी होते. पण हें असं सतत टिकेल तेव्हां म्हणायच खरं. चमत्कार हा कीं जाऊबाईही आपला पाहिला खार पार विसरून गेल्या. भाऊजींची आठवण झाली कीं, त्यांना पोटांत कसं मडमडून येतं. रंगूला त्या इकडची काडी इकडे देखील करूं देत नाहीत. सध्यांच काय सांगतां येतं याचं म्हणा. पण व्यवहारांत पावलोपावलीं जपून वागलेलं बरं असतं.

रंगूला आठ चार दिवसांतच नवऱ्याच्या विम्याचे दोन हजार रुपये मिळायचे आहेत. त्यांची व्यवस्था तात्यासाहेब लावून देणार आहेत. ते त्यांत हजार दीड हजार रुपये पदरचेही घालणार आहेत. तात्यासाहेबांचा केवढा भ्रम होता लोकांत ! पण त्यांच्याजवळ याच्याशीवाय कांहीं अधिक दिसत नाहीं. आणि असणार तरी कुठून ! रंगूकरतां त्यांनीं थोडा

का पैसा उधळला आजवर ? आतां एक शेतवाडी आहे काय ती दहावीस बिघ्यांची. तीही ते रंगूच्यांच नावची करून ठेवणार आहेत. तात्यासाहेब आहेत तोंवर सगळे ठीक आहे. पण, त्यांचा न् आत्याबाईचा आतां म्हटला म्हणजे गुचकीचाही भरवंसा नाही. त्यांच्याभागें शेतवाडीचं उत्पन्न म्हणजे नशीबाचीच देणगी. कारण, मग कोण आहे असं तिचं काळजीनं आवरणारं ? असा, आतां तिला मुख्य आधार काय तो तीन साडे तीन हजार रुपये नगदी आणि जमिनीचे काय येतील ते. पण एवढ्यानं काय होणार. महागाई कोण आजकालची ! एकटा जीव असला म्हणून काय झालं ? काय लागत नाहीं मनुष्याला ? दिसायला एवढे रुपये दिसतात खरे. पण, किती ही शहाणपण असलं तरी बायकामाणसाच्यानं बाहेरली दगदग का पुरवणार आहे ? कुणी म्हणेल गहाणवटीवर रुपयांची देवघेव केली तर घरबसल्या पंचवीस रुपये दरमहाला काय हरकत आहे ! पण, मला बाई असं वाटतं, कीं, ह्या गोष्टी सांगायला सोप्या दिसल्या म्हणून करायला का तशा असतात ! हिशेबाची कसोशी, दुसऱ्याच्या रकमांची जोखीम, भल्याबुऱ्याशीं गांठ, शहाजोगांची जोख ह्यांच्या भानगडी ज्याच्या त्यालाच ठाऊक. थोडक्यांत म्हणायचं म्हणजे बायकांचे व्यवहार बहुतेक परस्वाधीनच. तेव्हां किती ही पैसा असला तरी, तो केव्हां पुरातारा होईल याचा काय नेम ? म्हणून, रंगूनं असा विचार ठरवला आहे; वरिसभर कांहींच करतां येत नाहीं. तोंपर्यंत तात्यासाहेबांचं हळूच युक्तियुक्तीनं मन वळवायचं, न् त्यांची संमति मिळ-

वायची. आणि पुढल्या वर्षापासून मेडिकलमध्यें भरती होऊन तिथला पांच वर्षांचा कोर्स पुरा करायचा. हो, उगीच आपला रिकामा वेळ दवडायचा न् तुकडे मोडीत पडायचं, त्यापेक्षां एरवीं वाया जाणारा देह स्वार्थीं न परमार्थीं झिजून सार्थकीं लागला तर काय वाईट ?

१३

रंगूची स्थिति किती तरी बरी आहे. शिकलेली आहे; जवळ थोडी फार माया आहे. तात्यासाहेबांचा आधार आहे. पण विनतेला यापैकीं कांहीं तरी होतं का ? उगच ट, फ, करतां येत असलं, तर तें काय शिक्षण म्हणायचं. नवऱ्याला पगार सारा पंचवीस की तीस रुपये. तेवढयांत आई, भाऊ धाटका, दोन लहान लेकरं न् दोघं नवराबायको इतक्यांचा संसार चालायचा. तरी तितक्यांतल्या तितक्यांत कसाबसा प्रपंच रेटीत सगळीं माणसं गुण्यागोविंदान् नांदत होती. पण, दैवाला तेवढं दिखील खपलं नाहीं. प्लेगानं सासू, दीर, नवरा या तिघांचे लागोपाठ तीन बळी घेतले; आणि तिला सर्वस्वी उघडी केली. बिचारीला कोणी थारा सुद्धां देईना दोन दिवस. पोरांची तरी कुणाला कींव यायची होती. पण आपलं दैवच फिरल्यावर लोकांची बुद्धि फिरली तर त्यांत काय नवल ! अशा स्थितींत, दुसरी एकादी असती तर, घाबरून प्राण सोडला असता किंवा भांबावून जीव दिला असता.

न् मग त्या बापड्या मुलांचे काय काय हाल झाले असते न् काय काय नाहीं, तें देव जाणे. आणि मग कसल्या तरी हीन स्थितींत सारें आयुष्य घालवावे लागून बिचारे जन्माला येऊन न येऊन सारखेच झाले असते. ह्या तिच्या दैवाच्या धिडवडयानीं खरं पाहिलं तर ती अगदीं भंडावून जायची. पण तिचा जीव त्या मुलांसाठीं सारखा उलथापालथा होई. त्यांच्याकडे पाहून ती आपलं सर्व दुःख गिळून घेई. हीं मुलं नसतीं तर ती कांहीं एकटी जगली नसती. त्यां मुलांसाठीं म्हणून, इतके प्रसंग तिच्यावर आले, त्या सर्वांना न डगमगतां निकरानं तोंड देऊन त्यांतून तिनं शहाणपणानं आपला निभाव करून घेतला. जवळचं किडुकमिडुक मोडून तीस चाळीस रुपये झाले तेवढयावर, केवळ लोकापवादाच्या भीतीनं, परगावीं जाऊन दवाखान्यांत तिनं नर्सचं काम पत्करलं. कुणाचा वशिला नसल्यामुळें महिना पंधरा दिवस बिनपगारीच तिला काम करावं लागलं. तसेच, अंगावर तेही दिवस तिनं काढले. पुढें पगार चालू झाला. पण नर्सचा पगार तो कितीसा असणार असा ? पण तेवढ्यावर असल्या महागाईच्या दिवसांत, गरिबीचा म्हटला, तरी, तीन माणसांचा संसार कसा चालायचा ? तेव्हां अर्थातच तिला दुसऱ्या कामाची जोड पहावी लागली. थोडं थोडं लिहितां वाचतां येतच होतं तिला अगोदर. हेड नर्स मात्र त्या मानानं बरीच शिकलेली होती. पांच सहा पुस्तकं इंग्रेजी तिची झाली होती. दवाखान्यांत जाऊं लागल्या पासून आठ चार दिवसांत तिची मर्जी संपादून फावल्या वेळांत तिच्याजवळ शाळेप्रमाणेंच ती अभ्यास करूं लागली. रात्रीचा दिवस

करून सुमारें महिनाभरांत तिनं बरंचसं—कामापुरतं—शिकून घेतलं. न् त्याच्यावर, चार पांच रुपये महिन्याची तिनं एक शिकवणी मिळवली. इकडे शिकणंही तिचं चालूच होतं. अशा रितीनं दोन तीन महिने गेल्यावर थोड्या अधिक मिळकतीच्या दोन शिकवण्या मिळवून पहिली होती, ती, अभ्यासाला वेळ पुरवेना म्हणून सोडली. तिचं काम असं नियमित न् चोख कीं, सोडतांना तिथून, मदत म्हणा, बक्षिस म्हणा, पगाराशिवाय दहा रुपये तिला अधिक मिळाले. त्या ठिकाणीं ती सर्वांना इतकी आवडूं लागली होती कीं, आपली शिकवणी तिनं सोडूं नये म्हणून ती मंडळी तिला फुकाचा आग्रहच करून राहिली नाहीं; तर, दुसरीकडच्यापेक्षां दोन रुपये महिना अधिक देण्याचंही त्यांनीं कबूल केलं. पण वरच्या वर्गाच्या शिकवणीनं आपल्या अभ्यासाला चांगली मदत होते म्हणून कांहीं दिवस तरी खालच्या वर्गाची शिकवणी, जास्त प्राप्तीची असली, तरी, करतां येत नाहीं असं मोठ्या मिनतवारीनं समजाऊन सांगून त्यांच्या ह्या उपकार बुद्धीबद्दल कृतज्ञताही वाणीनं न् वागणुकीनं प्रगट करून दाखविली. असं तिनं जवळ जवळ दीड वर्षं, अमळ अधिकच काढलं. तितक्या अवकाशांत तिची इंग्रजी सहा बुकं होऊन जवळ कांहीं नाहीं तरी दोनशे रुपये झाले. हिच्या गोड वागणुकीनं दवाखान्यातल्या एकूण एक अधिकाऱ्यांची तिच्यावर मर्जी बसली. त्याचा फायदा असा झाला कीं, पुढें तिला नर्सचं काम संभाळून स० अ० वर्गात भरती व्हायला मुळींच अडचण पडली नाहीं. पाहतां पाहतां ती चार वर्षंही निघून

गेली आणि तिला उत्तम सर्टिफिकेटही मिळालं. नामांकित मिडवाइफ म्हणून तिची अगोदरपासून ख्याति होतीच. तिच्यांत आतां आणखी अशी भर पडली. या वर्गात जाऊं लागून वरिस दीड वरिस झालं असेल नसेल तों तिला लोकांची वरचेवर बोलावणीं येऊं लागलीं. आणि पैशाची प्राप्तीही चांगलीच होऊं लागली. म्हणजे पूर्वी मोठ्या कसोशीनं वागावं लागत असे, तें आतां नाहींसं होऊन थोडी फार प्रत्येक महिन्याला शिलकही पडूं लागली. वडील मुलगा तिचा या वेळीं आठ वर्षांचा झाला होता. त्याच्या शिकण्याची हेळसांड किंवा चालढकल करण्याची सोयच नव्हती. अडचणीमुळें त्याच्याकडे इतके दिवस तिला लक्ष घालायला झालं नाहीं, ही गोष्ट वेगळी. एरवीं, स्वतः च्या अनुभवानं शहाणं झाल्यावरही तिच्याकडून असं होण्याचा संभवच नाहीं. म्हणून, शाळेंत तो जातच होता, तरी तिनं पाच सहा रुपयां-वर इंग्रजी शाळेतला गरीब पण हुशार विद्यार्थी त्याला शिकविण्यासाठीं ठेवला. धाकट्याचं नुकतंच सहावं संपलं होतं. तेव्हां त्याची इतकी घाई नव्हती. तरी ती फावल्या वेळीं त्याच्याकडे लक्ष पुरवल्यावाचून राहत नसे. अशा रीतिनं नवऱ्याच्या मागे पांच सहा वर्षं तिनं मोठ्या कष्टानं काढलीं. आतां तर ती एका दवाखान्यावर मुख्यच आहे. आणखी पन्नास रुपये पगारही तिच्या मानाला बराच म्हणायला हरकत नाहीं. हें कायम उत्पन्न असून वर शिवाय खाजगी औषधयाण्याचे, रोग्यांच्या समाचाराचे वगैरे मिळून जवळ जवळ—जरा अधिकच पगारापेक्षा—मिळतात ते निराळेच. गांवचे सगळे लोक तिची वाखाणणी

करतात. कधीं कुणाला पैशासाठी अडवायची नाहीं. मिळेल ते घेईल; पण काम सगळ्यांचं सारखंच करील. फिरून, गरीबीश्रीमंतीची तिच्या जवळ भीड नाहीं. अशा वेळीं पैशाचा नुसता विचारही तिला शिवत नाहीं. ह्याविषयींची तिची एक गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. एकदां काय झालं; केसुभटजीचा वडील मुलगा वासू आजारी पडला. म्हणायला, चिंचेच्या झाडावरून त्यानं खाली उडी घातली हें काय तें निमित्त पण संध्याकाळीं त्याला सपाटून ताप भरला न् जांगेत एक अवधान आलं, त्यामुळें दोघाही म्हाताराम्हातारीच्या तोंडचं पाणीच पळालं, त्यासरशी म्हातारा धापा टाकीत डाक्टरीणबाईकडे गेला. योगायोग असा कीं, यांनीं दारांत पाऊल टाकलं मात्र तोंच तिथलचे इनामदार देवकुळे यांची बायको एकाएकी भोंड येऊन बेशुद्ध होऊन पडली. अशी खबर घेऊन त्यांचा कारकून बगीसह डाक्टरीणबाईस नेण्यासाठीं आला. देवकुळ्यांकडे आजवर ती अनेकदां गेली होती. दर खेपेस तिला तेथून चांगलीच प्राप्ति होत असे. श्रीमंतच ते. त्यांना काय कमी ? तशांत त्यांचा हात, विशेषतः इनामदारीणबाईचा हात जरा सढळच. मागचं बाळंतपण अगदीं त्रास न होतांना झालं म्हणून त्यांनीं विनतेला एक भारी लुगडं, तिच्या दोन्ही मुलांना उत्तम पोशाक, आणखी तीनशे रुपये नगदी, इतकं दिलं. तरी केसुभटजीचं बोलणं पहिल्यानं ऐकून घेऊन मग ती त्या कारकुनाकडे वळली. त्याचं ही बोलणं शांतपणानं ऐकून घेऊन, खुबीनं त्याची समजूत घालून, इनामदारांच्या रस्त्यावरच जरी केसुभटजीचं

घर होतं तरी स्वतंत्र भाड्याचा तांगा करून अगोदर ती त्यांच्याच घराकडे गेली. त्यावेळीं गावांत कुठे कुठे तुरळक प्लेगचा संचार असल्यामुळें केसुभटजींच्या मनाची घाबरलेली स्थिति पाहून तिनं तेव्हां मुद्दामच तांगा केला आणि भाड्याचे पैसे जवळूनच दिले. इनामदारांच्या बगींत न बसतां स्वतंत्र तांगा करण्याचं दुसरंही एक लक्षांत ठेवण्यासारखं कारण होतं. असो. पुढें आठ दहा दिवस औषध घेऊन सुदैवाने मुलगा बरा झाला! न् तिच्या हाताला यश आले. गरीब लोकांना धर्मार्थ औषधपाणी देण्याच्या तिच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें हें औषधपाणी झाले, हें सांगायला नकोच. इथे हें एवढं लिहिण्याचे कारण म्हणून इतकेंच कीं, मोठ्यांची भीड, पैशाचा लोभ आणि पदराला खार, व तोही जाणून बुजून, (कारण आजपर्यंत असे अनेक प्रसंग केसुभटजींला आले) इतके थोर जिचं मन, तिला कृतज्ञतेनं म्हणा, भक्तीनें म्हणा, लोक जवळ जवळ इहलोकीची देवताच मानूं लागले तर त्यांत काय नवल? असो; विनतेनं अलिकडे आपकान् दोन्ही मुलांचा विमाही काढून ठेवला आहे. आणखी दोन वर्षांनीं बरोबर, तिचा वडील मुलगा मॅट्रिकला बसेल, आणि धाकटा यंदाच पांचवींत जाईल. जिनं केवळ स्वतःच्या हिमतीवर न् कामतविर हे दिवस पाहिले तिची केवढी शहामत म्हणायची! नाहीं नाहीं ते कष्ट केले, हाल आपेष्टा काढल्या, पण कुणा जवळ तिनें आपलं दैन्य म्हणून दाखवलें नाहीं; किंवा वायफळ कुणाकडे ती याचनाही करायला गेली नाहीं. अजूनही तिचें आपलं असंच आहे. तिचा तो स्वभावच.

कीं कामापुरता दुसऱ्यांशीं संबंध. बेपर्वाईमुळें तिचं असं वर्तन असतं असं नाहीं. आपल्याला भागवता येण्यासारखी जर कुणाची कांहीं गरज असली, मग ती औषधपाण्याची असो, पैशाची असो किंवा आणखी कशाची असो, कळल्यावर, वेळ असेल तशी, ती न बोलावतांही जाईल.

असो अशा अडचणी सगळ्यांवरच येतात पण. यांतून धैर्यानं न् नेटानं पार पडण्याचंच तर काम कठीण असतं. विनतेचंच उदाहरण पाहिलं तर हिच्यावर असा प्रसंग नसता आला तर, हिचे एवढे गुण उदयाला यायला अवकाश तरी मिळाला असता का? यावरून, अडचणी चांगल्या असं नाहीं माझं म्हणणं. त्या कुणावर—वैऱ्यावरही येऊं नयेत. पण दुर्दैवानें आल्याच तर त्यांचा उपयोग करून घेणं किंवा त्यांना बळी पडणं पुष्कळसं आपल्याच स्वाधीन असतं. अशा वेळीं मनुष्य जें फसतं तें त्याच्यांत करामत किंवा कर्तबगारी नसते म्हणून नव्हे, तर जनापवादाची फाजील भीति, खोटे दुराग्रह, वेडगळ समजूती, अस्थिर बुद्धि, मनाचा कोतेपणा, यापैकींच कांहीं ना कांहींला वश होऊन मनुष्य फसतं. शिक्षणाचा संस्कार नसल्यामुळें दूरदृष्टि येत नाहीं; आणि मग यांचा अमल अनावर होतो. खरं म्हटले तर, कामच पडल्यावर दुसऱ्यावर भार न टाकतां किंवा लोकांच्या उपहासाला पात्र न होतां स्वतःलान् आणखी दोन जीवांना पुरून उरतील इतके पैसे मिळवायला बायकांसाठीं सुद्धां कांहीं कमी गोष्टी नाहींत. बायकांचेंच म्हटले तरी, झगे, पोलकीं, मुलामुलींचे पोशाख, असे साध्या शिवण

कामाचेंच किती तरी प्रकार आहेत. याशिवाय, वेलबुटी, कलाबतू, वैद्यकी, डाक्टरी, शिक्षकी, नर्सिंग, मिडवाइफ्री, गायन, वादन, चित्रकला, निरनिराळ्या तऱ्हेचेन् निरानिराळ्या ऋतुमानाचे खाण्या पिण्याचे पदार्थ अशा अनेक गोष्टी सांगतां येतील. आणखी एकदां एकाद्या कामांत पडलं म्हणजे त्यांतल्या एक एक नवीन नवीन गोष्टी आपो-आप सुचूं लागतात. असो. विनतेनं आपल्या जन्माचं सार्थक करून घेतलं खरं.

## १४

काय करायच माई ? असं कांहीं ऐकलं म्हणजे जिवाला खेद मात्र होतो. आज एक तप, थोडं अधिकच व्हायला आलं, पण दिवसागणिक तिळ तिळ जास्तच आहे. पण आता पस्तावा करून काय उपयोग ! असेच आणखी निघतील तेवढे दिवस रेटले पाहिजेत. बढाईची गोष्ट नाहीं, पण मी तेंव्हांच म्हटलें होतं ' पहा बरं बगुताई, आज ही दोन दिवसांची हौस होईल; पण पुढें मात्र जन्मभर जड जाईल. पोरपणामुळें म्हणा कीं कशामुळें म्हणा, आज कांहीं बोलत नाहीं. पण हाच रघू, थोडा मोठा झाल्यावर तुमच्या नावानं उठतां बसतां खडे फोडील. असं मी म्हटलं न् दोन महिन्यांतच तें बगुताईना पटलं. असं व्हावं असं का कुणाला वाटतं ! पण असं न वाटलं म्हणून आपल्या करण्याचें फळ भोगायचें का आपल्याला चुकणार

आहे । अशा वेळीं, आपल्या मनासारखं न झालं म्हणजे कपाळाला हात लावून नशीबाला दोष द्यायचा, पूर्वजन्मींच्या पातकांची सबब दाखवायची, काळच फिरला म्हणून त्याच्यावर निमित्त टाकायचं, नाहीं-तर कलि मातला म्हणून त्याच्या नावान् बोटं मोडायची, अशा रीतीनें न कळत म्हणा, जाणून बुजून म्हणा, आपणच आपली फसवणुक करून घ्यायची, पहाव त्याला आपली सवयच जडलेली दिसते. पण आपणच आपल्या हातानी, आपल्या करण्यानीं—यशाय-यशाचं मूळ पेरतो, हें कांहीं कुणाच्या लक्षांत येत नाहीं; किंवा आलंही तरी फुकाच्या समाधानासाठीं तिकडे कुणी बघायचं नाहीं. मनुष्याचं मन कोतं असतं म्हणतात, तें हें असंच. म्हणून म्हणते कीं, असं करणं शहाणपणाचा डौल मारणाऱ्यांना तरी नाहीं शोभत.

रघू असच बोलतो, तसच बोलतो, तो अमकंच करतो, तमकंच करतो, असं नित्य बगुताई रघूचं पुराण ज्याच्या त्याच्या जवळ वाचीत. कांहींहि असो, त्यांत रघूचा तेवढा अपराध, आपला कांहीं नाहीं, असा त्यांचा सांगतांना सगळा कटाक्ष असे. हें बाई चमत्कारिक नाहीं का? टाळी वाजते ती दोन्हीं हातांनी वाजते. हें जसं ऐकणाराला कळतच नाहीं, असंच त्यांना वाटे. पहिल्या पहिल्यानं त्या रोज संध्याकाळीं माझ्याकडे येऊन दिवसभराचा पाढा वाचीत. जवळ जवळ महिना सवा महिना असं चाललं होतं. मधून मधून रघू भेटला म्हणजे सहजासहजी दिसेल अशा रितीनं मुद्दाम त्याला विचारून खरी खरी हकीकत सगळी मी काढून घेत असे. बगुताई माझ्याकडे येत हें त्यावेळीं

त्याला ठाऊक नव्हत. तेव्हां तोही आपला सरळपणानं जसं असेल तसं विचारल्यापुरतं सांगे. पण त्याच्या सांगण्यांत कुणाविषयीं कुरकुर किंवा त्रास म्हणून कधीं दिसला नाहीं. इतकीं वर्षं झालीं, पहातां पहातां. पण मला फिरून फिरून हेंच वाटतं कीं, रघूचा स्वभावच अगोदर शान्त न् विचारी. तशांत आपल्या घरची उणीपाणीं दुसऱ्याजवळ सांगण्याचा त्याला मनापासून तिटकारा. पण, असा एकादा प्रसंगच पडला तर काय करील बिचारा! जसं असेल तसं सांगेल. पण सांगतांना अशी कांहीं वृत्ति धारण करील कीं, त्या जणूं काय, अपाल्याला कांहींच महत्वाच्या वाटत नाहीं. कारण आपली केविलवाणी स्थितिही पण दुसऱ्याच्या लक्षांत येऊं नये असा त्याचा इकडे प्रयत्न असे. खरंच आहे. असं न केलं तर आपल्याच माणसांचा उणेपणा दिसतो. बरं त्यांचा उणेपणा झाकावा तर तो आपल्या माथीं बसतो. असा बिचाऱ्याला तोंड दाबून बुक्यांचा मार होई, म्हणून त्यानं हा आपला सरळ मार्ग काढला. पण हा विचार बगुताईंना कुठून यायला! इतकं झालं तरी मी बगुताईंना किंवा रघूला कांहींच बोलले नाहीं. माझ्या मनातून कांहीं कांहीं निमित्तानं त्यांच्याकडे जाऊन दहावीस गोष्टी स्वतः डोळ्यांनी पाहून आपली खात्री करून घ्यायची होती. म्हणून मी दोघांचं ऐकून मात्र घेई. पण त्याविषयीं बरा वाईट असा एक शब्दही उच्चारीत नसे. कांहीं दिवसांनीं ही संधि मला अनायासेच मिळाली. घरच्या मालकानं भाडं वाढविल्यामुळे रघू जागा पाहूं लागला तेव्हां मीच दादाला सांगून मागल्या ती

खोल्या न् दाखन त्याला रिकामं करून दिलं. दादानं घरांत येऊन राहायचं म्हटल्यामुळें रघू कानकोंडा झाला. त्याला नाहीं म्हणतां येईना. बरं, काय उत्तर द्यावं तेही सुचेना. तसं मी दादाकडे पाहिलं. त्याच्या तें पूर्वीच लक्षांत आलं होतं. त्याबरोबर त्यानं उत्तराची वाट न पहातां मनुष्याला हाक मारून रघूचं सामान आणायला सांगितलं. अर्थात् रघूला मुकाट्यानं त्याच्याबरोबर जावं लागलं. रघूच्या तोंडांतून एकही शब्द जरी निघाला नव्हता, तरी त्याच्या मनांतला गोंधळ त्याच्या चर्येवर स्पष्ट दिसत होता. त्याला हें वाटलं कीं, आपली कट-कट त्यांच्या घरीं कशाला? दूर आहे तेंच बरं आहे. दुसरं असं कीं, लोकांचे फुकट उपकार करून घेण्याची त्याला मनापासून चीड. परक्या ठिकाणीं उघडपणें भाड्याचं विचारतां आलं असतं न् तें देता आलं असतं. पण इथें दोन्हीं गोष्टींची चोरी. पुढें मी ओघाओघानं सवड साधून भाड्याबिड्याचं मनांत आणण्याचं कांहीं कारण नाहीं. शिवाय अडल्यावेळीं पैशारुपयांच्या बाबतींतही दादाला तसे स्पष्ट सांगत जा; उगाच संकोचण्याचं कांहीं कारण नाहीं, असा दादाचा निरोप, त्याला न् तसाच बगुताईला कळवला. पण गंमत ही कीं, त्याला तो रुचलेला दिसला नाहीं. असो; रघू घरांत येऊन राहिल्या पासून पहिले कांहीं दिवस बरे गेले. पण स्वाभावाला औषध का असतं कुठें मधें मधें अशा प्रसंगीं रघू कांहीं ना कांहीं निमित्तानं बाहेरच निघून जात असे. पण पैशाची गोष्ट आली कीं, तिथे काय कुणाची अक्कल चालणार? बरं, मिळकतीबाहेर खर्च केल्यानं आपल्याच मुलाला

त्रास होतो याचा बगुताईनां यत्किंचित सुद्धां विचार नाहीं. रघूनं पैसे न दिले तर त्या खुशाल उसनं पासनं करून कर्ज करून ठेवींत. आणि असं कांहीं झालं म्हणजे साहजिकच त्याचा अगदीं तिळपापड होई. बरं, त्याची बायको, आज चार लेकरांची आई; तिच्या अंगीं कांहीं शहाणपण, पोक्तपण, घरच्यादारचा विचार असावा, तर तिथे सगळ्याच गोष्टींचा आनंद ! कोवळ्या वयांत, पुढें स्वभाव कसा निघणार याचा कांहींच अजमास करतां येत नाहीं. आणि या स्वभावाच्या अनिश्चितपणांत शिक्षणाच्या अभावाची भर पडली म्हणजे तर विचारायलाच नको. अशा स्थितींत पत्रिकेच्या खुळावर भिस्त ठेवून केलेल्या लग्नानं दोघांच्याही संसाराचं कसं मातरं होतं, याचं हें ठळठळीत उदाहरण आहे. थोडक्यांत सांगायचं म्हणजे रघूचं म्हणणं मला मुळींच गैरवाजवी वाटत नाहीं. खरंच बाई, ज्याला काळाचा उमज नाहीं, तें काय तरी मनुष्य ! उमज नसला म्हणून त्याचे परीणाम का आपल्याला भोगायचे चुकतात ? आपल्या आवाक्याबाहेरच्या गोष्टींत वारा वाहील तशी पाठ देण्यांतच शहाणपण असतं. नाहीं तर ज्या गोष्टी आपण सुखासाठीं म्हणून करायला जातो, त्याच मग दुःख वाढून आणतात. संसाराला जर माया म्हणायची, आयुष्याला जर क्षणभंगुर लेखायचं, मग त्याच्याविषयीं एवढा आहोपा तरी माणसांनीं कां ठेवावा ? ज्या मानवकुडीची एवढी महती गायची आणि नश्वर म्हणून तिच्याविषयीं एवढी खंति करायची, ती एवढया कष्टानं, पुण्याईनं लाधली असतां धन्य मानणारांनीं मनानं नसलं तरी कृतीनं

आपसांतच दु:ख, द्वेष वाढवून आपणच तिच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न करायाचा, हा का धर्म झाला ? इथं कुणी कांहीं अमरपट्टा घेऊन आलेलं नाहीं. मग, आयुष्याचे चार दिवस कर्मधर्मानं लाभलेल्या माणसांत तरी, गुण्यागोविंदानं काढून, ज्याच्या त्याच्याकडून धन्य म्हणवून घेण्यांत भूषण आहे; कीं, काळाकडे पाठ फिरवून, केवळ हट्टानं जवळच्या माणसांना त्रासवून, त्यांची नवी उमेद खर्चा करून जगांत आपलं हंसं करून घेऊन दूषण जोडण्यांत सार्थक आहे ? शहाणपणाचा मक्ता, पुण्याईचा अंश, पूर्वीच्याच लोकांना होता न् आतांच्या लोकांना नाहीं, असं नाहीं. आचारानं, कृतीनं पाहिलं तर आजही तसेच लोक आहेत. पूर्वींच्यांना शहाणे, पुण्यवान, अवतारी असं जे म्हणत आले आहेत ते तरी त्यांच्या आचाराविचारावरूनच ना ? मोठे लोक, ईश्वराचे अवतार, सगळ्या काळीं न् सगळ्या मुलखीं झाले आहेत. म्हणून सगळ्यांची शिकवण सारखी थोडीच असते? आणि ती असेल तरी कशी ? ठळक उदाहरण घेऊन सांगायचं, तर, आपल्या इतिहासपुराणांतले रामराय घेतले, कृष्ण देव घेतले किंवा अगदीं अलिकडचे शिवराय घेतले न् पाहायला लागलं तर याच्यांत चांगल्या वाईटाची निवड करतां करतां मन अगदीं भांबावून जातं. बरं, त्यांचीं चरित्रं इतकीं निरानिराळीं असून सुद्धां तीं सगळ्यांना सारखींच पूज्य वाटतात. खरंच आहे; का नाहीं वाटणार ? कारण अवतारी असले तरी एकमेकापासून निरनिराळ्या मुलखांत अवतीर्ण झाल्यामुळें त्या काळच्या, त्या मुलखाच्या स्थितिप्रमाणेंच त्यांचे आचार न् त्यांचे

विचार असणार. त्यांच्यांत ईश्वराचा अंश म्हणून इतकाच कीं, जो ज्याकाळीं न् ज्या मुलखीं झाला, त्याकाळीं न् त्यामुलखीं त्याचीच शिकवण, त्याचीच वागणुक उत्तम म्हणून ठरलीं. आणि म्हणूनच त्यांची अवतारांत गणना झालीं. नाहींतर अवतारीपणाची खूण एरवीं पटावी तरी कशी ? मग आजच्याही अशा लोकांचं म्हणणं, केवळ तें पूर्वीच्या काळच्या लोकांशीं जुळत नाहीं, म्हणून, मानायचं नाहीं, यांत आपलचं नाहीं का अहित ? दररोज होणाऱ्या घडामोडी डोळ्यांनीं पाहून अमक्या अमक्या रीतीनं वागावं म्हणून सद्बुद्धीनं सांगणाऱ्या आजच्या लोकांचा उपदेश, पूर्वीच्या काळच्या गोष्टी डोळ्यांनीं पाहून त्याकाळींच उपयोगीं पडणारा बोध करणाऱ्या लोकांच्या उपदेशापेक्षां अधिक हितकर नाहीं का ? हें समजायला शाळेंत जायाला नको, परीक्षा द्यायला नको, किंवा कांहीं साक्षात्कार व्हायाला नको. पण बाई या आपल्या बायकांकडे पाहिलं म्हणजे मोठा चमत्कार वाटतो, न् निराशेनं मन उद्विग्न होतं. बगुताई म्हणजे या असल्यापैकींच एक. बिचाऱ्या रघूचा मात्र चहूकडून फजिता. इकडे राहयाला आल्यापासुन बगुताईंना मी कांहीं नाहीं तरी एक शेंभर तऱ्हांनीं सांगून पाहिलं. पण सारं पालथ्या घागरीवर पाणी. पुढच्या जन्माची जोड करून ठेवायची, तीं हा जन्म गोड करूनच ठेवली, तर पुण्याच फळ; पण हें त्यांना कांहीं केल्या पटेना. मी म्हणते रघूनं त्यांचं हें आजवर सहन केलं, हीच त्याचीं शहामत ! दुसरं कशाचं नाहीं, तर, निदान, ज्यांच्यावांचून संसारांतलीं सगळीं सुखं आपल्याला फिकी वाटतात, ज्यांच्या प्राप्तिसाठीं आपण

नाना तऱ्हेचे नवस करतो, प्राणांतिक वेदना सहन करूनही ज्यांना जन्म देतांना आपला आनंद त्रिभुवनांत मावेनासा होतो, लहानपणीं ज्यांचें आपण जीवापलीकडे जतन करतो, जीं आपल्या घराला नक्षत्रासारखीं चमकून शोभा आणतात, आणखी इकडून एके ठिकाणीं म्हटल्या-प्रमाणें " जीं आपल्या मनाच्या पटावर पुढच्या आयुष्यांतील निरनिराळे देखावे आशेच्या भपकेदार रंगांत कल्पनेच्या कुंचल्यांनीं काढून दाखवून आपल्या हृदयाला विसावा देतात, " त्याच्याविषयीं दुराग्रहाच्या, अज्ञानाच्या किंवा निष्ठुरभावाच्या उन्हानं आपल्या मानसस-रोवरांतील मायेचा, ममत्वाचा सागर सर्व आटून जाऊन आपण त्या सुखाला पूर्णपणें पारखं व्हावं, यापेक्षां दैवाचा दुष्टावा तो दुसरा कोणता असायचा?

खरंच सांगतें, माई, बगुताईनीं आपल्यापेक्षां गरीब अशा कुटुंबाकडे पाहिलं असतं, हो, त्यांच्या शेजारच्याच जोश्यांच्या घराकडे अमळ दृष्टि टाकली असती न त्यांच्या इथल्या आजीबाईचा कित्ता गिरवला असता, तर या थरावर कधींही गोष्ट आली नसती. त्यांचं तर अगदीं कडकडीत भिक्षुकांचं घराणं ना? आणि तसचं बारकाईनं पाहिलं तर, दामोदरपंतांनीं वडिलांच्या वेळच्या वळणांत काडी इतका तरी फरक केला आहे का? पण, म्हणून, काळाकडे लक्ष देऊन आपली घडी बदलून घ्यायला ते चुकले आहेत का? तसं म्हटलं तर, विद्येनं, विचाराआचारानं, ब्राह्मण, बाप से बेटा सवाई, असाच आहे. आपल्या या अशा वागणुकीनं दामोदरपंतांनीं नव्या लोकांना, त्यांच्या

सोईसोईनं घेऊन पुष्कळंच जुनं वळण लावलेलं आहे. लहान असो, मोठा असो, तिथिपर्वणीला ज्याला त्याला दामोदरपंतच हवे. अशी त्यांची सारखीं भरभराट होत आहे. आणि तूं पहाशील, वडिलांच्या वेळचं वभव लवकरच त्यांच्या वाट्याला येईल. पण तेंच, गदाधरभट जटापाठी, विश्वेश्वरभट सोमयागी, राघोभट दिक्षित यांचीं घराणीं पहा. केवळ जुन्यालाच चिकटून बसून पालटत्या काळाकडे दुर्लक्ष केल्यामुळें मागें पडून दिवसेंदिवस कशी खालावत चाललीं आहेत! कायग बाई पाहतां पाहतां दिवस गेले ते! तुला नाहीं आठवत, लहानपणीं आपण दिक्षितांच्या सोनशीं, जटापाठ्यांच्या गंगूशीं, विश्वेश्वरभटजींच्या चिनूशीं रामापुढल्या पटांगणांत न मारुतीमागल्या चौकांत कसेकसे खेळ खेळत होतो ते! पंधरा वर्षे झालीं या गोष्टीला, नाहीं? दिक्षितमामींना भास्करच्या पाठीवर काशी झाली न् भाऊरावांच्या रामूची मुंज झाली तेव्हांची ही गोष्ट. भास्कर सोनीच्या पाठचा. दिक्षितमामींचा बरोबर तीन वर्षांचा पाळणा असे. स्थळं पाहतां पाहतां काशी बारा वर्षांची झाली, तेव्हां राघूभटजी घाबरून इकडे आले. मग मोठ्या सायासानं एके ठिकाणीं जमवलं. तिगस्ताची ही गोष्ट. असो. लहानपणची आठवण झाली म्हणजे मला मेला सुमारच राहत नाहीं. अशी मी वाहवते. येऊन जाऊन सांगायचं म्हणून इतकंच, कीं, नेमानेम नसला, तर आपकंच आंतडं आपल्याला खातं. त्यालाही निमित्त लागतंच, नाहीं असं नाहीं. पण शहाणपणं असलं म्हणजे होतां होईल तोंवर मनुष्य आपल्याकडून निमित्त होऊं देत नाहीं. न्

एक तें नसलं म्हणजे मग त्या फजितीला पारावारच पुसूं नये. अशानं आपण नुकसान तर करून घेतोच. पण आणखी आपल्या मुलाबाळांची न् साऱ्या कुटुंबाचीहि नासाडी करतो. जेव्हां, कोणताच उपाय चालेना, तेव्हां मी म्हटलं बगुताईना निक्षून, कीं, तुम्हाला हो काय त्याची काळजी ? तो जाणे न् त्याचा संसार जाणे हरि हरि करीत काळ कंठायचे तुमचे हे दिवस, तुम्हाला काय करायचं घरांत लक्ष घालून ? तसं म्हटलं तर तुमच्या मानापानांत कशांत कांहीं कमी नाहीं. नवा काळ नवी प्रजा. पण हेकेखोर स्वभावापुढें कुणाचं काय चालणार ? असा प्रयत्न थकला म्हणजे नशीबाची आठवण होते. बिचाऱ्या रघूकडे पाहून मनाला वाईट वाटतं झालं. दुसरं काय ?

१५

स्त्रियांच्या पांढऱ्या कपाळाची कहाणी ! छे:बाई हे शब्दच आम्हा बायकांच्या तोंडून कधी निघायचे नाहींत. ही केवळ नवीन शक्कल दिसते. यांत काय हेतू आहे न कळे. तरी मागें दोन तीन वेळ या विषयीं स्पष्टच जवळ जवळ, काय तें लिहिलं होतं. पण तेवढ्यानं समाधान झालेलं दिसत नाहीं. म्हणून इतके दिवस मधें सोडून मी जशी विसरलेच असेन असं समजून वाटतं, पुन्हा ही गोष्ट काढली. या गोष्टीवर इतका भर देण्यांत काय लाभ कुणाला ठाऊक ?

पण मी म्हणते, तसंच कांहीं कारण असल्याखेरीज असा एकाद्यावर जुलूम करण्यांत काय अर्थ ? इतक्यावर स्वारीचा आग्रहच असला तर माझा अगदीं निरुपाय आहे. राग न मानायचा होईल, तर पुढील मजकुरापूर्वी मनांत जें कांहीं या वेळीं आलं आहे, तें सगळं सांगून टाकतें. आम्हां बायकांना या शब्दानंच केवळ मृत्युप्राय वेदना होतात. या नुसत्या विचारांतच काळजाचे तुकडे तुकडे पडू लागतात. हे इकडे ठाऊक नसेल असं नाहीं. आणि असं असून जेव्हां इतका आग्रह —याचाच तर मला चमत्कार वाटतो.

अमंळ चेहरा उतरलेला दिसला किंवा कुठे जरा करमेनासं झालं कीं, एरवीं जिवाची जी धांदल होते—अमुक होतं का, तमुक करायच का, असे शंभर प्रश्न न हजार उपाय, यांनीं पाठ पुरविली जाते. अशा वेळीं एकाद्यानं मुद्दाम नांवं ठेवावीं, म्हणजे काळजीवर जेव्हां उसन्या विनोदाची शाल टाकण्याचा जो निष्फळ प्रयत्न होतो, तेव्हांची तिरपिट तर पुसूंच नये. रमाताईच्या लग्नांत एकदां दिवस-भराच्या दगदगीनं शरीराचा एकेक भाग खिळाखिळा झाला म्हणून अंमळ बिछान्यावर अंग टाकलं मात्र, तों थोडा ताप कुणकुणायला लागला, तें इतकी खबरदारी घेतली होती तरी, कसं कोण जाणे कानावर गेलं; आणि गंपू निघाला होता तरी त्याचा विश्वास न वाटून कीं काय, त्याला परत लावून उगाच आपलं कांहीं तरी निमित्त करून स्वतः स्वारी डाक्टर भाऊजींकडे निघाली. या

असल्या स्वभावामुळें आनंदी वृत्तीच्या न् प्रफुल्लित चेहऱ्याच्या कवाइतींत एवढासा कुठे खळ पडला कीं, वरच्या सारखी शिक्षा ठेवलेलीच.

दुसऱ्याच्या जीवाकडे एरवीं इतकं बारीक लक्ष पुरवायचं असतांना या गोष्टींत हा एवढा आग्रह—याचंच तर आश्चर्य वाटतं आपल्याकडून कुणाला तिळमात्रही त्रास न होऊ देण्याविषयीं नेहमीं इतकी दक्षता बाळगली जात असतां कित्येक दिवसपर्यंत एकाद्याच्या मनाला अस्वस्थता, तळमळ यांनीं उगाच चटका देण्याला जीव तरी कसा वाहवला, याचा मला राहून राहून अचंबा वाटतो. याच वेळीं या प्रश्नावर इतका भर कां, म्हणून मनाचा गोंधळ होऊन कांहीं म्हणतां कांहीं सुचेनासं झालं आहे. एकदां या प्रश्नाचं उत्तर लिहिलं, म्हणजे तरी कळेल काय आहे न् काय नाहीं तें, म्हणून मन कसं घट्ट करून मी ही लिहायला बसले आहे. याविषयीं जें जें सुचेल तें तें मी माझ्याकडून अगदीं सविस्तर सांगून टाकते. म्हणजे यापुढें याची चर्चा किंवा कांहीं करण्याचा प्रसंग नको.

मला हेंही अजून उमजत नाही, कीं, इतकं जर मनांत होतं तर पत्रांतून कशाला हे ? जवळ असतांना नसतं का बोलतां आलं याविषयीं ? आतां कांहीं फार दिवसांची तर गोष्ट नव्हतीच. बरं, याच्यापूर्वी नाहीं काढलं याचं नांव ते ? इतकंच नाहीं, तर माझ्या पुरतं लक्षांत आहे, कीं, एकदां दोनदां एका जवळच्या स्नेह्यानीं आडून आडून या गोष्टींवर भाषणाचा ओघ वळवीत असतांना इकडून तें तिथल्या तिथें फिरवून लगेच आपली गंभीर वृत्ती धारण केली. त्या

वेळीं याविषयीं विचार झालेला नव्हतां किंवा मत ठरलेलं नव्हतं असं नाहीं. नाहीं तर, त्या पूर्वी, आठ कीं दहाच दिवस बाबासाहेबांच्या पत्राला जसा जबाब गेला तसा खचीत गेला नसतां. तें माझ्या चांगलं लक्षांत आहे. आणखी, तो जबाब तरी मोघम, विचारलंच म्हणून उत्तर दिलं पाहिजे, नाहीं तर त्यांचं मन मोडेल अशा रीतीनं दिला नव्हता. तर त्यांत त्यांची, त्यांच्या घरच्या मंडळींची स्थिति लक्षांत घेऊन त्यामुळें कुणावर काय परिणाम होईल, म्हणजे घरांत काकूंना, यमूला, यच्चयावत् सासुसासऱ्यांना काय वाटेल, याचा उलट सुलट विचार करून अशा वेळीं काय करायला हवं, याचा छडा लावला होता त्या पत्रांत. अटकळ नसतांना तसा अभिप्राय पडला म्हणून बाबासाहेबांना थोडा रागही आला. पण स्वारीनं आपलं मत माघारीं न घेतां क्षमा मागून त्याचेही निराकरण केलं. इकडे असं असतां त्याच सुमारास धारवाडकर गृहस्थ याचसंबंधी सल्ला विचारायला आले असतांना त्यांचा निक्षून निषेध केला, हेंही कांहीं मी विसरलें असं नाहीं. मग या परस्पर विसंगत अशा वर्तनाचं काय इंगित असेल देव जाणे.

पुन्हां, मी म्हणते, या गोष्टीला एवढा आडपडदा कशाला हवा होता? विचारायचंच होतं, तर सरळ सरळ विचारायला काय हरकत होती? कुणाच्या आवडीचा रागालोभाचा तर प्रश्नच नव्हता. मग असं करण्याच काय कारण? असो मेलं.

अगबाई, नुसती नजर टाकण्याचाच अवकाश होता. काय ग बाई धन्याचा धवा डोळ्यासमोर उभा राहिला. पाहूनच छाती अगदीं फाटून जाते. यांत म्हणजे कोणी नवीन आहे अस नाहीं. पण असं एकदम एकच चित्र पाहण्याचा प्रसंगच कधीं पडला नाहीं. सर्वांची आपली एकच एक कहाणी. अशा ठिकाणी निवडानिवड तरी कशी करायची. यावेळीं जीव कसा मुठीं धरून ठेवला आहे. याविषयीं फिरून कधीं चुकून सुद्धा नांव निवू नये,, म्हणूनच केवळ एवढं हें निमुटपणें सहन करून घ्यावं लागंत आहे. अशा या शिक्षेला पात्र होण्याला माझ्या-कडून अपराध तरी कोणता घडला होता, असा, फिरून तो घडूं नये अशासाठी खबरदारी घेतां यावी म्हणून, मी जर प्रश्न केला, तर राग तर नाहींना यायचा ? हो अगोदर विचारून घेतें. किंवा ही गोष्ट इथेच सोडलेली बरी. कांहीं असलें तरी स्वारीकडून उगीचच्या उगीच कांहींही व्हायचं नाहीं. वेळ आली म्हणजे काय तें कळेलच, अशी माझी पक्की खात्री आहे. पण आम्हीं बोलून चालून बायकाच. तशांत, कुणाचंही काय, काळीज चिरं करणारी ही गोष्ट; आणि ती अशी मुद्दाम काढण्यांत यावी, यामुळें साहजिकच मनाला हुरहुर लागते. आणि मग, मन चिंती तें वैरी न चिंता अशी स्थिति होते. या वेळीं मस्तकांत नाहीं नाहीं त्या विचारांनीं कसा काहूर करून सोडला आहे अगदीं. ध्यानीं, मनीं स्वप्नीं, तेंच ते विचार, त्याच त्या कल्पना; त्यांनीं मस्तक भ्रमूं लागले म्हणून अमळ लवंडले. जिवाला अमळ स्वस्थता वाटावी म्हणून स्वारीचं नवीन निघालेलं पुस्तक घेऊन पाहिलं, चारचौघींत

मन रमेल म्हणून बायकांना गाणीं म्हणायला बोलावलं. पण कशा कशान म्हणून जीव हलका पडेना व मनातले विचार जाईनात. झोपेनं बरीक अमळ मस्तक उतरलं; पण मनाला जरा विसावा असेल तर शपथ तशांत मघा मला इतकं भान राहिलं नाहीं. त्यामुळें हेम व वसु याही सहज आपल्या बोलावल्या गेल्या. यांनां म्हणजे पूर्वीं कधीं पाहिलं नव्हतं किंवा त्याच्याबद्दल जीव कधीं हळहळत नव्हता असं नाहीं. पण आतां त्या कांहीं निराळ्याच डोळ्याला दिसतात. आतां त्यांच्या चालण्यांत, बोलण्यांत, खाण्यांत, पिण्यांत, लेण्यांत, थोडक्यांत सांगायचं म्हणजे त्यांच्या प्रत्येक हालचालींत मला कांहीं निराळंच दिसतं. त्यांच्या लक्षांत आलं नसेल, पण, त्यांच्या अगदी बारीक सारीक गोष्टीकडेही माझं सारखं लक्ष आहे. त्यांना हें ठाऊक नसेल, पण, त्यांच्या चेहऱ्यावर कोरलेली त्यांच्या कर्माची कहाणी मी मघापासून एकसारखी वाचते आहे, तों तों माझी अशीच खात्री होत चालली आहे कीं, कुणाचेंही काय, परदुख शीतळच. बायकांनी या बाबतींत बोलायचं म्हणजे नाजूकचं; पण कसही असलं तरी स्वतः एक ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे " जिथे जीवाशीं जीव एक झाला, आत्म्याशीं आत्मा मिसळून गेला, सुखदु:खाच्या एकाचं साखळींनं जे जखडले गेले, आवडीनावडीच्या एकाच प्रवाहांत जे पोहूं लागले, थोडक्यांत म्हणायच म्हणजे एका जड शरीरावाचून " जिथें आम्हाला " भिन्न, स्वतंत्र अस्तित्वच नाहीं " तिथें असा आपलाच आपल्यावर जुलूम होऊं लागल्यावर कितीही टाळाटाळी केली, आढेवेढे घेतले तरी काय उपाय चालणार ?

तशांत अशा रीतीनं—निक्षूनच नाहीं तर काय सांगितल्यावर निमूटपणें नमल्याखेरीज निभावच नाहीं, असं उघड दिसत असतांना फुकट उडवाउडवी करण्यांत काय अर्थ ?

बरं, एकाद्या गोष्टींत आपल्याला समजत नसलं, तर, दुसऱ्यावर हवाला देण्याला तरी इकडनं सवड ठेवली आहे का ? एरवीं इकडून एकदां एक न् एकदां एक असं कसं झालं असतं ? इथेही वरचाच न्याय लागू पडतो म्हणून म्हटलं तर मी अपराधी तर नाहीं ना ठरणार ? असो, अण्णासाहेब वृद्ध, पोक्त, दूरदर्शी, सर्व खरं, पण हेमच्या बाबतींत त्यांच्याकडून झाला तो विचार का....? दहा वर्षांची पोर त्यांना जड का झाली होती पोसा-यला ? होणार तें टळत नाहीं हें कितीही जरी खरं असलं तरी कुणी आपण होऊन आगींत उडी घेऊन परीक्षा पाहणार नाहीं. दिवस असे कीं घटकेचा भरंवसा नाहीं. पोरीन पहिलीच मंगळागौर पुजलीन् पोरीच्या सौभाग्याची ज्योतच विझली. लहान आहे तोंवर ठीक आहे; पण आतां दोन दिवसांनीं ती मोठी झाली न् तिला सगळं समजूं उमजूं लागलं, म्हणजे आपल्या बरोबरीच्या न्हात्याधुत्या मुलींना उजळ माथ्यांन मिरवताना पाहून तिच्या काळजाला कशीं घरं पडतील, याची नुसती कल्पना मनांत आली कीं, अंगाला शहारे येतात. परवा वैशाखांत पारख्यांच्या घरीं चितूचं लग्न झालं. त्यांत सगळ्याजणींबरोबर जेव्हां भिकू, मथू, अक्षतीला निघाल्या, तेव्हां, त्यांना पाहून "मीही जाते आई या भिकीमथी बरोबर, मला लावून दे ना कुंकू" असं

हेमनं म्हटलं. त्याबरोबर तिच्या आईच्या हृदयाचं पाणीपाणीच झालं. यांत कांहीं इतकं नवल नाहीं. पण त्याचवेळा व्याह्याकडल्या कुणी बाईतिथं कांहीं कामाकरितां आल्या होत्या, त्यांच्यासुध्दां तोंडातून हेमचे ते शब्द ऐकून '' ऐ, ऐ, हिच्या कपाळीं का कुंकू नाहीं ! काय ग बाई देवाच्या घरचा न्याय तरा ! असे कळकळून उग्दार निघाले. आणि मग, तिची आई नाहीं नाहीं म्हणत होती तरी, त्या तिला आपल्याबरोबर घेऊन गेल्या. मी तरी त्यावेळीं घाईतच होते. पण मोठ्या बाईनीं नथ बदलण्यासाठीं हाक मारली म्हणून मी थोडी थांबले. तेव्हां ती घालतां घालतां सहज आपकं ऐकायला सापडलं. आम्ही निघून गेल्यावर तिथं मोठ्या बाई न् सरुताई एकटयाच होत्या. बाईनी त्यांची पुष्कळ समजूत घातली; तरीं त्यांचा हुंदका आवरेना. शेवटीं त्या म्हणाल्या,'' काय सांगूं चिगूताई, आतां असा जीव जळतो, पण उपयोग काय! याला कारण माझी मीच आहे. मागें लागून लागून पोरीचं लग्न करवलं. आतां असं वाटतं, कीं जरा उशीरा पोरीचं लग्न केलं असतं, तर, दोन दिवस तरी तिला नवऱ्याचं सुख मिळालं असतं मग पुढें जें काय झालं असतं तें होतं पण त्यानं मनाचं समाधान तर झालं असतं. चांगलं होण्यासाठीं होईल तेवढीं आपल्याकडून खबरदारी घ्यावयाची. या खेरीज आपल्या हातीं दुसरे काय आहे ! याउपर ज्याचं त्याचं नशीब ! पण या लोकापवादाला किती भ्याव लागतं. तुम्हींच सांगा, चिगुताई, आमच्या समजूतीसाठीं, लोकांनीं नांव ठेवूं नये म्हणून आम्ही या पोरीचं लग्न केलं. पण तिला त्याचं आहे का कांहीं ? माझ्या चुकीसाठी आतां हिला जन्मभर मुर्दंड भरावा लागला ना ! हा न्याय झाला

का हो ! आईबापानीं आपल्या हातांनीं आपल्याच पोरीच्या मानेवर सुरी ठेवण्यासारखं नाहीं का झालं हें ! लोकाला काय लागतं बोलायला न् नांवं ठेवायला अमळ मोठी झाल्यावर, जाणतेपणी, पोरीला उजवली असती, तर एक आम्हाला झाला असता दोन दीवस लोकांचा सासुरवास, पण तिला तर नीट नवऱ्याचं सुख मिळालं असतं. खरं म्हटलं तर तिचं लग्न झालं न न् झालं सारखचं नाहीं का ? पण, दैव उलटलं म्हणजे देव सुद्धा उलटतो बाई. आतां मला पुष्कळ सांगतात; इतिहासांतली, पुराणांतली, शास्त्रांतलीं, पुष्कळ उदाहरणं देतात; पण मेलं मनाचं राहिलं जनांत तोंड काढायला जागा तरी राहील का ! पण पुन्ह मनांत येतं, आपल्याला खावोत, गिळोत, काय वाटेल ते करोत. आतां काय व्हायचं राहिलय् आपलं ! पण पोर तर सुखांत पडेल. मग ती नी तिचं प्राक्तन आमच्यामुळें तिच्या जिवाला होणारे क्लेश आमच्या जिवाला विंचवाच्या नांगीप्रमाणें झोंबतात. आणखी दुसरं असही एक मनांत येतं वहीं, मन मोठं चंचल आहे, त्याला आवरण साधुसंतांनाही जड जातं. मग आपली काय कथा ! पोर आज अमळ लहान आहे, म्हणून सांगित, लेलं ऐकते, दाबली म्हणजे दबते, पण पुढें ती एकदा आपली आपण शहाणी झाली आणि चुकूनच कां होईना, तिच्याकडून होऊं नये तें झालं तर तो केवढा दुर्लौकिक ! मग तिचा आमचा जो काय भंडवडा व्हायचा-तो तर होईलच, पण आमच्याबरोबर आणखी, इकडच्या तिकडच्या बेचा-ळीस पिढ्यांचा उद्धार होईल, त्याचं पाप कुठें वहायचं त्या जन्मी काय झालं न् काय नाहीं, त्यामुळें आतांच्या जन्मीं हें भोगतां भोगतां जीव

अगदीं रडकुंडीस आला आहे. तशांत आणखी, आपल्याच हातांनी कशाला भर हवी ही ! सुखं करतां कुखं होतं. मग मुळातंच जें कुखं त्यानं काय काय बाई अनर्थ ओढवतील ते कुणीं सांगावे ? मला एक पुष्कळ भरंवसा असला, तरी, वेळेचा का कुणाला नेम सांगता येतो ! पण हा मेला जनापवाद डोळ्यापुढें उभा राहिला म्हणजे कपाळाला हात लावून तळमळत स्वस्थ बसावं लागतं. " लग्नवरून मोकळ्या झाल्यावर आम्ही जेव्हा घरीं आलों तेव्हां बाईनी मला ही सारी हकीगत सांगितली. आणि खरंच आहे, एरवीं आपल्या सोन्यासारख्या लेकरांना टाकून आईबापांना साधाही घास घशाखाली उतरत नाहीं. मग बायकांच्या जन्माचं सार जो संसार त्याच्या मूळालाच अंचवल्यावर, त्यांच्या अंतःकरणाचे किती तिळतिळ तुकडे पडत असतील याची कल्पना आकृतीनं सौम्य पण कृतीनं काळाहूनही कठोर अशा मानव देहधारी × × ना कशी होणार !

ही नुसती आईबापांची म्हणजे अत्यंत जिव्हाळ्याचे असले तरी अखेरीस आप्तांचींच स्थिति. मग प्रत्यक्ष जिच्यावर अभाळ कोसळलं, तिच्या जिवाची; तिच्या अंत:करणाची स्थिति कुणाला वर्णन करतां येईल ? रानटी लोक फार क्रूर असतात. म्हणतात ! दुसऱ्याचा जीव घ्यायला त्यांना काडीचंही निमित्त पुरे होतं. कुणी कांही म्हणो मला तर ते दयाशीलच वाटतात. त्यांना काडीचं--पण निमित्त तरी लागतं आणि एकदां प्राण घेतला कीं, त्याचं सगळं समाधान होतं. पण

दुसऱ्यांचा, अनाथांचा, अबलांचा जीव जीवंतपणी जाळायला त्यांना मुळीं निमित्तच लागत नाहीं, आणि प्राण जातेवेळच्या घटका अर्धी घटकाच्या यातनांनी, हाल अपेष्टांनीं ज्यांचं समाधान होत नाहीं, त्यांची रानटी लोकावर कडीच नाहीं का होत !

पण बाई हें काय मी असें म्हणतें ! सुधारणा म्हणजे जर पुढें पाऊल, तर यांत काय वावगं आहे ! थोड्या दिवसापुर्वी दादानं रशियासंबंधीं एक पुस्तक आणलं होतं ! त्यांत तिथल्या लोकांवर होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या जुलमाचं सविस्तर वर्णन केलेलं होतं. त्यांतला सगळ्यात भयंकर प्रकार म्हणजे आईबापांच्यां शरीराचे सर्व तऱ्हेचे हालहाल करूनही जुलमी लोकांचे समाधान होत नसे; म्हणून त्यांत भर घालण्यासाठीं त्यांच्या अर्भकांचे मुद्दाम त्यांच्या डोळ्यासमोर नाहीं नाहीं ते हाल करीत. हेतू हा कीं मुलांचे ते हाल पाहून त्यांच्या जीवाला आणखी चटके बसावेत. मुलांचे हाल होत. हें खरं पण त्यापासून त्यांना कांहीं आनंद वा दुःख कांहींच होत नसे. वास्तविक, मुलांचे हाल व्हावेत अशी त्यांना इच्छाही नसे. तर त्यांचे ते हाल पाहून त्यांच्या आईबापांना जें दुःख होई, त्यामुळें त्या जुलमी लोकांचं मन तृप्त होई. म्हणजे मुलांचा छळ करावा असा त्यांचा उद्देश नसे. तर, आईबापांच्या छळांत मात्र अधिक भर पडावी, असा त्यांचा उद्देश असे. हा उद्देश, मुलांचा छळ न करिता दुसऱ्या रीतीनं साधण्यासारखा असता, तर ते मुलांच्या वाटेसही गेले नसते. थोडक्यांत

सांगायचं म्हणजे त्यांचा सगळा कटाक्ष आईबापावर असे. या सगळ्या गोष्टींचं वर्णन झाल्यावर पुढें असं लिहिलं आहे कीं, याहून जुलुमांचे नवीन प्रकार शोधून काढणं मानवजातीला केवळ अशक्य आहे. खरंच सांगतें, मला तर त्या वेळी त्या ग्रंथकाराची कींवच करावीशी वाटली. आपण वर्णन केलेल्या प्रकारापेक्षांही क्रूर प्रकार जगांत राजरोस वावरत आहेत, हें त्या बिचाऱ्याला काय ठाऊक ?

हो,परवा काय झालें कीं, दादाचा न निळूचा कसल्याशा कवितेवरून वाद चालला होता. दादा निळूला परोपरीनं विभावना अलंकाराचं लक्षण समजावून सांगत होता. पण निळूच्या कांहीं केल्या तें लक्षांत भरेना शेवटीं दादा त्रासून म्हणाला "अरे, हा केवळ अर्थचमत्कार आहे; कविकल्पनेचा हा एक आपला खेळ आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत थोडीचं असं असतं?" तेव्हां निळू काय म्हणतो, "मला अमळ एक शंका आहे. यावर कृष्णंभटजीला म्हणतात दुनियेंत शत्रु मिळायचा नाहीं. इतके ते सरळ, सालस व गोड स्वभावाचे आहेत. नवा, जुना, कर्मठ, कुत्सित, हेकेखोर शंकेखोर कुणीही त्यांच्याकडे येतो. त्यांची ती भव्य आणि गंभीर मुद्रा पाहिली, आणि त्यांची ती रसाळ वाणी ऐकली कीं, त्याच्या मनांतल्या पूर्वीच्या सर्व वृत्ति मावळून त्यांच्याविषयीं तत्काळ प्रेम आणि आदर वाटूं लागतो. लहान असो, मोठा असो, एकदां परिचय झाला कीं, ज्याला त्याला ते घरच्यासारखे वाटू लागतात. म्हाताऱ्याचं आचरणचं तसं आहे, तेव्हां यांत काय नवल ? आहे तें योग्यच आहे. पण डोळ्यापुढें देवकीची

मुली उभी राहिली म्हणजे त्यांच्या आतड्याला जो इतका पीळ पडतो, तिला पाहिली कीं, त्यांचा जो इतका जीव जळतो, त्याचं हो काय कारण ? तें तुम्ही कां मी, का सरुताई, का निरुताई का आणखी कुणी, त्यांच्या ओळखींचं; असं आहे तरी कोण ? आणि कुणीच जर नसेल, तर मग हा इथें कोणता अलंकार ? आणि ही गोष्ट प्रत्यक्ष व्यवहारांतली कीं, कल्पनेंतली ? " त्याबरोबर दादा अगदी निरुत्तर झाला. आणि त्याच्या चटकन् निळूचा रोख लक्षांत आला. निळूनं तरी हें मुद्दामच वेड पाधरलं होतं. आणि सोंगाची बतावणी ही पण अशी केली होती कीं, इतकं होईपर्यंत दादाच्याही तें लक्षांत आलं नाहीं. त्या दिवशीं सकाळीं दादानं या विषयावरलं निळूचं मत खोडून काढलं, काय लहर लागली कोण जाणे, पण त्यानं ती आपली एक गंमत केली. निळूचं बोलणं अगदीं गंभीरपणानं चाललं होतं, तेव्हां हें त्याला कसं खपावं ? म्हणून निळूनं त्याचा हा, संधि साधून असा वचपा काढला, असो.

ही एक गोष्ट झाली. असा विचार करायला बसलं म्हणजे किती किती गोष्टी डोळ्यासमोर उभ्या राहतात. न्हात्याधुत्या पोरींवर कोसळलेले प्रसंग कमी का चटके देणारे असतात ? नेणत्या मुलींच्या बाबतींत वडाचं तेल वांग्यावर न पडण्याविषयीं अशा रीतीनं कितीही खबरदारी घेतली तरी, पुरा न्याय झाला, किंवा अरिष्ट टळलं असं मुळींच होत नाहीं. साधारणपणें पाहिलं तर आपल्याकडे पंधरा सोळा वर्षांच्या मुलींना चांगलं समजूं उमजूं लागतं. आणि लग्न

झालेलं असलं, तर, त्या या वर्षांत संसारलाच लागतात. एरवीं एवढया वर्षांत लग्न होऊन नवऱ्याच्या स्वभावाची ओळख होते न होते तोंच, किंवा मनाशीं मन मिळून संसाराला ऐन रंग येणार तोंच एकाएकी उघडं पडण्याचा ज्यांच्यावर प्रसंग येतो अशांची काय वाट ? बायकाचं मन आधींच कोमळ तसं म्हटलं तर नुकत्याच उमललेल्या कळीला एवढासा धक्का लागलेला आपल्याला खपत नाहीं. मग फुलापेक्षांही कोमळ, प्रेमळ अशा मनाची कुचंबणूक करण्याला हात तरी कसा वाहतो ? बरं; ही भूतदयेची बाजू जरी एकीकडे ठेवली, आणि व्यवहाराच्या दृष्टींनं पाहिलं तरी, स्वतःच्या इच्छेविरुद्ध नसत्या मोठेपणाच्या किंवा फुकट डौलाच्या गोष्टी एकादीवर लादण्यांत काय तात्पर्य ?

सवय तरी एक रोगच आहे. हिच्यामुळें कधीं कधीं चांगलं तें वाईट न् वाईट तें चांगलं दिसूं लागतं. खरं म्हटलं तर, चांगलं किंवा वाईट हें ठरविण्याला सर्वकाळीं सर्वस्थळीं सारखंच लागू पडणारं, असं, काय साधन आहे ? मनाच्या भावनांचेच नाहींत का हे सारे खेळ ? परीणामावरून पाहिलं तर, ज्यांचे परीणाम वाईट, त्या गोष्टींना आपण अगदीं उराशीं बाळगून ठेवलं आहे; आणि ज्यांचे चांगले, त्यांची किळस करण्याची आपल्याला चटक लागली आहे. माझ्या लिहिण्यानं स्वारीला काय वाटेलन् ना काय हीं, अशी भीति वाटते.

सारांश काय कीं, सर्वांना सर्व गोष्टींत सवड असावी. सवडीचा उपयोग करायचा न करायचा हें ज्याचं त्यानं आपआपल्या परीनं ठरवावं. पण असले हे जुलुमाचे रामराम आतां नाहींत कामाचे.

१६

शेवट गोड तें सर्वच गोड. आतां मात्र हेमच्या जन्माचं सार्थक झालं खरं. त्यावेळीं ज्याच्या त्याच्या तोंडीं हेंच कीं पोरीनं नवे चार करून आईबापांच्या तोंडाला काळोखी फासली; घराण्याचा लौकिक घालवला. जो तो म्हणे, 'किती पण मानभावी पोर ही! दिसण्यांत वरीं साळसूद! आणि गुण पाहिले तर असे! अशा एक ना दोन किती गोष्टी सांगणार? पण त्याच्याऐवजी आज 'पोर की नाहीं, भारी सुशील. एवढी शिकलेली, इतकीं बक्षिसं मिळविलेली, पण कांहीं ताठा, तोरा, याचं अगदीं नाव नाहीं. व कधीं म्हणून आईबापांच्या आज्ञेबाहेर गेली नाहीं. असं जिकडे तिकडे झालय्. बारीक पहाणाराला याचं एवढं नवल वाटणार नाहीं, हें खरं. पण ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. समजूं लागल्यापासून या एका प्रसंगावाचून अंतुकाकांचा, जन्हुताईचा किंवा घरांतल्या आत्याबाई वगैरे इतर वडील मंडळींचा आजच्या दिवसापर्यंत तिनं एक शब्दही मोडला नाहीं. घरची स्थिती मध्यम, थोडी कमीच अशी होती. तरी शेवटपर्यंत इतर

मुलींप्रमाणें आपल्याला अमुक एक नाहीं म्हणून ती कधीं हट्ट धरून बसली नाहीं. तिनं त्या त्या वस्तु मागितल्या असत्या तर त्या तिला शोभल्या नसत्या असं नाहीं. शिकूं लागल्यापासून शाळा सोडीपर्यंत पहिला नाहीं. तर दुसरा, असाच तिचा नंबर राहावा. अशा रितीनं अभ्यास सांभाळून घरांतलं पडेल तें कामकाज करायला तिची कधीं कुरकुर नसायची. आईच्या आजारामुळें स्वयंपाक, धुणंपाणी, मुलांचं वगैरे सगळं तिच्या एकटीवरच पडे. आत्याबाई म्हाताऱ्या; तशांत त्यांना दिसत नाहीं; तेव्हां त्यांचा कांहीच उपयोग होत नसे पण हिनं न कंटाळतां सर्व आपलं करावं. एकदा नारूकाका काशियात्रेहून परत आले आणि मुंलाबाळांसाठीं चार घटका थांबून पुढल्या गाडीनं परत गेले. बरोबर चांगली बारापंधरा मंडळी असतील घरांत जन्हुताई अशाच बिछान्यावर पडलेल्या. अंतुकाकाही कांहीं कामासाठीं म्हणून बाहेर गेलेले. पण इकडे मंडळींची स्नानं होतात न होतात तोंच तिनं सगळ्यांना जेवायला बसवून एकटीनं वाढलं. आणि स्वस्थतनं त्यांना त्या गाडीनं रवाना केलं. लग्नाच्या अगोदरची वरिसदीडवर्षापूर्वीची ही गोष्ट. त्यावेळीं तिचं म्हणण्यासारखं असं काय वय होतं ? अशा पोरीसाठीं कुणाचा जीव नाहीं तुटणार ? मग आईबापांची गोष्ट कशाला हवी ? अंतुकाकांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें अडचण सोसूनही तिची थोडीफार हौस पुरवावी, नाहीं असं नाहीं. पण तेवढ्यांत सुद्धां " कशाला ग हवं आई हें मला नवं पोलकं ? कांहीं

नको; माझी चोळी अजून कशी नवीनकोर आहे. '' असं आपलं जें जें करावं, त्याबद्दल तिनं दाराआडून, भिंतीआडून केसुकाकांना ऐकू जाईल, अशा रितीनं, आईजवळ म्हणावं. कारण अलिकडे अलिकडे तसंच कांहीं विशेष काम असल्यावाचून अंतुकाकांच्या ती समोर जात नसे. एवढी मर्यादशील असूनही तिनं निळूच्या बाबतींत इतका हट्ट धरून बसावं, या गोष्टीच साहाजिकच साऱ्यांना मोठं आश्चर्य वाटलंन् गूढही पडलं: आणि पहिल्यानं तिच्यावर चहुकडून एकदम गहजबच उडाला. पण शिक्षणाचे चांगले संस्कार झालेले असले म्हणजे मनुष्य कोणत्याही स्थितींत डगमगत नाहीं. उलट, अडचणींच्या प्रसंगीं त्याच्या धैर्याला दुप्पट जोर येतो. त्याप्रमाणें कुणाच्या रागावण्याला निंदेला, भिडेला, किंवा कुचक्या बोलण्याला मनावर न घेतां हेमनं आपलं म्हणणं, शेजारच्या साळुब्यांच्या कृष्णाताई-मार्फत आईबापांच्या कानावर घातलं कारण, तीच तेवढी तिची बरोबरीची मैत्रीण होती मग जन्हुताई जेव्हा एकदां पोटाला लावून घेऊन तिला विचारू लागल्या, तेव्हां तिनं नीट काकुळतींनं पण निश्चयाच्या धीटाईनं त्यांनाही तेंच सांगितलं जन्हुताईंना तें ऐकून धक्काच बसल्यासारखं झालं. आणि अंतुकाकानाहीं मुलीला शिकविल्याबद्दल आतां पश्चात्ताप वाटूं लागला. पण एवढं बरीक त्यांना कळून आलं कीं कांहीं विशेष काळजी करण्यासारखं नाहीं. पण हेमविषयींचा आपला जो अजमास होता तो मात्र चुकला. दिवसेंदिवस हे असं व्हायचंच. असं मनांत आणून युक्तीनं या गोष्टीची विल्हेवाट लावण्याचं त्यांनीं ठरवलं. हेम आतां

बरीच मोठी झाली होती; आणि त्या मानानं तिचं शिक्षणही बरंच झालेलं होतं. तशांत तिचा स्वभावही अत्यन्त साफ्स. आतापर्यंत तिच्याकडून आयोग्य अशी गोष्ट कधींच झालेली नव्हती. अंतुकाकानां हेमची ही गोष्ट जरी रुचली नाहीं किंबहुना, ती त्याना वाईटच लागली, तरी हेमच्या अंगच्या निश्चयाचा धीटपणा पाहून व तिच्या इतर सर्व गुणांकडे लक्ष देऊन त्यांनीं धिमेपणानं न् शान्तचित्तानं या बाबतींत वागण्याचं ठरवलं. त्यांच्या कलाविरुद्ध जरी साऱ्या गोष्टी घडत होत्या तरी त्यांना असं मात्र वाटे कीं, हेमला आपलं बरवाईट, हिताहित चांगलंच कळतं; नाहीं असं नाहीं. पुन्हा ती अशी चवचाल नाहीं कीं, अविचारीपणानं किंवा हुरळेपणानं एकादी गोष्ट करील. म्हणून तिनं जें कांहीं ठरवलं असेल तें कांहीं ना कांहीं विचार करूनच ठरवलं असेल. व तसं त्यांनीं जन्हुताईजवळ स्पष्टपणे बोलूनही दाखवलं. हेमला अर्थात् अंतुकाकांचा हा विचार कळल्यावाचून राहिला नाहीं. यावेळीं तिला भाऊची फार फार आवठण येऊं लागली. तिनं त्याला दोन पत्रंही लिहिलीं. पण, एक तर या गोष्टी एकामागून एक इतक्या अचानकपणें घडल्या कीं, त्या लिहिण्याला सवडच नव्हती. व दुसरं असं कीं पत्रोपत्रीं असल्या गोष्टींची वाच्यता करणं तिच्या मनाला कसंसंच वाटलं. असा निरुपायच झाल्यामुळें या सगळ्या गोष्टींना आतां आपल्याला एकट्यानंच तोंड दिलं पाहिजे, हे तिच्या लक्षांत आलं. म्हणून तिनं आपल्या मनाचा धडा करून त्याच दिवशीं रात्रीं आईजवळ तिनं आपलं मन

पूर्णपणें मोकळं केलं, आणि तिची विनवाणी करून न् काकुळतीनं समजूत घालून आपल्या विचाराला आईची संमति मिळवली. अशी एकदां जन्हुनाईची संमति मिळाल्यावर अंतुकाकांचीही संमति तावड-तोब मिळाली. त्यांना वाईट एवढच वाटलं कीं अप्पासाहबांना दिलेलं वचन मोडलं. पण त्यांनीं आप्पासाहेबाना सर्व हकीकत कळवून त्यांची माफी मागितली. व आप्पासाहेबानीही मोठ्या शहाणपणानं त्यांना आपल्या वचनांतून सोजन्यानं व समाधानानं मोकळ केलं. हेमसारखी सुशील, सुन्दर व शिकलेली सून आपल्याला अंतरल्याबद्दल त्यांचा मोठाच हिरमोड झाला होता. पण त्यांनीं तो तिळभरसुद्धा कुठे दिसूं दिला नाहीं. त्यातल्या त्यांत एवढं बरीक चांगलं होतं कीं आप्पासाहेबांच्या मुलाला म्हणजे यशवंताला, तो दूर असल्यामुळें, ह्या साऱ्या भानगडींची कांहींच वार्ता नव्हती. कारण आज तो चार वर्षा-पासून बाहेरच आहे. मध्यें एकदांच काय तो आठ चार दिवसाठीं आला होता. पण तेव्हा हेमची गोष्टच निघाली नव्हती. निळू मात्र भाग्यवान खरा. हुशार असला तरी गरिबीच्या स्थितिमुळें त्याच्या किंवा इतरांच्या मनांत या विषयींचा विचारच कधीं आला नाहीं. तेव्हां त्याला हा अकल्पित लाभच वाटला. अशी थोडे दिवस अमळ आंतल्या आत खळबळ उत्पन्न झाली. तरी तिचा शेवट मात्र एकंदरींनं गोड असाच झाला. हेमची इच्छा पूर्ण झाली; निळूचे भाग्य उदयाला आलं; जन्हुताई व अंतुकाका यांच्या शिरावरचा भार हलका झाला व ते निश्चिंत झाले; व शेजाऱ्या पाजाऱ्यांनाहीं समाधान वाटलं.

१७

असें कां म्हणतेस, कमाताई ? गरीब काय नी श्रीमंत काय, मुलगी म्हटली कीं आईबापांच्या गळ्याला फासलेली सुरीच म्हणायची लग्न कसं होईल, नवरा कसा मिळेल, सासुसासरे कसं वागवतील, जावानणंदाशीं कसं पटेल, अशा एक ना दोन, हजार वाटांनीं हीं मुलींची सुरी आईबापांच्या अंतःकरणाला सारखी बोचत असेत. एकदां न्हातीधुती होऊन लेकुरवाळी झाली, म्हणजे त्याचा अर्धा जीव खाली पडतो. नुसता गाडाभर हुंडा दिला, किंवा लग्नाला पाण्यासारखा पैसा लावला म्हणजे मुलीविषयीं निश्चिंत जीव झाला असं होत नाहीं. अशीं किती तरी उदाहरणं दाखवितां येतील कीं जिथं ऐश्वर्य आहे, पैसा आहे, वाटेल ती अनुकूलता आहे. पण म्हणून त्यांना संसाराचं सुख आहे, असं मुळींच म्हणतां येत नाहीं. त्याला प्राक्तनंच पाहिजे. म्हणून म्हणते कीं मैनाताईचं भाग्यच थोर. एरवीं असा संसार कुणाच्या नशीबीं असतो ? घरच्या माणसांची, आपली दिखील दृष्ट लागायची. संसाराचं मूळ म्हणजे नवरा. तोच पहाना; कसा तरणा, देखणा, शहाणा; आणखी श्रीमंत न् हौशी. आणिक काय पाहिजे ? आतां अमळ सांवळा आहे हें खरं. पण, म्हणून काय झालं ! किती तरी माणसं गोरींगोमटीं असतात. म्हणून का त्यांना रूपवान म्हणतां येतं ? द्वारकाताईची मुलगी आहे ना तुला ठाऊक ? तिचा रंग नाहीं का कसा तकतकीत सोन्यासारखा

आहे तो ! पण तिला कांहीं कोणी रूपाची म्हणून म्हणत नाहींत. पाठमोरी पाहिली तर किती तरी सुरेख दिसते !! तुला हे ठाऊक नसेल म्हणून मी सांगते. एकदां काय झालं; तिचं तेव्हां लग्न झालं नव्हतं. पण याला दाखीव, त्याला दाखीव, असं चाललं होतं. त्यांत सारंगे म्हणून नुकतेच बॅरिस्टर होऊन आलेले एक गृहस्थ होते. तिला पाहण्यासाठीं त्यांनाही एक दिवस घरीं आणावं असं ठरलं. बापाजवळ मुबलक पैसा, आईचा होशी स्वभाव, आणि शेवटचं कार्य. मग कमी काय पडायचं. हुंडा म्हणून दहा हजार रुपये देण्याबद्दल तिचे वडील आपल्या आपणच म्हणत. तेव्हां लागले तर आणखी पांच हजार त्यांनी सहज दिले असते. झालं; दिवस ठरला, वेळ ठरली, आणि निवडक लोकांना चहाचीं आमंत्रणंही पण गेलीं. पण कर्म असं कीं, द्वारकाताईंच्या घराशेजारींच सारंग्यांचे एक स्नेही राहात होते. त्यांचं नांव दिवाकर. त्यांच्याकडे ते त्याच दिवशीं कांहीं कामानिमित्त म्हणून असे सकाळच्या साडेनवाच्या सुमारास गेले होते. दिवस उकाड्याचे असल्यामुळें त्यांच्या बंगल्यासमोरच्या गच्चीवरच मंडळी बसली होती. त्यांच्या गच्चीवरून द्वारकाताईंच्या अंगणांतल्या सगळ्या गोष्टी ठळकपणें दिसतात. पण द्वारकाताईंच्या अंगणांतून मात्र दिवाकरांच्या गच्चीवरलं कांहींही दिसत नाहीं; किंवा कळत देखील नाहीं. आज एक बडे बॅरिस्टर पहायला येणार म्हणून ननुताईला मुद्दाम न्हाऊं धुऊं घातली होती. अशी ही मंडळी गच्चीवर बसली असतांना तिकडे अंगणांत ती केस

मोकळे सोडून-इकडे तिकडे फिरत होती. इथे ही मंडळी बसली आहेत हें तिला काय ठाऊक ! दिवाकर जसे सारंग्यांचे स्नेही तसेच ते विनु-काकांच ननूच्यावडिलांचे शेजारी. तेव्हां ननुताईच्या लग्नाच्या वाटाघाटी दोहीं कडून त्यांच्या कानावर येत. दिवाकरांचे सहजासहजीं त्यावेळीं ननुताई कडे लक्ष गेले. तेव्हां त्यांनीं ती सारंग्यांना दाखविली. ननूताई अशी पाठमोरी उभी होती. तिचे ते लांब, सडक, तुळतुळीत केस; ठेंगणीन् ठुसठुशीत अंगलट, हातापायांचा गोरा रंग डौलदार बांधा पाहून बॅरिस्टर साहेब आपल्या लग्नाविषयींच्या गोड स्वप्नांत अमळ गुंग झालेले दिसले. इतक्यांत तिनं तोंड फिरवलं. तिचा तो चेहरा पाहतांच ते खाडकन् स्वप्नांतून जागे झाले; न् गोरंमोरं तोंड करून आणि दिवाकरांचा लगबगीने निरोप घेऊंन घरीं निघून गेलें. आणि " कांहीं अनिवार्य कारणामुळें आज मला आपल्याकडे चहाला येतां येणार नाहीं, या बद्दल मी फार दिलगीर आहे. क्षमा असावी. " अशा अर्थाचें पत्र विनुकाकाकडे पाठवून दिले. आणि मग पाठीमागून "भावी पत्नी या नात्यानें ननूचा आपल्याला सध्या विचार करितां येणे शक्य नाहीं. वास्तव माझ्या भरवंशावर राहूं नये," असें दिवाकरांच्या मार्फत विनु-काकांना युक्तीनें कळविलें. मला ही सारी कहाणी दिवाकरांच्या काकूं-नीच सांगितली. सांगायच तात्पर्य हें कीं, मनुष्य काळं असलं म्हणजे कुरूप असते, किंवा गोरं असलं म्हणजे सुरूप असतं, असंच केवळ नाहीं. खरं म्हटलं तर, सुंदरपणा कशांत असतो, हें सांगणंच कठीण आहे. तो एकट्या रंगांत नसतो, एवढं बरीक खरं. हो, तुला आठवण

असेच त्याची. आपल्या त्या गंगूताई, त्यांच्या घरची स्थिति तुला कांहीं सांगायला नकोच. त्यांच्या नीरूताईच्या लग्नांतच आपण सगळे जण गेलो होतो. त्या लग्नाला आलेल्या त्या जानकीकाकू आणि त्यांची ती वडील मुलगी चिनू तूं चांगली पाहिलेलीच आहे. तीही रंगानं काळी सावळीच होती. पण तिचं तें दरदरीत नाक, पाणीदार डोळे, स्पष्ट पण मृदु न् मर्यादशील बोलणं, उंच कपाळ, तिची ती टापटीपीची राहाणी, चालण्याची ढब, बायकांच्या जातीला शोभेल असे तिचं नाजूक हंसणं, मुकाट्याने पण नीटनेटकेपणानं काम करण्याची तऱ्हा, ही तूं प्रत्यक्ष डोळ्यांनीच पाहिली आहेस. तेव्हां तुला कांहीं अधिक सांगायला नकोच. तिथे ती आठदहा दिवसच कायती होती. पण तेवढयांत तिने किती सगळयांना चटका लावून सोडला. गोष्टीवरून गोष्ट निघतां निघतां मला परवां रंगूताई सांगत होत्या की विलायतेहुन जाऊन आलेल्या एका कलेक्टरनं तिला मुद्दाम मागणी घालून केली म्हणून. झाले थोडे दिवस. म्हणून म्हणते कीं लावण्य हें देवानंच द्यावं: तें नुसत्या याच्यांत कीं नुसत्या त्याच्यांत नसतं. काय असतं न् कसं असतं हे कांहीं कुणाला सांगतां येत नाहीं. पण तें कुठे असते हें मात्र प्रत्येकाला कळतं. एकंदरींत मैनाताईच्या नवऱ्याची मी देखण्यांतच गणना करते. आणि आय. सी. एस. झालेल्या मनुष्याचं शहाणपण तें काय विचारायचे! पदवीच्या वरची परीक्षा ती. पुन्हां इतर परीक्षासारखं हिचं नाहीं; कीं पास झालं तरी पोटा-साठी पाठीस लागलेली वणवण सुटत नाहीं. थोडी म्हणा, फार म्हणा

हें ज्याचं त्याचं नशीब. पण ती प्रत्येकाला करावी मात्र लागते. तेंच, या परीक्षेच्या पाठोपाठ पैसा जसा पायावर लोळण घेतच येतो. लक्ष्मी आणि सरस्वती, यांचं अनंत जन्मींचें वैर. त्या कधीं म्हणून एका जागीं नांदायच्या नाहींत. एक असली तर दुसरी तिथे फटकायची सुध्दा नाहीं. पण इथं जशा सख्या बहिणींहून जास्ती पण छेः, सख्या बहिणींचं एरवी एकमेकींवर कितीही जरि प्रेम असलं तरी त्या जर सवती सवती झाल्या तर जसं वांहीं त्यांच्यांत सात पिढ्यांचं वैर, अशाच वागतील. उलट, पतिसेवेंत अधिक तत्पर कोण राहतं म्हणून या सवतीसवतींत सारखी अहमहमिका चालू असते. इतकंच नाहीं. तर तिसऱ्या सवतीला सुद्धां या दोघी मोठ्या प्रेमानं वागवून घेतात. हा तरी कलयुगींचा चमत्कारच मी म्हणते. पण, या चमत्काराला दिव्यही पण तसंच करावं लागतं. लहान वयांत, ऐन पंचविशीच्या सुमारास, थोडं अगोदरच, कीं ज्यावेळीं तरुणपणाला अगदीं भर आलेला असतो, अशा वेळीं ही परीक्षा पास व्हावी लागते. मैनाताईचं लग्न झालं त्यावेळी लीलाधरानां ही परीक्षा देऊन एकादं वर्ष झाले असेल कीं नसेल. अशा रीतीनं मुलाच्या सुखासाठीं म्हणून आईबाप वय, विद्या, वित्त या ज्या गोष्टी पहिल्यानं पाहतात, त्या लीलाधरांना पूर्णपणें अनुकूल होत्याच. पण त्यांत आणखी रूपाची न् उमद्या स्वभावाची भर पडल्यानं दुधांत साखर पडल्यासारखेच झालं.

मैनाताईचा संसार पाहिला कीं किती धन्य वाटते! लहानपणापासूनच ती किती प्रेमळ, किती शहाणी, किती हौशी आहे!

तिच्या गुणांचे कौतुक करणारा तिला नवरा मिळाला यापरती बायकांच्या भाग्याची सीमा ती कोणती राहिली ? एवढे वैभव, नवऱ्याला केवढा मोठा अधिकार, थोरामोठ्यांच्या कुळांत जन्म, पण या गोष्टी इतरांना जाणवूं नये, अशीच, होतां होईल तोंवर तिची वागणूक असते. सगळ्यांशीं कशी हंसून खेळून राहाते. हा तरी एकेका माणसाचा गूण असतो. ती एक घरांत असली म्हणजे जिकडे तिकडे कसं गजबजलेलं दिसतं. तिच्या मागोमाग, उल्हास, आनन्द, हीं जशीं धावत येतात.

मैनाताई न् लीलाधर या दोघांना मनुष्याचं किती अगत्य आहे ? आपल्या नात्यागोत्याचे, ओळखीपाळखींचे, जे जे कुणी असतील त्यांना बोलवायचं, त्यांना आपल्यां इथे ठेवून घ्यायचं. परकेपणा वाटूं नयें अशा रीतीनें त्याच्याशी वागायचं, न् त्यांची सगळ्या तऱ्हेनं बरदास्त ठेवायची. आतां यावेळीं आम्ही इतके जण इथे आहोंत. तिची आई यशोदाकाकू, तिची धाकटी बहिण बयाताई, अकोल्याच्या चंद्राअक्का, न् द्वारकानाथ. खरोखर इथे आल्यापासून या द्वारकानाथांची सगळ्यांना एक मोठी करमणूक झाली आहे. शामरावासारखं दुसरं कुणी नसल्यामुळें ही धरणी सध्या त्यांच्याकडे आली आहे. लीलाधर इंग्रेजी पद्धतीप्रमाणें काटयाचमचांनींच जेवतात. त्यांचं पाहून द्वारकानाथांना वाटलं, अनायासें संधी आली आहे, तर, आपल्यालाही ही कला साधली तर बरंच. म्हणून त्यांनीं तसं मैनाताईना सरळपणानं सुचवलं झालं. मैनाताईना निमित्त मिळालं. तेव्हांपासून या युरोपियन एटि-

केटच्या नावाखालीं लीलाधरांनीं न् मैनाताईनं त्यांचा निवळ खेळ मांडला आहे. वास्तविक जें करायला हवं, त्याच्या उलट त्यांना करायला सांगतात. आणि तसं त्यांनीं केलं म्हणजे सारे जण त्यांना हंसतात. कधीं कधीं मुद्दामच एक जण त्यांना एक करायला सांगतं, तर दुसरं दुसरंच कांहीं सांगतं, तिसरं तिसऱ्याच प्रकारचा डौल आणतं. अशा रीतींनं तिंघं तिंघं एकाच वेळीं त्यांना तीन गोष्टी करायला सांगतात. छेः सांगतात कशाच्या, त्यांना भांबावून सोडतात. तेव्हां साहजिकच त्यांच्या हातून चूक होते. आणि ती झाली कीं पिकला हंशा. त्यांची चूक व्हावी म्हणून या मंडळीची सारखी धडपड चाललेली असते. एकदां काय झालं, माणसानं एक बशी आणि तोंडावरून नुसता हात फिरविण्यासाठीं पाणी घातलेली तिच्यांत एक पितळेची वाटी प्रत्येकाच्यापुढें आणून ठेवली. नवीनच तें. ते पाहून द्वारकानाथ अमळ बुचकळ्यांत पडले. न् लीलाधरांकडे न् मैनाताईकडे, ते आतां काय करतात म्हणून पाहूं लागले. द्वारकानाथांची स्थिति त्या दोघांच्या लागलीच लक्षांत आली. झालं, मिळाली यांना सवड. पहिल्यानं लीलाधरांनीं ती वाटी उचलून तोंडाला लावल्यासारखी करून तिच्यातले पाणी प्याल्याचा आविर्भाव केला. त्यांचं पाहून मैनाताईनंही तसंच केलं. त्या वाटीचा खरा उपयोग आदल्या दिवशीं पाहिलेला द्वारकानाथांच्या लक्षांत होता. तेव्हां ते एकाएकी धजेनात तसं करायला. यशोदाकाकू त्यांच्या जवळच बसलाय होत्या. त्या सहसा द्वारकानाथांच्या मागें लागत नसत. पण यावेळीं

त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक? आलं त्यांच्या मनांत की आपणही अमळ द्वारकानाथाची गमत करावी म्हणून. त्या अगदी नेहमी सारखं गंभीरपणानं म्हणाल्या "द्वारकानाथ कसं चांगलं गुलाबपाणी आहे! पिऊन पहाना अमळ" यशोदाकाकूचं बोलणं त्यानां खरं वाटलं आणि लागलीच ते त्या वाटीतलं पाणी प्याले. मग जें काय सगळ्यांना हंसू आलं तें विचारायलाच नको. या एटिकेटच्या सबबीवर द्वारकानाथांना जन्मांत झाले नसतील ते ते संस्कार झाले. अशा एक का दोन, किती तरी गमती लिहितां येण्यासारख्या आहेत. नवीन नवीन या मंडळीचं बरंच फावलं पण आतां ते हळूहळू तरबेज होत चालले आहेत. त्यांमुळें त्याच्यापुढे आतां कोणाची फारशी डाळ शिजत नाहीं.

कमाताई, खरं म्हटलं तर कोकादेखत मनुष्य ज्या गोष्टी करत त्या होईल तोंवर जपूनच करत. तेव्हां त्यांचं कांहीं मोठंसं हें नाहीं. अशा ठिकाणीं मनुष्याचा खरा स्वभाव दिसून येत नाहीं. पण ज्या वेळेस कुणी बघणारं नसत त्या वेळेस मनुष्याची जी वागणूक होते तिच्यावरून त्याच्या स्वभावाची खरी परिक्षा होते. अशा रीतीनं लीलाधर न् मैनाताई, यांची वागणूक आज मी इतके दिवस पहाते आहे यांच्यापैकी कुणाची अधिक धन्यता मानावी हेंच मला समजत नाहीं. पाहुण्याराऊळ्यांची आल्यागेल्यांची, सरबराई कुणीही ठेवील. पण आपल्या नित्य सहवासांत राहणाऱ्या आणि सुखदु:खाच्या बाबतींत सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून असल्यामुळें तुच्छ लेखल्या जाणाऱ्या

नोकराचाकरांना प्रेमानं न् कनवाळूपणानं वागवणं म्हणजे साधी गोष्ट नाहीं. पुष्कळ ठिकाणी मी पाहिलंय् की नोकर माणसाशी जी चांगुलपणाची वागणूक ठेवायची ती नेहमी अंगच्या थोरपणामुळेंच असते असं नाहीं. तर त्यांनी आपकं नुकसान करूं नये, त्यांच्यापासून आपल्याला उपद्रव होऊं नये, अशा बुद्धीचीच असते. व इतकं सुद्धां शहाणपण फारच थोड्याच्या अंगी असतं हें कांहीं खोटं नाहीं. पण मैनाताई च्या बाबतीत तर असं म्हणण भाग येतं कीं ती आपल्या चाकर माणसांना पोटच्या पोरांसारखच लेखते. जे आपल्या ताटांत तेंच शेंवटीं भांडीं घासणाऱ्या कामाठ्याच्या पोटांत पडावं अशाविषयीं तिचा नेहमीं कटाक्ष असतो. याशिवाय त्यांची सुखदुःख आपलेपणानं ऐकून घेईल, त्यांना काटाकाळजानं सल्लामसलत देईल, वेळप्रसंग पाहून त्यांची पैपैशाची अडचण दूर करील, दुखण्या बाहण्यांस विचार-पूस करील, अजाणतां चूक झाली तर संभाळून घेईल, अशी तिची सगळ्या माणसांशी वागणूक असते. कमाताई, बोलायला न् सांगायला या गोष्टी जितक्या सोप्या आहेत तितक्याच त्या करायला कठिण आहेत. खऱ्या जिव्हाळ्यावाचून असल्या सोंगाची कुणीं बतावणी करूं म्हणेल, तर तें तत्काळ तोंडघशीच पडेल याला जातीचच मोठे मन लागतं इतकं असल्यावर ती जर त्यांना आपल्या आईबापासारखी वाटली तर त्यात काय नवल? गरीब माणसं, गरजेनं खरी, पण सुखाच्या आशेनंच कारणपरत्वें आपल्याजवळ येतात. शुद्ध बुद्धीनं त्यांच्या आत्म्याचा संतोष राखणं हा का लहानसान धर्म आहे, असं ती नेहमी म्हणत असते.

असो आपल्या जन्माची साथीदारीच आपल्या पूर्ण मनाजोगती मिळाली म्हणून लीलाधरांना किती कौतुक वाटतय् ! पण, असं जर त्यांना कुणी म्हटलं, तर मात्र, एकाद्यका खरंच वाटेल, अशी मुद्रा करून ते तिची नसती गाऱ्हाणींच गात बसतील. अशा त्यांच्या एकेक गोष्टी लिहू लागले तर मला किती तरी पत्रं लिहावीं लागतील ! आणि हळू हळू सवडीप्रमाणें लिहिणारच आहे तीं मी. गमतीनं, पण मैनाताईला खिजविल्यावाचून जसं त्यांना गोडच वाटत नाहीं. घरांत इतकं सुद्धां लक्ष घालायचं काम ती त्यांना पडूं देत नाहीं. आणि एवढं सगळं करून पुन्हां दरवेळेला ती त्याची हाजरी संभाळायला तयार ! असं जरी आहे, तरी त्यांचं लक्ष कुठं जाईल, न् ऐनवेळी तें काय शोधून काढून तिला चकित करतील, याचा कांहीं नेम नाहीं. आंत, बाहेर, कुठं यत्किंचित् उणं पडूं नये म्हणून तिची; तर, कुठं काय चुकलं आहे, तेंच नेमकं शोधून काढण्याविषयीं त्यांची; अशी जशी काय दोघांची चढाओढच लागलेली दिसते. अशा रितीनं त्यांचा संसार गोडीनं न् गुणागोविंदानं चाललेला पाहून मला मोठं कौतुक वाटतं..

## By G. B. MAKODAY.

| | Price. Rs. | A |
|---|---|---|
| Ravindra Nath as seen through his "Gardener." | 1 | 0 |
| Some Fascinating Viewpoints of Vedic Studies. | 1 | 0 |
| Date of Karkacharya ... ... ... | 1 | 0 |
| Pre-University Education in India ... | 1 | 0 |
| प्राचीन भारतीयांची गणितशास्त्रांतील प्रगति ... | १ | ० |
| रामायणांतील अनार्य नांवें ... ... ... | ० | ८ |
| आशियामायनरमधील प्राचीन भारतीयांच्या वसाहति ... | ० | १२ |
| भावार्थप्रकाश ( कविश्रेष्ठ भा. रा. तांबे यांच्या निवडक कवितांवर त्यांतील रहस्यासह उद्बोधक टीपा ). ... | ० | १० |

### IN THE PRESS.

A Few Hours with Eminent Philosophers ...

Glimpses of Aryavartic Culture ... ...

रावणाची राजधानी ! ... ... ...

इतिहासाचा शास्त्रोक्त अभ्यास ... ...

भारतीय हिंदू सम्राट ... ... ...

ऋग्वेदकालीन स्त्रिया ... ... ...

राष्ट्रसंघ व हिंदी संस्थानें ... ... ...

Price in cash or British Indian postage stamps in advance. Copies forwarded by registered book post, unless otherwise instructed, which will cost an extra charge actually incurred. Postage free on orders of Rs. 5 or above. Liberal commission on orders of Rs. 10 or more. Special rates to wholesale dealers. Please communicate with G. B. Makoday, Gwalior.